मुळप्रत

# मा. स्थायी समिती

सभा दि. ५/८/२०१०

(दि. २६/७/१० ची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ३५ ते ४३

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/७७ /२०१०-११ दिनांक :- २ /०८/२०१०.

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------
सदस्य / सदस्या, स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. २६/०७/२०१० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा तहकूब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. ३५ ते ४३ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **गुरुवार दिनांक ०५/०८/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता** स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

मा. सभापती सो. यांच्या मान्यतेने.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/ /२०१०-११ दिनांक :- /०८/२०१०.

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------
सदस्य / सदस्या, स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. २६/०७/२०१० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा तहकूब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. ३५ ते ४३ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **गुरुवार दिनांक ०५/०८/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता** स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

मा. सभापती सो. यांच्या मान्यतेने.

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २०/७/२०१०.

## मा. स्थायी समिती सभा

सभा सूचना क्र. :- ०५ दिनांक २०/०७/२०१०.

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ------------------------------------------------

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. २६/०७/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०५, दि. २०/०७/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका


# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०५, दि. २०/०७/२०१० सोबतची विषय पत्रिका
सभा सोमवार दि. २६/०७/२०१०

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ३५ | दि. २४/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ३६ | BSUP योजनेच्या निविदेस मंजूरी देणेबाबत. |
| ३७ | मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरिता दोन लहान टाटा ४०७/३१०० चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत. |
| ३८ | निविदांना मान्यता देणे बाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ३९ | वातानुकूलीत शीतपेटीमध्ये खाजगी कारणास्तव मृतदेह ठेवणेसाठी दर आकारणेबाबत. |
| ४० | मिरारोड येथील रक्तपेढीसाठी मागविण्यात आलेल्या फेर निवीदांचे दर मंजूर करणेबाबत. |
| ४१ | भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व), मिरारोड ते चेणा, मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार बोली पध्दतीने स्विकारणे बाबत (१२ महिन्याकरिता) |
| ४२ | महापालिकेच्या वाहनांच्या लिलावाद्वारे विक्री केल्याबाबत. |
| ४३ | 'मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या' बसेस सार्वजनिक व खाजगी सहभागातून चालविणे करिता प्राप्त निविदांपैकी कमी दराच्या निविदेस मंजूरी देणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

दिनांक :- २०/०७/२०१०.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका



# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०५, दि. २०/०७/२०१० सोबतची विषय पत्रिका**
**सभा सोमवार दि. २६/०७/२०१०**

| प्रकरण क्रमांक | विषय |
| --- | --- |
| | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ३५ | दि. २४/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ३६ | BSUP योजनेच्या निविदेस मंजूरी देणेबाबत. |
| ३७ | मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरिता दोन लहान टाटा ४०७/३१०० चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत. |
| ३८ | निविदांना मान्यता देणे बाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ३९ | वातानुकूलीत शीतपेटीमध्ये खाजगी कारणास्तव मृतदेह ठेवणेसाठी दर आकारणेबाबत. |
| ४० | मिरारोड येथील रक्तपेढीसाठी मागविण्यात आलेल्या फेर निवीदांचे दर मंजूर करणेबाबत. |
| ४१ | भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व), मिरारोड ते चेणा, मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार बोली पध्दतीने स्विकारणे बाबत (१२ महिन्याकरिता) |
| ४२ | महापालिकेच्या वाहनांच्या लिलावाद्वारे विक्री केल्याबाबत. |
| ४३ | 'मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या' बसेस सार्वजनिक व खाजगी सहभागातून चालविणे करिता प्राप्त निविदांपैकी कमी दराच्या निविदेस मंजूरी देणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

दिनांक :- २०/०७/२०१०.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

८२८४५८१

मुळ प्रत

# मा. स्थायी समिती सभा
# दि. २४/१२/२००९
# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २४/१२/२००९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २४/१२/२००९ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. १९/१२/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ४) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ५) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ६) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| ७) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ८) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| १०) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| ११) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १२) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १३) | सौ. अनिता ज. पाटील | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| २) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

स्थायी समितीच्या सर्व सदस्य, महानगरपालिकेचे आयुक्त साहेब, महानगरपालिकेचे सचिव साहेब, सर्व पदाधिकारी, कर्मचारी वर्ग. या ठिकाणी सर्वांचे मी स्वागत करतो. तसेच उद्या खिसमस हा सण आहे. तर सर्व खिस्त बांधवांना या ठिकाणी खिसमस व नविन वर्षाच्या निमित्त मी आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा देतो. आणि या ठिकाणी आपण थोडासा वेगळा ठराव करणार आहे. अजून आपली एक मिटींग होईल. आणि आपल्या सर्वांना शुभेच्छा देवून मी सचिव साहेबांना विनंती करतो की, आपण सभेला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

विषय पत्रिकेचे वाचन केले.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, प्रकरणाला सुरूवात करण्यापूर्वी मला एक अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पोट निवडणूकीमध्ये वॉर्ड क्र. ५९ मधून सौभाग्यवती सरिता चंद्रकांत म्हात्रे, आणि वॉर्ड क्र. ६८ मधुन प्रमोद जयराम सावंत हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे दोन्ही उमेदवार नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचे स्थायी समितीच्या सर्व सदस्यांतर्फे अभिनंदन करतो.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९५, दि. १०/०६/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**सुधा व्यास :-**

प्रकरण क्र. ९५, मा. स्थायी समिती सभा दि. १०/०६/०९, ठराव क्र. १३, पेज नं. १५, अनु. क्र. १,३,४ के जे काम दिये गये है। नंबर वन की, यह तीनो काम हो गये क्या? इनमे टोटल कितना खर्चा आया? कौनसी कंपनीने इनका टेंडर लेकर काम किया है? इन सभी कामो की माहिती मुझे चाहिए। साथमे सबमे सिल्वर पंप खरेदी किये हुए की बिल कॉपी दे दी जाये। CISNS Titan pipes added plart ISN 1536-2009 समकक्ष ISO.BS.estand प्रमाणे १०० मि.मी.से ५०० मि.मि. से व्याज पाईप सप्लाय करनेका काम मे. विद्या

टेंडर को दिया गया था। तो ठेकेदारको वर्क ऑर्डर कब दिया गया था? ठेकेदार ने आजतक कितनी पाईप लाईन्स सप्लाय की है? और करारनामा की, कॉपी भी मुझे दि जाये।

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. सदरची माहिती पुढच्या सभेमध्ये देवू. सविस्तर माहिती घेवून नंतर देतो.

**ग्रिटा फॅरो :-**

दि. १०/०६/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे. मा. सभापती साहेबांच्या परवागीने बोलते. सभापती साहेब जवळ जवळ आमच्या २९ वॉर्डमध्ये चौक गावामध्ये चिमाजी अप्पा स्मारक बांधलेला आहे. त्या चिमाजी अप्पाचा अजूनपर्यंत पुतळा बनलेला नाही. आता आयुक्त साहेब इथे नाही म्हणून उपायुक्त साहेब मी तुम्हाला विचारते. तर तो पुतळा अजून पर्यंत का बनत नाही. संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये स्मारकाचा सुशोभिकरण होईल आणि नाव राहिल. पण अडथळा का येतो? आणि कोणी ऑब्जेक्शन घेतलेल आहे? अगोदर कोणी घेतलेलं नव्हत. आताच कोणीतरी ऑब्जेक्शन घेतलेल आहे. अशी मला माहिती आहे. वॉर्ड क्र. २९ हा माझा आहे. आणि तिथे माझे प्रयत्न चालू आहे. तिथे अजूनपर्यंत का अडचण येते ह्याची मला माहिती दया.

**दिपक खांबीत :-**

आपण आपल काम मंजूर केलेल आहे. विजय शिरगांवकर म्हणून आहेत त्याना आपण काम दिलेल आहे. पुतळ्याच मॉडल वैगेर बनवायच त्यांना आपण वर्क ऑर्डर दिलेली आहे. आणि त्यांच्याकडून फक्त मॉडल तयार करून कला संचालकांची परवानगी घेवून त्यानंतर तो फायनल पुतळा बनेल.

**हेलन गोविंद :-**

अजून किती कालावधी लागेल? बराचसा वेळ निघून गेला.

**दिपक खांबीत :-**

मॉडला मंजूरी मिळेल तेव्हा येईल.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

पाठपुरावा करून घेतो.

**प्रकरण क्र. ९५ :-**

दि. १०/०६/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ८५ :-**

दि. १०/०६/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. ग्रिटा फॅरो** **अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६, अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे हटविणेकामी असलेली तरतुद पुर्नविनियोजन करणेबाबत.

**वर्षा भानुशाली :-**

मा. सभापती साहब, मेरा एक गोषवारा है। वह स्थायी समिती मे लिया जाये। भाईंदर पूर्व विभाग मे नवघर रोड, गोडदेव फाटक रोड, बी.पी. रोड, केबिन रोड पे हररोज ट्राफीक जाम होता है। इस बारे मे मेरा प्रस्ताव है। ट्राफीक पूलिस और महानगरपालिकाने सर्व्हे करके उपाय योजना करने के लिए प्रस्ताव तयार किया है। यह प्रस्ताव स्थायी समिती मे लिया जाये ऐसा मे अनुवाद करती हूँ।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मिरारोड रेल्वे स्टेशन जवळ पूर्वी तिथे रहदारीला अडथळा नव्हता आणि आता त्या ठिकाणी फेरिवाले बसलेले आहे. त्यामुळे तिथे येता जाता माणसांना जागा मिळत नाही. त्या एका माणसाने. त्या विरेंद्र नावाचा एक माणूस आहे. त्याने कमीत कमी स्वतःचे १०-१५ जागात व्यवसाय करत आहे. एक व्यवसाय असेल ठिक आहे. पण १०-१५ व्यवसाय केल्यामुळे तिथे एकाच ठिकाणी एवढी गर्दी होते की, तिथे लोक कामावरून थकून येतात तर त्यांना येण्याजाण्यासाठी जागा नाही ठेवली. त्या ठिकाणी इतकी गर्दी केलेली आहे. तर माझी तुम्हाला विनंती आहे की, त्याच्यावर ताबडतोब कारवाई करून लोकांना येण्याजाण्यासाठी मार्ग मोकळा करावा.

**मा. सभापती :-**

तुम्ही पत्र द्या. खेत्रे साहेब तुम्ही तिथे जावून बघून घ्या.

**अनिल सावंत :-**

मा. नगरसेवक चंद्रकांत म्हात्रे साहेबांनी जो विषय मांडलेला आहे. तो ट्राफीक बद्दल नाही. तुमच प्रकरण क्र. ९६ आहे. अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकाम हटवणे त्याच्या संदर्भात आहे. पण मला अस वाटते की, प्रशासनाला आणि महानगरपालिकेचा या डिपार्टमेंन्टची गरज नाही. कारण त्याच्यासाठी ५ लाख रू. च प्रोव्हिजन होत त्याच रिएप्रोप्रियेशन करायचा त्यांनी विषय आणलेला आहे. या विभागाचे डी.एम.सी. कोण आहे? आणि अजुनपर्यंत त्यांनी काय काम केल? आणि किती पैसे खर्च केले? ह्या कारवाईवर?

**शरद पाटील :-**

हा असा विषय आहे की, ह्या मिरा भाईंदरमध्ये अनधिकृत काही चालूच नाही का? त्याच्यावर आपल्याला कारवाई करायची आहे.

**अनिल सावंत :-**

अनधिकृत चालू आहे. पण त्याला प्रशासनाचा पाठिंबा आहे. ह्याचा अर्थ हा होतो.

**शरद पाटील :-**

तसच झाल ना. आपण हे डिपार्टमेन्टच रद्द करू ना. बी.पी.रोड, नवघर रोड, पोलिसांनी खाली केला तर केबिन रोड का खाली करत नाही. आणि दिपक हॉस्पीटलची गल्ली आहे. तिथे तर चालायला सुध्दा रस्ता नाही. नविन वस्ती बनले. ते नविन वस्ती उचलणार का? ठिक आहे. बी.पी. रोड, केबिन रोड हे २५ वर्षापासून बसतात. ते आम्ही ऐकत होतो. पोलिसांनी तो पण उचलला. पण जे नविन रस्ते आपले डेव्हलप होतात. तिथे जे फेरिवाले बसतात. त्यांना उचलण्याचा काम फक्त नगरसेवकांच आहे. किंवा जेव्हा नगरसेवक तक्रार करणार तेव्हाच तुम्ही उचलणार. ह्याच पहिल स्पष्टीकरण करा. जर हे काम नगरसेवकांच असेल किंवा नगरसेवकांनी तक्रार केल्याशिवाय आम्ही उचलणार नाही. अस काय असेल तर आम्हाला सांगा.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. सभापती साहब, मिरारोड स्टेशन के उधर म्युनिसिपाल्टी का जो स्कुल है। वो बच्चो को भी जाने के लिए भी वहा से नही होता है।

**जुबेर इनामदार :-**

आम्ही अतिक्रमण हटवण्यासाठी मागणी करतो. वारंवार करतो. प्रभाग कार्यालयामध्ये आमच्या पत्रांचे तर ढिग लागला असेल. आम्हाला सांगितल जात की, पोलिस रक्षक मिळत नाही. किंवा पोलिस रक्षक मिळालेले नाही. आमच्या माहितीप्रमाणे आमचे पोलिसांबरोबर चांगले संबंध आहेत. ते आम्हाला सांगतात की, महापालिका आमची बिल चुकवत नाही म्हणून आम्ही देत नाही. आणि तुमच्याकडे तर इथे पैसे शिल्लक आहे.

**अनिल सावंत :-**

त्यातला एक पैसा खर्च केला नाही.

**जुबेर इनामदार :-**

ते खोट बोलतात की, तुमच्या लोकांकडून तशी कारवाई केली जात नाही. किंवा तशी मागणी केली नाही. अशातला भाग आहे का? आपण अतिक्रमण विभागाचे उपायुक्त आहात. आपण कधी शहरामध्ये फिरलात का? हे बघायला की अतिक्रमणे हटवले जाते की नाही. तुम्ही स्वतः किती मोहिमामध्ये उपस्थित होता.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :--**

मी स्वतः आजवर फक्त दोनच मोहिमामध्ये अहवाल दिला आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, कुठल्या मोहिमामध्ये.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

मिरारोडला फेरिवाले काढायचे होते.

**जुबेर इनामदार :-**

साहेब कधी काढले? कुठली मोहिम?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

साधारणतः नोव्हेंबरच्या दुसऱ्या कि, तिसऱ्या हफ्त्यामध्ये.

**जुबेर इनामदार :-**

सोमवार बाजार, शनिवार बाजार. आमच्या शहरामध्ये मिरारोड मध्ये होतो. चालायला जागा नाही. ना फेरिवाला क्षेत्रामध्ये बसतात. तर तुमच्या प्रभाग अधिकाऱ्यांनी काय कारवाई केली?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

सोमवार बाजार करता ८ डिसेंबरला पोलिस बंदोबस्त मागितला होता. आणि आपले १० कर्मचारी ऑरगनाईज करून द्यायचे होते. आणि तत्कालीन वॉर्ड ऑफीसरने त्या संदर्भामध्ये त्यांच म्हणण अस आहे की,

ही सोमवार बाजारची जी कारवाई आहे. ती केवळ आपल्या एका वॉर्ड ऑफिसरच्या स्टाफ मध्ये होवू शकत नाही. स्ट्रेंथमध्ये होवू शकत नाही. त्याला अधिक बंदोबस्त किंवा अधिक आपल्या कर्मचाऱ्यांचे बळ लागेल.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तुम्हाला त्याची माहिती आहे का? कि, सोमवार बाजार हा ठेकेदाराचा ठेका देताना असा विषय नाही.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

मला त्याची कल्पना नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपण उपायुक्त आहात. अतिक्रमण आहे. या शहराचे अगोदर तुम्ही मुख्य अधिकारी होवून गेला आहात. सोमवार बाजार ही वस्तुच नाही.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

सोमवार बाजारला कुठल्याही तऱ्हेची परमिशन नाही. ही कल्पना मला आहे.

**जुबेर इनामदार :-**

सोमवार बाजारला मान्यता देण्यात आलेली नाही. मग, ते तिकडे बसतात कसे काय? आणि त्याला हटविण्याकरिता मनुष्य बळ लागते.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

त्यांनी १०० मनुष्य बळाची मागणी केली होती.

**जुबेर इनामदार :-**

त्या ठेकेदारावर कारवाई करता का? कधी कारवाई ची मागणी आपण केली का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

ठेकेदार स्वतंत्र्यपणे दुसऱ्या डिपार्टमेन्टने दिलेले आहे. लायसन्स डिपार्टमेन्टने दिलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

अतिक्रमण विभागाने कधी अशी मागणी केली आहे का? की, अशा ठेकेदाराने ज्यांनी अशा प्रकारचे.....

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

सोमवार बाजर काढण्या संदर्भात मोहिमेसाठी...

**जुबेर इनामदार :-**

ठेकेदार स्वतः बसवतात. ना फेरिवाला क्षेत्रामध्ये त्यांना पावती फाडायचा अधिकारच नाही.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

ॲबसुलेटली नाही आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब पूर्वी तर स्टेशन लगत बसायचे. आता तर संपूर्ण कॉलनीमध्ये, सोसायटीमध्ये, कोपऱ्या-कोपऱ्यात सर्व येवून बसायला लागलेत. कुठून-कुठून फेरिवाले येतात. आणि असा प्रकार झालेला आहे की, आपण त्यांना आता जर बोललो तर त्यांच्या दादागिरीच्या भाषा होतात. जर तिसऱ्या नागरिकांनी त्यांना विचारल. बाबा इथे कशाला बसायचे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

सोमवार बाजारमधला आपण कंपोजिट कारवाई घेवू.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

बंद झाल होत तर त्या ठिकाणी परत का चालू झाल?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

त्याच्यावर कारवाई करताना बऱ्याचवेळा आपल्याकडून अस होत की, आपण तात्पुर्ता माल जप्त करतो. आणि नंतर परत करतो किंवा त्यांचे ज्या फेरिवाल्यांनी पुन्हा न बसण्यासाठी डिटेल ॲण्ड ॲक्शन घ्यायला पाहिजे ती घेतली जात नाही. हे मी मान्य करतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, त्याच्यावर काहीतरी झाल पाहीजे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

त्याच्यामध्ये आपण त्यांची मालमत्ता जप्त करून किंबहुना त्याच्यामध्ये थोडस डॅमेज जरी केल. तर कदाचित ती एक डिफरंन्ट ॲक्शन होवू शकते.

**शरद पाटील :-**

माझ्या मताप्रमाणे, माझ्या माहितीप्रमाणे नाईक साहेब असताना त्यांनी गाड्या तोडायला सांगितल्या होत्या. तस तुम्ही का करत नाही? ही आपल्या महापालिकेसाठी शरमेची बाब आहे. हे पोलिस स्टेशन जेव्हा मनावर घेत. विचार करतो तेव्हा बी.पी. रोड, नवघर रोड, खाली करू शकतात. आणि आपली महापालिका काहीच करत नाही. फक्त एक काम आहे. फलाना फलानाच पत्र आलेल आहे. तुम्ही उद्या गाड्या लावू नका.

हा पहिला मॅसेज त्यांना जातो. मी आरोप करतो आणि हा आरोप खरा आहे. कोणी पण खोडून कुठच्याही अधिकाऱ्याने दाखवा.

**शरद पाटील :-**

आता ज्या डिमॉलिशनच्या किंवा अतिक्रमणाच्या पॉवरस् आहेत. तर subsiquantly या ऑफीसलेवला डेलिगेट केलेल आहे. आणि त्याच्यामुळे वॉर्ड ऑफीसर कडे ही जबाबदारी निहित रहते. इन्डीव्हूज्युअल प्रत्येक वॉर्डची. आणि त्यांच्याकडून जे आम्हाला मिळत ते दैनंदिन रिपोर्ट जे गर्व्हमेन्ट ने प्रिसस्क्रेब केलेले मार्च २००९ च्या जी.आर प्रमाणे त्या व्यतिरिक्त माझी जबाबदारी त्याच्यातून टाळू इच्छित नाही. किंवा त्याच्यामध्ये कुठलीही सफाई देवू इच्छित नाही. याच्या संदर्भात यापुढे ज्याकाही तक्रारी येतील त्या तक्रारीचा पाठपुरावा केला जाईल. आणि त्या पध्दतीने जे आपण म्हणता त्या पध्तीने अतिक्रमणे काढली जातील. .

**अनिल सावंत :-**

राऊत साहेब, तक्रारी यायची गरजच काय? विकली रिपोर्ट तुम्हाला प्रभाग ऑफीसर कडून येतो.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

विकली नाही. डेली रिपोर्ट येतो.

**अनिल सावंत :-**

डेली रिपोर्ट येतो. तर त्याच्यावर काय कारवाई केली.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

डेलि रिपोर्ट हे काढण्या संदर्भात येतो. डेलि रिपोर्ट हा कुठे ही अतिक्रमण बसली तर ........

**अनिल सावंत :-**

आज आपल्या महानगरपालिकेमध्ये तुमच्या जवळ रेकॉर्ड झालेले अनधिकृत बांधकाम किती आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

ॲक्च्युली त्याचा डिटेल सर्वे झालेला आहे. परंतु त्यांनी १५ डिसेंबर २००९ पर्यंत फायनल सर्व्हेक्षण करायच आहे. जे राणे नावाचे सर्व्हेअर आहेत.

**अनिल सावंत :-**

पण, तुमच्याजवळ आज डेटा काय कलेक्ट केलेला आहे किती आहे? त्याच्यावर तुम्ही काय कारवाई केली ?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

त्याच्यावर म्हणजे काही जणांवर एम.आर.टी.पी. चे गुन्हे दाखल केलेले आहे. काही बांधकाम डिमॉलीस सुध्दा येतात.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, अपने मा. महासभा मे भी उसका तह हुआ था की, अनधिकृत बांधकाम है तो बोर्ड लगानेका। तो वह भी नही हुआ है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो अहवाल आहे. पण त्या अहवालावर कारवाई काय झाली?

**अनिल सावंत :-**

१८ जानेवारीचा राज्य शासनाचा जी.आर. आहे. आणि राज्य शासन या ठाणे जिल्हाच्या अनधिकृत बांधकामाबद्दल किती संवेदनशिल आहे. ते जी.आर. मध्ये नमुद केलेले आहे. त्याच्यावर मी मा. महासभेमध्ये लक्षविधी लावली होती. प्रभाग अधिकारी ससपेन्ड होवून डायरेक्ट घरी बसू शकतात. एका तरी अधिकाऱ्यावर तुम्ही कारवाई केली का? आणि राहिलेल्या फक्त ५ लाख रू. च प्रोव्हीजन आहे. पोलिस बंदोबस्तसाठी. त्यातला एक पैसा ही अजून खर्च केलेला नाही. वर्ष संपत आल. आणि ती रक्कम तुम्ही दुसरीकडे वळवता आहेत.

**शरद पाटील :-**

आम्ही अतिक्रमणच एक ही पत्र दिलेले नाही. मी तुम्हाला उद्या ५० पत्र लिहून देतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपल्याला पोलिस बंदोबस्तची गरज नाही का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

वॉर्ड आफिसर या सर्वांना जेव्हा जेव्हा पोलिस बंदोबस्त पाहिजे विशेषतः भाईंदर पश्चिम हा पोलिस बंदोबस्त बऱ्याच वेळेला दिलेला जात नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

का दिला जात नाही? त्यांची थकबाकी आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

थकबाकी जी आहे. ती सबसिक्ल्युटली जाते. आता काल सुध्दा मी थकबाकी दिली.

**मदन उदितनारायण सिंह :-**
किती दिली?
**शरद बेलवटे :-**
आपण काल परवा एक चेक सही केला ना. ४५ हजार रू. चा.
**अनिल सावंत :-**
थकबाकी पण नाही. आणि पैसे पण दिलेले नाही.
**शरद पाटील :-**
थकबाकी नसल्यामुळे मग, आपल्याला पोलिस प्रोटेक्शन का देत नाही?
**मा. आयुक्त :-**
थकबाकी नाही.
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
जे.सी.बी. च भाड द्यायला लागते. डंम्पर आहे.
**शरद पाटील :-**
असु द्याना. आपण बघू.
**अनिल सावंत :-**
त्याच्यासाठी तुम्ही पोलिस बंदोबस्ताचे पैसे तिकडे वापरणार काय?
**जुबेर इनामदार :-**
साहेब, जे.सी.बी. घेवून काय करणार?
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
त्यासाठी जे.सी.बी. लागणार आहे.
**मदन उदितनारायण सिंह :-**
आपने बोला थकबाकी नही है। तो आपके पास प्रुफ है क्या की थकबाकी नही है? मैं बोलता हूँ की, अपने मिरा भाईंदर के चार पोलिस स्टेशन है। ३ लाख रू. थकबाकी है। आप बोलते है आपके पास प्रुफ है तो दिखाओ। क्योकी मेरेपास प्रुफ है।
**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**
सवाल प्रुफ का नही है। इन्होने जो बील सादर हुए है। उसके जगह मे उन्होने बताया की यहा थकबाकी वही है।
**मदन उदितनारायण सिंह :-**
थकबाकी नही है। यह देखिए वेस्ट पोलिस स्टेशन का २५ हजार रू. थकबाकी अभी भी है। अभी नवघर, कनकिया, काशिमिरा बाकी है।
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
कालच आपण संबमिट केलेले आहे. आणि देवू ना?
**मदन उदितनारायण सिंह :-**
अपना ऑफिसर बोलते है की थकबाकी नही है।
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
पोलिस स्टेशनची मेजर अशी थकबाकी नाही. २५, ५० हजार रू. काल थकबाकी असेल.
**मदन उदितनारायण सिंह :-**
पोलिस स्टेशनची किती थकबाकी होती आणि आपण त्यांना किती पेमेन्ट केले?
**शरद पाटील:-**
थकबाकी मेजर म्हणजे काय?
**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**
थकबाकी मेजर म्हणजे जेव्हा थकबाकी ५-१० लाख रू. असते.
**शरद पाटील :-**
५-१० लाख रू. असेल तरच बाकी.
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
आपण रोजच्या रोज कारवाई करतो. रोजच्या रोज बिल येते.
**जुबेर इनामदार :-**
उपायुक्त साहेब, तुम्ही तुमच्या जे.सी.बी. बद्दल बोलता. आम्ही या विषयाबद्दल बोलतो. ५ लाख रू. आम्ही निधी ठेवली होती. पण अजूनर्यंत एक रू. त्यांचा पेमेन्ट केलेला नाही. ह्याचा अर्थ काय होतो.
**अनिल सावंत :-**
एक रू. खर्च झालेला नाही. मग, तुम्ही पैसे कुठून दिले?

**मदन उदितनारायण सिंह :-**

आता उपायुक्त साहेबांनी सांगितल की, पोलिस बंदोबस्त मिळत नाही. तर का मिळत नाही. त्यांची थकबाकी आपण देत नव्हतो. म्हणून ते आपल्याला बंदोबस्त देत नाही.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

थकबाकी केव्हा बोलू शकतो. साधारणतः कराची थकबाकी ही पहिल्या १५ दिवसाची बिलाची मागणी आणि त्याच्यानंतर १५ दिवसाची नोटिस दिली. तर एक महिन्यानंतर थकबाकी असु शकते. दिले तेवढी...

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपण पोलिस स्टेशन वेस्टचे कधी पेमेन्ट केल?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

जेव्हा-जेव्हा त्यांच्या पेमेन्ट ची मागणी झाले.तेव्हा तेव्हा दिलेल आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

एक लाख एकोणपन्नास रू. च पेमेन्ट आता दि. १४/१२/०९ ला केल. हे पेमेन्ट १ वर्षाच आहे. एक वर्ष आपण पेमेन्ट देत नव्हतो. दि. १४/१२/०९ ला १ लाख ४९ हजार रू. पेमेन्ट दिल. ते दिल्यानंतर ही अजून वेस्ट पोलिंस स्टेशनच २५ हजार रू.बाकी आहे. त्याच्या व्यतिरिक्त कनकिया, काशिमिरा, त्यांचा वेगळा हिशोब आहे. आणि तुम्ही म्हणता थकबाकी नाही.

**अनिल सावंत :-**

१ लाख ५० हजार रू. पेमेन्ट कुठून केला? ह्या हेड मध्ये खर्च दाखवलेला नाही. झिरो खर्च दाखवलेला आहे. ५ लाख रू. मध्ये खर्च झिरो दाखवलेला आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

यह पोलिस स्टेशन का पत्र है। पोलिस स्टेशनने मुझे दिया है।

**सुधा व्यास :-**

उपायुक्त साहब, ४ लाख ९५ हजार रू. का खर्च अभितक हुआ है। तो उसमेसे कौनसे अनधिकृत बांधकाम तोडे हुए है? उसके कितने घंटे जे.सी.बी. चलाये.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

पुरा रेकॉर्ड मेरे पास है।

**सुधा व्यास :-**

तो फिर आप यह पूरा रेकॉर्ड कभी देंगे?

**संभाजी पांनपट्टे (उपायुक्त) :-**

देतो.

**सुधा व्यास :-**

और साहब आप तरतुद तो ले रहे है।

**अनिल सावंत :-**

ऑडीटर साहेब, १ लाख ४९ हजार रू. खर्च आपण कुठून केले?

**दादासाहेब पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आमच्या लेखा विभागाने, लेखा परिक्षण विभागाकडे पोलिसच एक ही बिल आमच्याकडे प्रलंबित नाही. पण, मी आत्ता प्रभाग अधिकाऱ्यांना विचारतो की, त्यांच्याकडे बिल प्रलंबित आहे. आणि त्यांनी का सादर केल नाही?

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझ्याकडे पोलिसाच पत्र आहे.

**दादासाहेब पाटील :-**

जर प्रभाग अधिकाऱ्यांकडे बिल आले असतील. तर त्यांनी बिल का पाठवलेली नाही?

**अनिल सांवंत :-**

ऑडिटर साहेब, १ लाख ४९ हजार रू. च तुम्ही पेमेन्ट केल. ते कुठच्या हेडखाली केले? ते सांगा. कि, केलच नाही.

**दादासाहेब पाटील :-**

केल ना.

**अनिल सावंत :-**

मग, तुम्ही इथे खर्च का दाखवला नाही?

**दादासाहेब पाटील :-**

त्याच्यामध्ये दिलेल आहे ना.

**अनिल सावंत :-**

कुठे दिल? ५ लाख रू. पोलिस बंदोबस्तसाठी आपलं प्रोव्हीजन आहे. त्याच्यातला तुम्ही एक पैसा खर्च केलेला दाखवलेला नाही.

**दादासाहेब पाटील :-**

८ लाख ९० हजार रू. खर्च झालेला आहे. तो दाखवलेला आहे.

**अनिल सावंत :-**

कुठे झाला आहे?

**दादासाहेब पाटील :-**

५ नंबरचा कॉलम बघा ना.

**अनिल सावंतः-**

सुरक्षा रक्षक, पोलिस बंदोबस्त प्रोव्हीजन आहे ५ लाख रू. त्याच्यासमोर तुम्ही चला. बरोबर आहे.

**दादासाहेब पाटील :-**

बरोबर आहे.

**अनिल सावंत :-**

उपलब्ध शिल्लक ५ लाख रू. हा तुमचा हेड आहे ना. उपलब्ध शिल्लक ५ लाख रू. आहे. म्हणजे तुम्ही १ पैसाही खर्च केलेला नाही.

**दादासाहेब पाटील :-**

त्यांचे ३-४ चेक आपण दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

मग, ते इथे का नाही आल? ५ लाख रू. तुम्ही हे रि-एप्रोप्रियेशन करता.

**दादासाहेब पाटील :-**

ते मला माहित नाही.

**अनिल सावंत :-**

रि-एप्रोप्रियेशन करायला प्रशासनाने विषय आणला आणि तुम्हाला माहितच नाही.

**जुबेर इनामदार :-**

पाटील साहेब, ज्या हेडमधून आपण पैसे ठेवलेले आहे. त्याच हेडमधून पैसे गेले पाहिजे ना.

**अनिल सावंत :-**

त्यांना माहितच नाही. रि-एप्रोप्रियेशनचा विषय आलेला आहे.

**दादासाहेब पाटील :-**

ह्यांनी जे डिटेल दिलेले आहे ना. हे विभागांना दिलेले आहे ते आमच्या पर्यंत आलेल नाही.

**अनिल सावंत :-**

तुमची ऑडिटर म्हणून मान्यता दिली असेल ना.

**दादासाहेब पाटील :-**

बघाव लागेल.

**अनिल सावंत :-**

बघाव लागेल. तर तुम्ही गोषवारा कशाला देता?

**मदन उदितनारायण सिंह :-**

त्या हेडमधून आपण पेमेन्ट करतो. आणि ते रेकॉर्डवर आणत नाही. म्हणजे काय?

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, अस आहे की, प्रशासनाने रि-एप्रोप्रियेशनचा विषय आणलेला आहे. पोलिस बंदोबस्तासाठी आपण प्रोव्हीजन ५ लाख रू.च केल होत. अजून पर्यंत एक पैसा ही खर्च झालेला नाही. आणि त्याच्यातले ३ लाख रू, आपण दुसऱ्या ठिकाणी डायव्हर्ट करतो. आजपर्यंत एकच उदाहरण आलेल आहे. १४ डिसेंबरला त्यांनी १ लाख ४९ हजार रू. चा पोलिसांना चेक दिला आहे. पण, इथे खर्च शुन्य दाखवतात. आणि ऑडीटर म्हणतात की, हे मला माहित नाही. त्यांनी काय इन्फोरमेशन दिली ती.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अजूनही वेस्ट पोलिस स्टेशनच २५ हजार रू. बाकी आहे. तसेच कनकिया आणि काशिमिरा पोलिस स्टेशनच बाकी आहे. आता राऊत साहेब बोलले की, आम्हाला पोलिसांची गरज नाही. पोलिस बंदोबस्त मिळत नाही. का मिळत नाही. कारण, आपण त्यांना थकबाकी देत नाही. म्हणून मिळत नाही. अस पोलिसांच पत्र आहे.

**मा. आयुक्त :-**

पोलिस बंदोबस्त आणि पैसा भरायचा हा वाद इथे उपस्थित आहे. गर्व्हमेन्टने जी.आर. काढलेला आहे. ती संयुक्त जबाबदारी आहे. महापालिका आणि पोलिस डिपार्टमेन्ट या दोघांचे मिळून अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमणावर कारवाई करायची आहे. त्यामुळे आम्ही संयुक्त जबाबदारी हायकोर्टाने दिल्यामुळे आम्ही खर्च देणे लागत नाही असे आमच म्हणण आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मग, तुम्ही पेमेन्ट का करता? आता १ लाख ५० हजार रू. च आपण पेमेन्ट केले.

**मा. आयुक्त :-**

१ लाख रू. म्हणजे झोपडी बांधकामाला आम्ही पेमेन्ट केल्याशिवाय देणारच नाही असे म्हणायला लागले.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यात पण हायकोर्टाचे आदेश आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांना कळवून कळवून झाल्यानंतर सुध्दा त्यांनी पैसे दिले तरच देणार. आणि आपण हायकोर्टाला शब्द दिला होता की, त्या झोपड्या आम्ही काढू.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपण हायकोर्टाचे आदेश पाळण्याकरिता आपण पोलिसांना पैसे देत नाही. पोलिस आपल्याला अतिक्रमण हटवण्याकरिता बंदोबस्त देत नाही. ते आपल ऐकत नाही. म्हणजे तुम्ही आम्हाला पैसे दिले नाही. तर आम्ही तुम्हाला बंदोबस्त देणार नाही. पण, साहेब आपण तरतुद ठेवलेली आहे ना. नंतर हायकोर्टामध्ये त्याच्या विरोधात पी.एल. दाखल करून परत पैसे घेवू तो पर्यंत पोलिस बंदोबस्त करिता पैसे देत जा.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**जुबेर इनामदार :-**

कमीत कमी असे तर बोलता बोलता कामा नये ना की, अनधिकृत बांधकाम.....

**मदन उदितनारायण सिंह :-**

साहेब, जर आपल्याला पोलिस बांदोबस्तसाठी पोलिसांनी पैस द्यायची जरज असेल तर त्या हेडेमधून आपण डायवर्ट कस काय करू शकतो.

**मा. आयुक्त :-**

करायच नाही ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

विषय तर आणलेला आहे ना.

**अनिल सावंत :-**

साहेब, ५ लाख रू. चा विषय आणलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्यांना जे.सी.बी. करिता पैसे पाहिजे.

**अनिल सावंत :-**

आणि १ लाख ४९ हजार रू. कुठून खर्च केले?

**मदन उदितनारायण सिंह :-**

एकतर हे पोलिसांच झाल. दुसर नो पार्किंग मधली वाहने उचलली. त्या हेडमधुन पण डायव्हर्ट करायच आहे. तिथे पण आपल्याला पैशाची गरज नाही का?

**जुबेर इनामदार :-**

साहेब, नो पार्किंग करिता मी तरतुद केली होती.

**मा. आयुक्त :-**

गाड्या भाड्याने घेतल्या. आणि ट्राफीकवाल्यांना दिल्यात पण.

**अनिल सावंत :-**

मग, ह्याला पैसे द्यायची गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

मग, ह्याला पैसे द्यायची गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

तो वापर करत नाही.

**शरद पाटील :-**

साहेब, तो वापर करत नाही. त्याला फुकट पैसे देतो. आणि कुठचीच वाहने उचलली जात नाही.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक मिटिंगला येता, प्रत्येक वेळेला नविन पी.आय. येतो. आणि आम्हाला टोईंग वॅन द्या, आम्ही उचलतो असे म्हणतात. प्रत्येक वेळेला आम्ही टोईंग वन दिली. जागा पण त्यांना पार्किंगला दिली. सिक्युरिटी पण अपॉइन्ट केली.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मग, आपणच का नाही करत? जर ते करत नसेल तर आपण स्वतः करायला पाहिजे ना.

**मा. आयुक्त :-**

आपला अधिकार नाही. वाहन उचलायचा अधिकार ट्राफिक पोलिसांचा आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आता पर्यंत महापालिका करत होती ना. हे ठेक्याद्वारे आपण करत होतो.

**मा. आयुक्त :-**

ठेक्याद्वारे पार्किंग नो पार्किंग मध्ये उचलण्याचा त्या ठेकेदाराला दिले. परंतु, आता समजा वन वे आहे. वन वे ला दंड करायचा आहे. पार्किंग करून गेला. ते ट्राफिक वाल्यांना घेवून ठेकेदाराला करायच होते. जिथे ठेकेदार नाही. त्या ठिकाणी आपण त्यांना टोईंग वॅन दिलेली आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

साहेब, पार्किंग करून गेला नाही. काही ठिकाणी कायमची गाडी उभी असते. दिवस रात्र उभीच असते.

**शरद पाटील :-**

साहेब, जिथे आपला ठेकेदार आहे. तिथे पण ते उचलत नाही. साहेब, तुम्हाला सांगतो आमच्या साईबाबा मंदिर समोर, गुरूकृपा हॉस्पिटल आहे. सरस्वती शाळेची मूल येतात.

**मा. आयुक्त :-**

३ महिन्यामध्ये ४ पी.आय. बदलले.

**शरद पाटील :-**

सगळ म्हणणं तुमच सत्य असणार तरी अपण त्यांना ठेका दिलेला आहे. तो पण उचलत नाही. आणि मोटर सायकल....

**मदन उदितनारायण सिंह :-**

ठेकेदाराला पैसे आपण देतो.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या स्थायी समितीला ट्राफीक पी.आय. आणि ठेकेदार यांना हजर करा.

**दिपक खांबीत :-**

आपण त्यांना मदत म्हणून पार्किंगचा ठेका दिलेला आहे. पण, त्यांच म्हणण आहे की, हे आम्हाला मान्य नाही. आम्हाला आमच्या एस.पी.ची मंजुरी घ्यायला लागते. आणि ह्याच्या बाबतीत हायकोर्टमध्ये आपण ज्या गाड्या उचलतो ना. तर त्यामध्ये हायकोर्टात केस झाले. सगळ्या गाड्या डॅमेज केल्या. आणि ह्या सगळ्या लोकांनी त्यांच्या विरूध्द हायकोर्टात केसेस केलेल्या आहेत. त्यामुळे ते बोलतात की, ह्यामध्ये जी काय प्रोसिजर आहे. आम्ही आमच्या ऑफीसमधून गाडी नेणार. आणि उचलणार.

**मा. आयुक्त :-**

पण, त्यांना गाडी कधीच मिळत नाही.

**दिपक खांबीत :-**

आणि आता नविन वळवी आलेत. १५ दिवसात आम्ही प्रोसिजर करून सुरू करतो असे बोलले.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, त्याच्यामध्ये अस आहे. मागच्या स्थायी समितीमध्ये हा विषय झाला होता. पार्किंग नो पार्किंगमधुन, दुसरा विषय असा आहे. आज शहरामध्ये २५ ते ३० कार डिलर आहे. प्रत्येकाच्या दुकानासाठी बघाल तर २५ ते ३० गाड्या कायम पार्किंग केलेल्या असतात. शांती नगर, सेक्टर ११, सिल्व्हर पार्क, शांती पार्क,

**मा. आयुक्त :-**

नगरपालिका मऊ असल्यामुळे आणि तुम्ही पदाधिकारी असल्यामुळे इथेच बोलणार दुसरीकडे जोरात बोलत नाही. ट्राफीक ऑफीसरला का बोलत नाही.

**अनिल सावंत :-**

ट्राफीकची मिटींग लावा ना, मागच्या वेळी एस.पी. आले होते. त्यावेळी आम्ही बोललो होतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, आपने अभी पहले बार बोला की, यह हमारा काम नही। ट्राफीक ऑफीसर का काम है। आप ऐसा बोलो की, हमारा काम नही है तो फिर हम ट्राफीक के पास जायेंगे ना।

**मा. आयुक्त :-**

ट्राफीक के पास ही यह काम है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

लेकिन आप यह पहली बार बोल रहे है।

**मा. आयुक्त :-**

पहले बार नही। पहले से ही बात की है। सब जगह वही बात है। ट्राफीक ही कंट्रोल कर सकती है।

**शरद पाटील :-**

बरोबर आहे. पण, तुम्ही ट्राफीकवाल्यांना बोलवा ना. त्यांच्यासमोर बोलतो ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

टोईंग वॅन का ठेका अपनने दिया है की नही?

**मा. आयुक्त :-**

टोईंग वॅन का ठेका देने उनको टोईंग वॅन दिया है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

उनको पैसा हम देते है। जब पैसा हम देते है तो वह काम क्या करता है?

**मा. आयुक्त :-**

उनको ऐसा बोला था की, आपका ५० टक्के हमारा ५० टक्का.

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो अपना ५० टक्का जा रहा है ना।

**मा. आयुक्त :-**

नही। टोईंग वॅन युझ ही नही कर रहे है।

**शरद पाटील :-**

साहेब, टू व्हिलर आपले ठेकेदार उचलतात ना.

**मा. आयुक्त :-**

पार्किंग नो पार्किंगवाले त्याचा रक्क्म बुडू नये म्हणून उचलतो. परंतु, ते ट्राफीकवाल्यांच काम आहे.

**सुधा व्यास :-**

साहब, अनधिकृत बांधकाम तोडने के लिए हमने गणेश देवल नगर मे झोपडपट्टी तोडने की कारवाई करने के लिए प्रभाग कार्यालय को पत्र दिया है। जिनमे कोई कारवाई नही हुई।

**मा. आयुक्त :-**

गणेश देवल नगर मे।

**सुधा व्यास :-**

हा. और सिधा पोलिस कंम्प्लेन्ट करके झोपडे बसानेमे मदत कर रहे है। दोन दिन पहले भी मा. प्रभाग अधिकारीने झोपडे तोडनेकी कारवाई की, पर सिर्फ दिवार का थोडासा भाग एक फॉर्मेलिटी के तौर पे तोडा है।

**मा. आयुक्त :-**

कल परसो ही तोडकर आये है। ४ बांधकाम.

**सुधा व्यास :-**

हा. लेकिन सिर्फ दिवार को झटका लगाया है।

**मा. आयुक्त :-**

नही। पूरा रूम्स तोडके आये है।

**सुधा व्यास :-**

मे आपको माहिती देती हूँ। रूम्स तोडके आये की, दिवार तोडके आये।

**मा. आयुक्त :-**

मे आपको फोटो भी दिखाता हूँ।

**सुधा व्यास :-**

दिखाओ। साहब, कोई प्रभाग अधिकारी के उपर किसिका दबाव है क्या? बार-बार ऐसा बोलने पे वहापर झोपडे तो आराम से बन रहे है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, नो पार्किंग वाहन की हेड की जरूरत अपने को है की नही?

**मा. आयुक्त :-**

हेड की जरूरत है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो फिर क्यो डायव्हर्ट कर रहे है?

**मा. आयुक्त :-**

नही करेंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो फिर विषय लाते क्यो है? आप बोलते है नही करने का। फिर भी विषय लाते हो।

**मा. आयुक्त :-**

पोलिस बंदोबस्त का खर्चा है ना। जब तक उनका और हमारा झगडा मिटता नही तब तक।

**जुबेर इनामदार :-**

मंहापालिकाच आपण एवढा पैसा खर्च करून चांगले रस्ते बनवतो. त्याच्यावरती अशा प्रकारचे गाड्या उभे करतात. कार डिलर्स वगैरे. किंवा अशा सुध्दा गाड्या उभ्या आहेत. वर्षानुवर्षे हललेल्या सुध्दा नाही. साहेब, त्याच्याकरिता आपल्याला काहीतरी मार्ग काढावाच लागेल.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या वेळेला ट्राफीक पोलिस आणि कॉन्ट्रॅक्टर या दोघांना पण बोलवतो. ट्राफीक वाल्यांनी गाड्या उचलायच्या आहेत. ट्राफीक वाल्यांना समोर बोलवून घेवू ना.

**अनिता पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हॉटेल अजित पॅलेस पासून ऐकेरी वाहतुक चालू केली आहे. जाणारी बंद केलेली आहे. ट्राफीक होते त्या अनुशंगाने बंद केलेली आहे. ट्राफीक होते त्या अनुशंगाने बंद केली आहे असे मला वाटते. पण, साहेब स्कुल बस, बी.एस.टी.बस, आणि आपल्या मनपाचे बस ह्या वाहनांना तिथे परवानगी दया. कारण, स्कुलच्या छोट्या-छोट्या मुलांना तिथे खुप प्रॉब्लेम होतो. आणि अत्यावश्यक सेवा कारणाने कुठलीसेवा जेव्हा आपण नागरिकांना देतो.

**मा. आयुक्त :-**

ते वन वे केल्यानंतर त्याच नोटिफिकेश झाल्या नंतर अलाऊड करता येत नाही.

**अनिता पांटील :-**

पण साहेब त्याच्यात तुम्ही तर काही करू शकाल ना.

**मा. आयुक्त :-**

नाही.

**दिपक खांबित :-**

साहबे, नोटिफिकेशनमध्ये फक्त ॲम्ब्युलन्ससाठी अलाऊड केलेल आहे.

**शरद पाटील :-**

स्कुल बसला पण अलाऊड कराना.

**अनिता पाटील :-**

साहेब, स्कुल बसला कराना. कारण, खुपच अडचणी होत आहे.

**मा. आयुक्त :-**

नोटिफिकेशनमध्ये पुन्हा करेक्शन करायला लागेल. तो पर्यंत करता येणार नाही.

**अनिता पाटील :-**

आम्हाला कुठल्या नगरसेवकांना कल्पना नव्हती की, नोटिफिकेशन केल.

**मा. आयुक्त :-**

ट्राफीक वाल्यांनी केलेल आहे. आम्ही केलेल नाही.

**अनिता पाटील :-**

त्याच्यात तुम्ही आम्हाला सहकार्य करायला पाहिजे. निदान स्कुल बस...

**मा. आयुक्त :-**

त्यांना कळवू. तुमच मत जे आहेत आम्ही त्यांना कळवू.

**अनिता पाटील :-**

कळवा. नंतर आपल्याकडे मिटिंग लावा. अस करा.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आता श्रृष्टीमध्ये पण वन वे झालेला आहे. रॉयल कॉलेजच्या तिथे. तर तिथे पण अशी परिस्थिती झाली आहे की, तिथुन आता बस मार्गाचा वाहनांसाठी डालमिया स्कुलसाठी रस्ता काढलेला आहे. तिथे शाळेतली मुल सुटतात, कॉलेज आहे, शाळा आहे, तिथे छोटी छोटी मुल त्या शाळेतुन सुटतात. त्या मार्गाने वाहतुक सुरू केलेली आहे. जो पूर्वीच्या मार्ग होता तो तिथून मार्ग बंद केलेला आहे.

**अनिता पाटील :-**

एम.आय.डी.सी. चा मार्ग चालू करून अजित पॅलेसचा मार्ग बंद केला. पण, परिस्थिती तशीच आहे. ट्राफीक व्हायची तेवढी होतेच.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तिथे पुढे-मागे ॲक्सीडेन्ट होण्याची संभवता जास्त आहे.

**शरद पाटील :-**

पुढच्या वेळी पोलिसांना बोलवलं त्यावेळी आपण बोलू.

**दिपक खांबित :-**

साहेब, फक्त एक राऊन्ड मारतात.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पण तिथे शाळा सुटल्यानंतर मोठी परिस्थिती निर्माण होणार आहे.

**क खांबित :-**

साहेब, जर तिथे वन वे केला तर काही अर्थच नाही. तुम्हाला फक्त एक, दिड कि.मी. चा फरक तो.

**अनिल सावंत :-**

रूट चेंन्ज करा. स्कुल बस आणि एम.बी.एम.टी. च्या बस आहे. त्याचा रूट चेंन्ज कराना.

**जुबेर इनामदार :-**

मुंबईमध्ये बऱ्याच ठिकाणी वन वे आहे. आपण तर पहिल्यांदाच केला आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जुबेर साहेब, आपण ट्राफीक इन्सपेक्टरला बोलवू या आपल्याला ज्या-ज्या ठिकाणी अडचणी आहेत ना त्याची आपल्याला जावून पाहणी करायला लागेल. आपण एक सुचवतो. आणि नागरिकांची समस्या वेगळी असते.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

शाळा ज्यावेळी सुटते त्यावेळी तिथे ट्राफीक व्यवस्था करण्यात यावी.

**मा. आयुक्त :-**

यांची मागणी तिथे अगोदर कळवा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अतिक्रमण वाले तोडनेको जाते है खाली नाम करके आते है। कल आपने जभी बोला। तो जैसल पार्क चौपाटी पर गये। खाली एक साईडका पत्रा निकालके आये। फ्रेम वैसा ही है। उस फ्रेम मे पत्रा आज वापस लग जायेगा। और दुसरी साईड का कुछ किया ही नही। आधे पे छोडके चले आये।

**मा. आयुक्त :-**

काम थांबवून ठेवण्याच काही कारण नाही. महापालिकेची जागा त्यामध्ये ॲड झालेली आहे. तेवढे सगळे पत्रे काढून आणा असे तुम्हाला आदेश दिलेले आहे. त्याप्रमाणे तुम्ही काम करायच. आम्ही प्लॅन सॅक्शन केले का? ती जागा पकडून? प्लॅन सॅन्शन केलेली नाही. जो पर्यंत प्लॅन सॅन्शन करत नाही तो पर्यंत आमची ऑर्डर फायनल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

त्या जागेवर झाड पण तोडलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

खांबित साहेब, एम.आय.डी.सी. चा जो रस्ता तुम्ही घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. तो एकदम चांगला निर्णय घेतलेला आहे. तर एम.आय.डी.सी. चा रस्ता पूर्ण करून घ्याना. तो तुटला आहे. डांबरीकरण, बांधलेली आहे. एम.आय.डी.सी. च्या वरच्या पाण्याच्या टाकीचा रस्ता तो पूर्ण करून घ्याना.

**दिपक खांबित :-**

भाईंदर मध्ये आपण वन वे करतो. आपण वेस्टला पण केल आहे. कोंबडी गल्ली आहे ना तिथे आपण वन वे केलेला आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

साहेब आपण वन-वे करतो. तरीही लोक जातात.

**ग्रिटा फॅरो :-**

साहेब कोंबडी गल्ली आहे ना. तिथे वन वे करायचाच नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यासाठी ट्राफीक पोलिसवाले उभे असतात ना. दुसऱ्यांची काम आम्हाला कशाला सांगतात.

**मा. सभापती :-**

मिटींगमध्ये त्यांना आपण बोलवू ना तेव्हा ट्राफीक इन्सपेक्टरला ह्या गोष्टी सांगू ना. ते त्यांचच काम आहे. त्यांना आपल्याला सांगाव लागेल. सन्मा. सदस्य मदन साहेब, आता आपल्या भाईंदर पूर्वेचे पोलिस स्टेशन जे काम करते. नवघर पोलिस स्टेशन ते त्यांच उल्लेखनीय काम आहे. ट्राफीकच्या बाबतीमध्ये अतिशय चांगल काम चालू आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, केबिन रोडच्या फेरिवाल्यांना पण उचलाना. केबिन रोड बाकी ठेवल. तो रस्ता केवढा छोटा आहे.

**मा. आयुक्त :-**

गोखले साहेब, केबिन रोडच्या फेरिवाल्यांना उचलून घ्या.

**ग्रिटा फॅरो :-**

कोबंडी गल्लीचा रस्ता आहे ना. तिथे ट्राफीक तर बंदच करा. तिथे वन वे सुध्दा नको. काहीच नको. तिथे बंदच करून टाका.

**शरद पाटील :-**
मा. आयुक्त साहेब, आपल्या पालिकेची जे.सी.बी. कुठे आहे.

**अनिल सावंत :-**
जे.सी.बी. किर्ती आहे?

**मा. आयुक्त :-**
हा विषय कुठे आहे?

**शरद पाटील :-**
हा जे.सी.बी. चा विषय आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**
हा जे.सी.बी. चा विषय आहे. आपल्याला जे.सी.बी. साठी ८ लाख रू. पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**
भाड्याने घेण्याकरिता पैसे पाहिजे ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**
पालिकेची जे.सी.बी. किती आहे?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
१ ना दुरूस्त आहे. त्याला १० वर्ष झाली. आणि दुसरा जे.सी.बी. आहे....

**शरद पाटील :-**
साहेब, १० वर्ष झाले आपली जे.सी.बी. ना दुरूस्त आहे. तीच जागा अडवू ठेवलेली आहे.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
ती निर्लेखित करणार. आणि आरोग्य विभागात चालू आहे.

**शरद पाटील :-**
आरोग्य विभागवाले काय करतात?

**मा. आयुक्त :-**
जे.सी.बी. चालू आहे की नाही?

**राजकुमार कांबळे :-**
भोलानगरला चालू आहे.

**अनिल सावंत :-**
फक्त भोलानगरला एकाच ठिकाणी.

**राजकुमार कांबळे (एस.आय.) :-**
जशी लागेल तस. कधी मिरारोडला मागितली तर मिरारोडला पाठवतो.

**शरद पाटील :-**
साहेब, तुम्हाला एक सांगतो. आपण भाड्याने जे जे.सी.बी. घेतो ना ते ४ तास चालतात. आणि त्याना ८ तासाच आपण भाड देतो. साहेब, तुम्ही सक्षम आहात. त्याच्यावर तुम्ही खरंच लक्ष द्या. पालिकेचे पैसे वाचवणे ही तुमच्या क्षमता आहे. म्हणुन आम्ही फक्त तुमच्या नजरेस आणुन देतो. आणि आपली जे.सी.बी. नक्की काय करते ते बघा.

**मा. आयुक्त :-**
हे बघा. मुळात कुठल्याही वाहनाला १० वर्ष झाल तर ते आर.टी.ओ. कडे आम्ही लिहिलेले आहे. आक्षेप करायला आपल्याला परवानगी दया म्हणून. एक जे.सी.बी. बंद पडलेली आहे. ते दुरूस्त केली तरी नविनचा खर्च येणार आहे. आणि काही गाड्या १० वर्षाच्या वर आहे. ते आम्ही रद्द करून टेंडर काढून लिलावाने दयायला परवानगी मागितलेली आहे. एक जे.सी.बी. चालू आहे. ते वेगवेगळ्या ठिकाणी आम्ही कचरा टाकत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीवर प्लॅन सुरू होईपर्यंतच्या कालावधीत. त्यामध्ये जिथे शेतकऱ्यांचा कचरा टाकतो तिथे फवारी करायला जे.सी.बी. पाठवतो. आणि त्यावर माती टाकायला सांगितलेली आहे.

**सुधा व्यास :-**
साहब, जे.सी.बी. कितने घंटे चल रहा है अनधिकृत बांधकाम के लिए। वह भी आप बतायेंगे।

**मा. आयुक्त :-**
कितने घंटा चला यह मे नही बता सकता. आप जैसे बोल रहे है की, अनधिकृत बांधकाम कितने तोडे। हम फोटो दिखाते है कितने तोडे। और अपने ही एक मंदिर की रिझर्व्हेशन जगह मे बांधनेके के लिए परमिशन दिया है ऐसी मांगा है। और ८ दिन कि परमिशन मांगी है तो उधर आपने कंन्टीन्युस रखा है।

**सुधा व्यास :-**
साहब, अनधिकृत झोपडे जिस ढंग से बन रहे है ना।

**मा. आयुक्त :-**
अनधिकृत किसको बोलते है। जिसको काऊन्सलेर का लेटन उसमे नही होना चाहिए।

**सुधा व्यास :-**

जिस ढंग से झोपडे बने है ना।

**मा. आयुक्त :-**

मार्केट कि जगह मे उस रोड नही था। बिल्डर ने मार्केट की जगह तो ताबे मे परचेस करके लिया। और ४-८ दिन का परमिशन मांगा और वहाँ पर कंन्टीन्युज चल रहा है। हम मार्केट कहा बिठायेंगे। ऐसा रिझर्व्हेशन एक-एक करके हडप होने लगा तो मार्केट कहा बिठायेंगे।

**सुधा व्यास :-**

साहब, यह पहला रिझर्व्हेरेशन था क्या?

**मा. आयुक्त :-**

रिझर्व्हेरेशन कितना है क्या है? आपने उसमे लेटर क्यो दिया? आपने लेटर दिया उधर कंन्टीन्यूज क्यो रखा?

**सुधा व्यास :-**

आपके जो अनधिकृत झोपडे जो हो रहे है? वह कितने है वह भी तो देखो ना।

**मा. आयुक्त :-**

वह सॉल्ट डिपार्टमेन्ट के है। सॉल्ट डिपार्टमेन्ट को हमने बार बार बोला है। की, झोपडे कन्स्ट्रक्शन करने मत दो। झोपडे जो होते है वह सॉर्ल्ट डिपार्टमेन्ट के होते है। तोडने के लिए हम जाते है। परसो हमारे अधिकारी के उपर हल्ला हुआ। हम ३५३ दर्ज किया। अटक हुआ। और बादमे तोडने के लिए भेजा। उसमे तुम्हारा counselor ही है।

**सुधा व्यास :-**

तो हम क्या करे। हम थोडी उसके लिए रिसपॉन्सीबल है।

**मा. आयुक्त :-**

आप जैसे बोल रहे है। जो कठिनाई होती है। वह आपको मालुम नही होती। आप जैसे किये एक लेटर दिया। भगवान के लिए ८ दिन कि परमिशन दे दो। टेम्परी परमिशन दिया वहांपर परमनंन्ट करके बैठे।

**सुधा व्यास :-**

साहब, भगवान के लिए होता भी तो है।

**मा. आयुक्त :-**

भगवान के लिए आप दुसरी जगह परचेस करके पुजा करो। लेकिन हमारे जगह पर मत करो।

**ग्रिटा फॅरों :-**

साहेब, ट्राफिकचा विषय चालू होता. चर्च रोडच्या इथे पण ट्राफिक होते. हे मी गेल्या वर्षी पण सांगितल होत. आता पण ख्रिसमसची वेळ आहे. आज रात्री मिड नाईटला लोक जातात. त्याशिवाय स्कूलला पण मूल जातात. गेल्या वर्षी पण पत्र दिल होत. पण काही झालेल नाही. आजच्या दिवशी तरी करा.

**मा. आयुक्त :-**

ट्राफीक इन्सपेक्टर आणि पोलिसांना आज लेटर पाठवतो.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, मेरा एक विनंती है। मिरारोड स्टेशन पर म्युनिसीपाल्टी कि स्कुल है ना। उसे भाजीवालोने गोडाऊन करके रखा है। बच्चो के लिए आने जाने के लिए रस्ता भी नही रखा है। तो जरा वहॉपर कुछ करिये।

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर ३५३ दाखल करा आणि आज संध्याकाळ पर्यंत मोकळं करा. आणि गोडावूनमध्ये कोण सामान ठेवतो. त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा. कुलूप तोडून आत शिरला.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, अतिक्रमण पथक आपण तयार केलेले आहे. अतिक्रमण हटवण्याकरिता बाजार आल. त्याच्यामाध्ये दोन शिफ्ट आहे. सकाळची एक दुपारची. तर दुपारची शिफ्ट ही रात्री १० वाजेपर्यंत असायला पाहिजे. किंवा आहे. असा आपण नियम तयार केला होता. १० वाजयेपर्यंत कुठल्याही अतिक्रमणाचा पथक तिथे थांबवायचा नाही. आणि जेवढे काही बाजार किंवा फेरिवाले चायनिजच्या गाड्या ह्या संध्याकाळी लागतात.

**मा. आयुक्त :-**

दूपारची जी शिफ्ट आहे ती ४ वा. सुरू करा. ४ ते १०.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, सुरूवातीपासून ३ ते १० हा टाईमच आहे.

**मा. आयुक्त :-**

४ ते १० करा. खेत्रे तुम्हाला समजल का शाळेच्या इमारतीमध्ये कोणी गोडावून बांधलेल आहे. आणि त्यांनी कुलूप तोडून सामान ठेवल असा गुन्हा अगोदर दाखल करा. मग, सामान बाहेर फेका. आणि तिथे रात्री

एक माणूस ठेवून त्याच सगळ सामान जप्त करून आणा. आजपासून तिथे ठेवल नाही पाहिजे. इतकी डेरिंग कशी होईल?

**अनिल सावंत :-**

पोलिसांना १ लाख ४९ हजार रू. पेमेन्ट केल ते कुठल्या हेडखाली केल? ते कळलच नाही. ५ लाख रू. त्यांनी शिल्लक दाखवलेल आहे.

**मा. आयुक्त :-**

अकाऊंट डिपार्टमेंट कढून विसरून मायनस करायचे राहिलेले आहे. तर ते कमी करून.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, अजून जो अतिक्रमण तोडते है। अतिक्रमण विभाग है। तो अतिक्रमण तोडनेके बाद उसकी वसुली भी आती है। तो आज तक उसकी कितनी वसुली आयी है? और इस वसुली के बारे मे ऑडिटर का आक्षेप भी है तो उसपर क्या कर रहे है। उसमे कोई वसुली आती है की, नही आती? आजतक कितनी वसुली बाकी है? और क्यो वसुली नही करते हो? अगर वह वसुली करते तो अपने पास पैसा आता है। उसी जे.सी.बी. के लिए। तो दुसरा पैसा डायव्हर्ट करनेकी जरूरी नही। तो सक्ती करिये की, जिसके पास वसुली बाकी है उसे वसुली करिये।

**मा. आयुक्त :-**

सगळ्यांना प्रॉपर्टी टॅक्स मध्ये अनधिकृत बांधकाम तोडण्याचे बिल म्हणून घाला. आणि प्रॉपर्टी टॅक्स मध्ये पाठवा. आणि किती पाठवले हे पुढच्या ३० तारखेच्या मिटिंगला सांगा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आता कुठल्या कुठल्या प्रभागाची किती वसुली बाकी आहे?

**मा. आयुक्त :-**

आपण प्रॉपर्टी ट्रक्स ज्या पध्दतीने वसुल करतो त्या पध्दतीने ते ही वसुल करायच बिल गेल्या नंतर १५ दिवस नोटिस गेल्यानंतर १५ दिवस नंतर भरल नाही तर ऑप्शन करायच आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

टोटल वसुली किती बाकी आहे? चार ही प्रभागातुन?

**हेलन गोविंद :-**

आयुक्त साहेब, आमच्या गावामध्ये चिमाजी अप्पांचा किल्ला होता. तिथे चिमाजी अप्पांचा पुतळा बांधलेला नाही. त्या चिमाजी अप्पांच्या स्मारकाला खुप महत्व आहे आणि त्याचे सुशोभिकरण व्हावे अशी इच्छा आहे.

**मा. आयुक्त :-**

तो क्ले मॉडलचा पुतळा करायचा आहे. त्याचे आठ लाख रुपये पेमेंट करावे असे पत्र आलेले आहे. कला संचालनालय गव्हर्नमेंटचे डिपार्टमेंट आहे. त्यांनी ते क्ले मॉडल बनविले आहे. त्या मॉडलचे आठ लाख रुपयाचे पेमेंट करण्यापूर्वी चिमाजी अप्पांसारखे हे क्ले मॉडेल आहे. हे सर्टीफिकेट आणावे लागते. ते सर्टीफिकेट मिळाल्यानंतर पेमेंट करायचे आहे. जर क्ले मॉडेलचे आपण पेमेंट केले आणि क्ले मॉडेल प्रमाणे पुतळा बनविला आणि चिमाजी अप्पांसारखा झाला नाही तर महापालिकेवर गुन्हा दाखल होईल. त्यामुळे कला संचानलयाकडे क्ले मॉडेल बनविले आहे. त्याप्रमाणे चिमाजी अप्पांचा फोटो आणि हा पुतळा बरोबर आहे. हे सर्टिफिकेट आणल्यानंतर पेमेंट होईल आणि सर्टिफिकेट मिळाल्यानंतर त्याची कार्यवाही करण्यात येईल.

**हेलन गोविंद :-**

आपल्या कालावधीत ही कार्यवाही होईल अशी अपेक्षा आहे.

**मा. आयुक्त :-**

होईल.

**अनिल सावंत :-**

जे.सी.बी. साठी पैसे कुठून आणणार?

**मदन उदितनारायण सिंह :-**

वसुली करून. आपली जी अतिक्रमणची थकबाकी वसुली आहे. ती केल्यावर. पैसे येईल.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ९६ हे फेटाळण्यात येत आहे. आणि पुढचा विषय घेण्यात यावा.

(मा. सभापतींच्या आदेशाने सदरचा विषय नामंजूर करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९७, पुर्नविनियोजनास मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्या पूर्वीच जे प्रकरण होत ना. रि-एप्रोप्रियेशनच त्याच्यामध्ये नमूना क्र. १० मध्ये विभाग प्रमुख, मुख्य लिपीक, मा. आयुक्त, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, ज्या सर्वांच्या सह्या

आहेत. पण ह्या प्रकरणाला गोषवारा दिलेला आहे. त्याच्यावर फक्त कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग ह्यांची सही आहे. बाकीच्यांच्या सह्या नाही आल्या.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण ज्या ह्या लाईन टाकणार आहे. त्या कुठे कुठे टाकणार आहे त्याची काय माहिती आहे का?

जुबेर इनामदार :-

नमुना क्रमांक १०

नियम ३० (३) पहा

| अ.क्र | या शीर्षातुन | | | | | ह्या शीर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रधान, गौण व तपशील शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यतचा खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशील शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखेपर्यतचा खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | **भांडवली खर्च पाणी पुरवठा अ.क्र** ५ ५० द.ल.लि पाणीपुरवठा योजना पुर्ण करणे (अर्धवट राहिलेली कामे) | ५० द.ल.लि.पाणी पुरवठा योजनेतुन महाराष्ट्र जीवनप्राधिकरण मार्फत अद्याप पुर्ण व्हावयाच्या कामाकरीता तरतुद करण्यात आलेला निधी | ३०० लक्ष | - | ३००.०० लक्ष | **भाडवली खर्च पाणी पुरवठा अ.क्र** ३ नविन जलवाहिनी टाकणे | मनपा क्षेत्रात विविध ठिकाणी जलवाहिनी अंथरणे | ५००.०० लक्ष | ४,९८,७९,२३६/- | २००.०० लक्ष | **"५० द.ल.लि पाणीपुरवठा योजना पुर्णकरणे"** (अर्धवट राहिलेली कामे या लेखाशिर्षाअंतर्गत नजिकच्या काळात मोठा खर्च होण्याची शक्यता फारच कमी असून ३१ मार्च २०१० पर्यत होणारा खर्च गृहीत धरता सदर लेखाशिर्षातून **रू.२००.०० लक्ष "नविन जलवाहिनी टाकणे"** या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यास शिफारस आहे. |

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**सुधा व्यास :-**

मा. आयुक्त साहब, नविन जलवाहिनी डालनेके लिए सन २००९-१० साल मे ५ करोड रू. की तरतुद दी गयी है। लेकिन यह तरतुद खतम हो गयी ऐसा विषय पत्रिके मे दिखाई दिया है। तो यह तरतुद कहा खर्च की गई? ५ करोड रू. मे कौन कौन से काम किये गये? कितने नये पाईप खरिदे। पहले इन सभी की डिटेल्स मा. स्थायी समिती मे जानकारी दि जाये। दो करोड रू. कहाँ खर्च करने है? इसकी माहिती दि जाये ऐसी मेरी विनंती है।

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्या प्रश्नाच उत्तर मी देतो. आपण प्रोसिडिंगमध्ये काढली ती माहिती तुम्हाला पुढच्या मिटींगमध्ये देणारच आहे. आणि ५ करोड रू. ची काय काम केली त्याची ही माहिती पुढच्या मिटिंगमध्ये देतो. आणि हे रिएप्रोप्रियेशन आज मंजूर झाल्यानंतर प्रत्येक काम स्टॅण्डींग पुढे येतात. मा. महासभे पुढे येतात. त्याची रितसर माहिती असते ना.

**अनिल सावंत :-**

आपण जे प्रोव्हिजन केल होत. नविन बांधकामास मनपाचा हिस्सा. त्याच्यावर खर्च काही होणार नाही का? आपण जे प्रोव्हिजन केल होत स्टेम,मा.जि.पा. प्राधिकरणास नविन बांधकामास मनपाचा हिस्सा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहब, प्रकरण क्र. ९७ मे मेरी सुचना है। पे पूर्नविनियोजन जे आपण केल. नविन जलवाहिनी टाकण्यासाठी. आता परत आपल्याला जेवढी गरज आहे तेवढी पाणी पुरवठा नाही. म्हणून जिथे नविन वसाहत तयार झाली नाही. किंवा नविन वसाहत होत आहे. तिथे ही नविन पाईप लाईन टाकण्यात येवू नये. जो पर्यंत पाणी पुरवठा मुबलक होत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

हा विषय रि-एप्रोप्रियेशनचा आहे. त्याच्या नंतर हा विषय विषय पत्रिकेवर आल्यानंतर फेटाळू शकता.

**मदन उदितनारायण सिंह :-**

हा विषय मी फेटाळत नाही. मी ह्या विषयावर सूचना दिले की, नविन जल वाहिनी टाकण्या अंतर्गत नविन वसाहतीत टाकण्यात येवू नये.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ९७ चा ठराव वाचून सर्व सदस्यांना सुचने नुसार कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. :- ९७**

पुर्नविनियोजनास मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८६ :-**

**नमुना क्रमांक १०**

**नियम ३० (३) पहा**

| अ. क्र | या शीर्षातुन | | | | | ह्या शीर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रधान, गौण व तपशील शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचा खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशील शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखेपर्यंतचा खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | **अभिप्राय** |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | **भांडवली खर्च पाणी पुरवठा अ.क्र ५** ५० द.ल.लि पाणीपुरवठा योजना पुर्ण करणे (अर्धवट राहिलेली कामे) | ५0 द.ल.लि.पाणी पुरवठा योजनेतुन महाराष्ट्र जीवनप्राधिकरण मार्फत अद्याप पुर्ण व्हावयाच्या कामाकरीता तरतुद करण्यात आलेला निधी | ३०० लक्ष | - | ३००.०० लक्ष | **भाडवली खर्च पाणी पुरवठा अ.क्र ३** नविन जलवाहिनी टाकणे | मनपा क्षेत्रात विविध ठिकाणी जलवाहिनी अंथरणे | ५००.०० लक्ष | ४,९८,७९,२३६/- | २००.०० लक्ष | **"५० द.ल.लि पाणीपुरवठा योजना पुर्णकरणे"** (अर्धवट राहिलेली कामे या लेखाशिर्षाअंतर्गत नजिकच्या काळात मोठा खर्च होण्याची शक्यता फारच कमी असून ३१ मार्च २०१० पर्यत होणारा खर्च गृहीत धरता सदर लेखाशिर्षातून **रू.३००.०० लक्ष "नविन जलवाहिनी टाकणे"** या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यास शिफारस आहे. |

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. अनिल दिवाकर सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९८, आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब. मा. आयुक्त साहेब, आपण आता त्याला आर्थिक आणि प्रशासकिय मंजुरी घेतो तर ह्याला तरतुद किती आहे का? ह्याला तरतुद ठेवलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

तरतुद नाही. ह्याच चालवायच आहे.

**शरद पाटील :-**

देखभाली साठी तरतुद असेल ना.

**शिवाजी बारकुंड :-**

कुठलही काम येत. अर्थसंकल्पीय तरतुद असेल तरच इकडे मा. स्थायी समिती समोर सादर केल जात.

**अनिला पाटील :-**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | शांती नगर मलनिःसारण केंद्र वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१८,३४,५४४/- |
| २ | जेसल पार्क मलनिःसारण केंद्र वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१८,३४,५४४/- |
| ३ | सृष्टी मलनिःसारण केंद्र वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,९६,५४४/- |
| ४ | शांती नगर सेक्टर ३ पंपींग स्टेशन वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,७३,४३२/- |
| ५ | अस्मिता पार्क पंपींग स्टेशन वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१६,१६,५४०/- |
| ६ | मिरा एम.आय.डी.सी. पंपींग स्टेशन वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,३८,८०८/- |
| ७ | शांती पार्क मलनिःसारण केंद्र वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,९६,५४४/- |
| ८ | शांती नगर सेक्टर ८ पंपींग स्टेशन वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,००,८०८/- |
| ९ | नवघर नाल्यामधुन जाणारी पाईपलाईन बदलणे. | रू.३६,६९,१२३/- |

उपरोक्त कामांकरीता महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या वार्षिक अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. सबब सदर कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तत्पूर्वी साहेब हे मलःनिसारण केंद्र आहे. हे शांती नगरमध्ये आहे. हे सध्या चालू परिस्थीत आहे की, बंद परिस्थितीत आहे. कारण, सेक्टन नं. ५ मध्ये तिथे सध्या अशी परिस्थिती आहे की, सर्व डब्ल्यु.सी. जे प्लाण्ट आंहे ते सर्व तुंबलेले आहे. भरलेले आहे. ते चालू असतील तर ....

**शिवाजी बारकुंड :-**

प्लान्ट चालू आहे. पण कॉम्प्रेसिव्ह चालू नव्हते. आता आपण कॉम्प्रेसिव् घेतलेल आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

दोन महिने झालेले आहे. सर्वाचे डब्ल्यु.सी. आहेत. संडास ते संपूर्ण भरलेले आहे. कोणाला घरात राहता येत नाही. किती दुर्गंधी सुटलेली आहे. जाधव साहेबांना पण सांगितलेल आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, मागील वर्षाची निविदा होती. त्याच्यामध्ये कॉम्प्रेसिव्ह रोजची देखभाल दुरूस्ती करायची होती. त्याचा उल्लेख नव्हता. त्यामुळे सगळ्या अडचणी आलेल्या आहेत. ह्याच्यामध्ये सगळ्या उल्लेख आहे. ह्याच्याप्रमाणे कुठलीही अडचण येणार नाही. रेग्युलर साफसफाई होणार आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

परंतु, आता परिस्थिती अशी आहे. सेक्टर ५ मध्ये आपली माणस कार्यरत होती. काम करत होती. पण, त्यांना ते मिळतच नाही की कुठून लाईन जोडलेली आहे. बिल्डींग नं. सी. २१, २२ त्याच्यामध्ये संपूर्ण सेक्टर-६ मध्ये पण तिच परिस्थिती आहे.

**अनिल सावंत :-**

आपण जे सब मर्सिबल पंप घेतले होते ते चालू झाले का?

**शिवाजी बारकुंड :-**

झालेले आहे. फक्त १ बाकी आहे.

**अनिल सावंत :-**

कुठचा बाकी आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

सृष्टी मधला बाकी आहे.

**अनिल सावंत :-**

बाकी सर्व नविन पंप चालू आहे.

**चंद्रकां म्हात्रे :-**

साहेब, आपण बोलतो. पण त्याच्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई होत नाही.

**सुधा व्यास :-**

मा. आयुक्त साहेब, इस प्रकरण मे मिरा भाईंदर महानगरपालिका के सभी मलःनिसारण के केंद्रोकी देखभाल और दुरूस्ती के लिए खर्च दिखाई गया है। अनु क्र. १ से ९ तक. सभी कामो के दिखाये गया खर्च की मुझे डिटेलस चाहिए। साहब मेरी और यही राय है की, जभी आर.आर. जाधव साहब कमिशनर थे उस वक्त सिर्फ लेबर पार्ट के टेंडर निकाले गये थे। जिसे मनपा के खर्च की बचत की गई थी। इसी तरह टेंडर निकाले जाये और कामो की मंजुरी दी जाये। ऐसी मेरी विनंती है।

**शिवाजी बारकुंड :-**

खर्चाची बचत आणि सेवा. आताच म्हात्रे साहेबांनी विषय काढलेला आहे. फक्त लेबर पंप ऑपरेटरच काढाल तर सिव्हर लाईन हे चॉक अप झाल तर कोणी काढायच मागच्या वर्षी ह्याचा एवढा त्रास झालेला आहे. सर्व मेम्बर शांती नगरामध्ये आहे. ह्याच्या पूढची सविस्तर माहिती मी आपल्याला देतो.

**सुधा व्यास :-**

मजदूर और पंप ऑपरेटर की.....

**शिवाजी बारकुंड :-**

सगळे सविस्तर अंदाज पत्रकाची कॉपी आपणाला देतो.

**मा. आयुक्त :-**

इस्टिमेन्ट ची त्याला कॉपी द्या. आणि सर्वांत महत्वाच आहे. की १ ते ८ तुम्ही मेंटेनन्सच इस्टिमेन्ट मंजूर केलेल आहे. उद्या टेंडर मागवल्या नंतर, मंजूर झाल. मंजूर झाल्यानंतर ते जे चार्जेस आहे ते प्रॉपर्टी मध्ये डिवाईड होईल. परत कमी करा म्हणून येवू नका. प्रॉपर्टी टॅक्समध्ये ते ॲड होईल. त्यांचे मेटेनन्स सोसायटीने करायचे ते आपण करतो. मा. महासभेच्या ठरावाने ही स्किम हातात घेतलेली आहे.

**शरद पाटील :-**

जिथे प्लान चालू असेल तिकडच्या सोसायटींना करणार ना.

**मा. आयुक्त :-**

हो.

**मा. सभापती :-**

सदरचा ठरावामध्ये सदस्यांच्या सुचनांच्या समाविष्ट करून वाचून ठराव कायम करत आहे. सचिव साहेब पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र :- ९८**

आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८७ :-**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | शांती नगर मलनिःसारण केंद्र वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१८,३४,५४४/- |
| २ | जेसल पार्क मलनिःसारण केंद्र वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१८,३४,५४४/- |
| ३ | सृष्टी मलनिःसारण केंद्र वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,९६,५४४/- |
| ४ | शांती नगर सेक्टर ३ पंपींग स्टेशन वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,७३,४३२/- |
| ५ | अस्मिता पार्क पंपींग स्टेशन वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१६,१६,५४०/- |
| ६ | मिरा एम.आय.डी.सी. पंपींग स्टेशन वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,३८,८०८/- |
| ७ | शांती पार्क मलनिःसारण केंद्र वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,९६,५४४/- |
| ८ | शांती नगर सेक्टर ८ पंपींग स्टेशन वार्षिक देखभाल/दुरूस्ती करणे. | रू.१७,००,८०८/- |
| ९ | नवघर नाल्यामधुन जाणारी पाईपलाईन बदलणे. | रू.३६,६९,१२३/- |

उपरोक्त कामांकरीता महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या वार्षिक अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. सबब सदर कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. अनिता पाटील** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९९, निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**शरद पाटील :-**

साहेब, आपण आता हे जे फायर हायड्रॉईन बसवणार आहोत. तर जूने पण बसवले होते तर त्याची परिस्थिती काय आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

आपण जे जुने बसवले ते चालु आहेत. हे ह्या वर्षी च्या बजेटमध्ये होते. कोर्टाच्या निर्णयानुसार तेवढेच घेतलेले आहे. जवळ-जवळ आपल्याला २०० ते २५० लागणार आहे. ह्यापैकी आता थोडासाच पार्ट घेतलेला आहे. पुढचा बजेट मंजूर झाल्यानंतर पूर्ण शहरासाठी घ्यायला लागणार आहे. पहिले आहे ते चालू आहे. त्यांनी नविन बसवले.

**शरद पाटील :-**

पहिले आहे ते नक्की चालू आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

नक्की चालू आहे.

**शरद पाटील:-**

ते कुठे आहेत आणि आता आपण कुठे बसवणार ह्याची माहिती आम्हाला दया.

**शिवाजी बारकुंड :-**

पुढच्या वेळेस यादी देतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कुठे आहेत? शहरात तर कुठे दिसत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

यादी देतो नंतर आपण समक्ष पहायला जावू.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आमच्या मते तर काहीच कुठे दिसत नाही.

**शरद पाटील :-**

असु दे. जरूरी आहे. त्यासाठी आम्ही विरोध करत नाही. ते आहे ते चालू आहेत का? चांगल्या परिस्थितीत आहेत का? आणि आता लावणार आहेत ते कुठे लावणार आहेत? त्याची माहिती द्या.

**मदन उदितनारायण सिंह :-**

जूना तो एक भी दिखता नही।

**शिवाजी बारकुंड :-**

पहिल्या स्पॉटला आहे. दुसऱ्याही स्पॉटला चालू आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

चालू नाही. आम्ही म्हणतो चालू नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

दाखवतो ना तुम्हाला.

**जुबेर इनामदार :-**

बारकुंड साहेब, फायर हेड्रेन किती असतील या शहरामध्ये.

**शिवाजी बारकुंड :-**

अंदाजे ६० - ७० असतील.

**जुबेर इनामदार :-**

सध्या रस्त्यावर कचरा जमलेला आहे. लोकांनी त्याला पेटवायला घेतलेला आहे. त्याच्यामुळे त्रास होता कामा नये.

**शिवाजी बारकुंड :-**

नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

बारकुंड साहेब,, नविन टाकण्यापूर्वी जूने किती आहे त्यांची स्थिती काय आहे? आणि हे नविन कुठे कुठे टाकणार ह्याची यादी देण्यात यावी.

**अनिल सावंत :-**

१) दि.२७/११/२००९ रोजीच्या दै. फ्री प्रेस जरनल, दै. हमारा महानगर व दै. समाधी प्रकाश या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या विषयांकीत जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

मिरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील जनता नगर रोडवरील पोद्दार हायस्कल ते हनुमान मंदिर (गणेश देवल नगर) येथे पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.
(अंदाजित रक्कम रू.३९,४५,९८१/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **<u>मे. एस.एन. एंटरप्रायजेस</u>** | **<u>४.९४ % ज्यादा दराने (वाटाघाटीअंती ३.९४ % ज्यादा दराने)</u>** |
| मे. संदेश डी. बुटाला | ८ % ज्यादा दराने |
| मे. राजेश एन. विशे | १० % ज्यादा दराने |

२) दि.०६/१२/२००९ रोजीच्या दै. फ्री प्रेस जरनल, दै. खबरे आज तक व दै. समाधी प्रकाश या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या विषयांकित जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात फायर हायड्रंट पुरविणे व बसविणे.
(अंदाजित रक्कम रू.४९,८०,०००/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **<u>मे. के. अे. पाटील</u>** | **<u>४.७५ % ज्यादा दराने (वाटाघाटीअंती २.९५% ज्यादा दराने)</u>** |
| मे. संदेश डी. बुटाला | ८ % ज्यादा दराने |
| मे. एस.एन. एंटरप्रायजेस | १२ % ज्यादा दराने |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ च्या कामाकरीता मे. एस.एन. एंटरप्रायजेस व अ.क्र. २ च्या कामाकरीता मे. के. अे. पाटील यांचे दर लघुत्तम आहेत सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे. .

**सुधा व्यास :-**

इंस ठराव को मेरा अनुमोदन है। साहब इस विषय मुझे बोलना है। प्रकरण क्र. ९९, वॉर्ड क्र. २३ जो मेरा वॉर्ड है। जनता नगर रोड मे पूरानी जलवाहिनी है। जिसकी वजसे वहॉ के रहिवासीयो को कम प्रेशर से कम पाणी आता है। इसका पत्र मैने पाणीपुरवठा विभाग को नई जल वाहिनी जनता नगर रोड वॉर्ड क्र. २३ मे डालने के लिए दिया था। जिसका मा. कार्यकारी अभियंता बारकुंड साहबने मुझे लेखि उत्तर भी दिया है की, आपके वॉर्ड मे नई जल वाहिनी का काम जल्द ही शुरू हो जायेगा। लेकिन वह आजतक हुआ नही है। दुसरी तरफ आप पोद्दार स्कुल से गणेश देवल नगर तक आप नई जल वाहिनी लगा रहे है। जहा केवल अनधिकृत झोपडपट्टीया है। जो पिछले तीन सालो मे बनाई गई है। मा. आयुक्त साहबने पुरानी पाईप लाईन को बदलकर नई पाईप लाईन को बदलकर नई पाईप लाईक के कामो की निवीदा निकाली जाये यह मेरी विनंती है।

**शिवाजी बारकुंड :-**

हे त्या पूर्ण परिसरातल आहे. तुम्हाला जे वाटत की हे फक्त गणेश देवल नगर साठीच आहे. पूर्ण कुठलीही लाईन टाकता ना त्या भागातला पाणी पूरवठा इम्प्रुव्हमेट कशी होईल त्या हिशोबाने टाकली जाते. त्याचे स्वतंत्र्यपूर्ण पणे हायड्रोलीक केल जात. कुठल्या एका भागासाठी लाईन नसते. तुम्ही आता जो उल्लेख केलेला आहे. ते पूर्ण तुमच्या भागात आणि पुढच्या झोपडपट्टीसाठी आहे.

**सुधा व्यास :-**

साहब, पूरा पाणी झोपडपट्टी मे जा रहा है।

**शिवाजी बारकुंड :-**

बोलने से कुछ नही होता है। जो फ्लॅट नही है वह देखना चाहिए।

**सुधा व्यास :-**

अभि भाग्यश्री पार्क का ऐसा ही चल रहा है। वहापर प्रेशर बहोत कम हैष आपकी टिम वहॅापर ३ दिन से जा रही हैष लेकिन अभितक रिजल्ट आया नही।

**शिवाजी बारकुंड :-**

मॅडम, रिजल्ट आयेगा।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

बारकुंड साहेब मी ह्या विषयाच्या अनुषंगाने बोलतो सेक्टर नं. ६. ह्या बद्दल मागे पण आपला विषय झाला होता. त्या ठिकाणी गुरूद्वार आहे, जैन मंदिर आहे, हिंदू मंदिर आहे. तुम्ही त्यांना पाणी देवू नका अस मी म्हणत नाही. पहिला ह्याच स्पष्टीकरण करून देतो. तुम्ही ज्या वेळेला तेथील रहिवाशियांना पाणी सोडता त्या लोकांनी काय केलेल आहे की, प्रत्येकांनी अंडर ग्राऊंड टाकी बनवलेली आहे. सोसायटीमध्ये कुठल्याही ठिकाणी अंडर ग्राऊंड टॅंक नाहीत. त्याच्यामुळे काय होत की, लोकांनी अंडर ग्राऊंड टाक्या केलेल्या आहेत. पाणी सोडल्यानंतर त्यांना पहिल पाणी जात. आणि तिथल्या नागरिकांना पाणी मिळत नाही. हा वारंवार विषय झालेला आहे. आणि त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. मी तुम्हाला एक सांगतो. एकतर त्या मंदिरासाठी जे मंदिर असतील ते. आमच मंदिरासाठी कुठलाही विरोध नाही. त्यांनी बऱ्याच वेळा सांगितल पण त्याच्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य मागच्या स्थायी समितीमध्ये विषय झाला होता. आम्ही स्वतः व्हिजीट देवून सर्व धार्मिक स्थळ होती त्यांना फार विनंती केली. अशी अशी अडचण आहे. आणि तुम्ही तुमच्यावरती टाक्या बसवून घ्या. दोन ते तीन दिवसात बसवून घ्या. नाहीतर आम्ही कनेक्शन बंद करू. अशी ओरली सूचना दिली. ओरली सूचना देवून सुध्दा त्यांना तीन दिवसात काहीही करवाई केली नाही. नंतर आम्ही त्यांना परत लेखी नोटिस दिली ८ दिवसाची मुदत दिली आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

त्याची प्रत मिळेल का?

**शिवाजी बारकुंड :-**

हो मिळेल ना.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

दुसरी गोष्ट काय माहित आहे की, पूर्वी कस होत की ते धार्मिक साठीच वापरत होते. आता ते कमर्शियल युज करतात.

**शिवाजी बारकुंड :-**

पहिल पार्ट कस होत. तुमचा डायरेक्ट पाणी अंडर ग्राऊंड टाकीत जायच होत ना. तो त्यांना लेखी नोटीस दिली. त्यांना टाकी बांधायला सांगितल. त्या टाकीत पाणी न्यायला सांगितल. जर दुसरा मुद्दा असेल. वापर अनधिकृत असेल. तर त्यांना नोटिस देवू.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

माझ काय म्हणन आहे. तुम्ही टाकी लावण्यासाठी जी परवानगी दिलेली आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

परवानगी नाही दिली. त्यांना नोटिस दिली वर बसवून घ्या.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

बसवून घ्या. जर नसेल बसवलेली. तर माझ म्हणन अस आहे की, जर त्याची नोटिस दिली असेल तर त्याची कॉपी द्यावी. आणि दुसरी गोष्ट अशी की, त्यांच पाणी बंद करा. अशी आमची इच्छा मुळीच नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

इच्छा तुमची ही नाही आणि आमची ही नाही. फक्त नागरिकांना पाणी जावे. त्यांना लेखी नोटिस देवून जर त्यांनी बंद केल तर त्यांच कनेक्शन बंद करणार.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तिथल्या लोकांना पाणी मिळत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मागच्या स्टॅण्डींग मध्ये झाल होत ३ मंदिर आहे. त्यांना डायरेक्ट अंडर ग्राऊंड टाकीमध्ये कनेक्शन दिलेल आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

जैन मंदिर नाही गुरूद्वारा.

**शिवाजी बारकुंड :-**

सेंटरमध्ये सगळ्या टाक्या ओव्हर हेड आहे. डायरेक्ट पाणी टाकीमध्ये जात. तर त्यांनी सुचना केल्या होत्या की, त्यांना सुचना दया. वरती टाकी बसवून घ्या. त्यांना आम्ही तोंडी सुचना दिल्या. त्यांनी काम केल नाही. त्यांना लेखि सूचना दिल्या. त्याची कॉपी बोलले द्या. आम्हाला की देतो. ८ दिवसात त्यांनी नाही केल तर त्यांच कनेक्शन कापू.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब काय आहे की, आपल्या इथुन पाणी ज्यावेळेला सोडल जात. त्यावेळेला ह्यांच्या अंडर ग्राऊंड टाक्या असल्यामुळे काय होत की, तिथे पाणी पहिल जात त्यामुळे तिथल्या नागरिकांना पाणी मिळत नाही. तर, मी साहेबांना सुचना केली होती. एकतर मंदिरासाठी वेगळी लाईन द्या. तीन मंदिर बाजू-बाजूला आहे.

ह्याच्यामधुन ह्याच नागरिकांना, रहिवाशियांना पाणी मिळते. त्याच लाईन वर मंदिराची लाईन आहे. तर त्याच्यामुळे काय होत की, अंडर ग्राऊंड टाकी तिथे खोदल्यामुळे पाणी तिथे पहिल जाते. वरच्यांना पाणी चढत नाही. फक्त आमची तीच सुचना होती. बाकी काही नव्हती.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ९९ ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. :- ९९**

निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ८८ :-**

१) दि.२७/११/२००९ रोजीच्या दै. फ्री प्रेस जरनल, दै. हमारा महानगर व दै. समाधी प्रकाश या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या विषयांकीत जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

मिरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील जनता नगर रोडवरील पोद्दार हायस्कल ते हनुमान मंदिर (गणेश देवल नगर) येथे पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.
(अंदाजित रक्कम रू.३९,४५,९८१/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. एस.एन. एंटरप्रायजेस** | **४.९४ % ज्यादा दराने (वाटाघाटीअंती ३.९४ % ज्यादा दराने)** |
| मे. संदेश डी. बुटाला | ८ % ज्यादा दराने |
| मे. राजेश एन. विशे | १० % ज्यादा दराने |

२) दि.०६/१२/२००९ रोजीच्या दै. फ्री प्रेस जरनल, दै. खबरे आज तक व दै. समाधी प्रकाश या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या विषयांकित जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात फायर हायड्रंट पुरविणे व बसविणे.
(अंदाजित रक्कम रू.४९,८०,०००/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **मे. के. अे. पाटील** | **४.७५ % ज्यादा दराने (वाटाघाटीअंती २.९५% ज्यादा दराने)** |
| मे. संदेश डी. बुटाला | ८ % ज्यादा दराने |
| मे. एस.एन. एंटरप्रायजेस | १२ % ज्यादा दराने |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ च्या कामाकरीता मे. एस.एन. एंटरप्रायजेस व अ.क्र. २ च्या कामाकरीता मे. के. अे. पाटील यांचे दर लघुत्तम आहेत सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १००, <u>मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)</u> - महानगरपालिका सन २००९-१० ची दैनंदिनी छपाई करणे.

**जुबेर इनामदार :-**

११२ रू. कशासाठी आहे?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

साहेब डायरीसाठी आहे.

**अनिल सावंत :-**

१९२ रू.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यावर डायरी कुठे दिली? डायरी छापणार म्हणुन.

**मा. आयुक्त :-**

दैनंदिनी दिले.

**जुबेर इनामदार :-**

दैनंदिनी म्हणजे छपाई करणेकामी.

**मा. आयुक्त :-**

दैनंदिनी म्हणजे कॅलेंडर म्हणतात.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

त्याला दिनदर्शिका म्हणतात. दैनंदिन म्हणजे डायरी. ह्याच्यामध्ये आणखीन कोणाच्या निविदा आल्या होत्या. कारण, गेल्या वेळी तुम्ही लोकांनी एवढा घोळ घातला होता. मा. आयुक्त साहेब गेल्यावेळी डायरी छापल्या होत्या तेव्हा तुम्ही नव्हते. खाली मारामारी व्हायची पाळी आली होती. पत्रकारांच्या कंम्प्लेंट, पदाधिकारांच्या कंम्प्लेन्ट एवढ घोळा घातला होता.

**शरद पाटील :-**

नांही साहेब, तीन-दोन महिन्यापर्यंत असु द्या. पण त्यावेळेला मा. सभापती साहेबांनी दिलेल रूलिंग आहे की, ह्या डायरीचे पैसे द्यायचे नाही. तर ते दिले की नाही. त्याच अगोदर स्पष्टीकरण करा.

**चंद्रकांत मोदी :-**

डायरी मे फोन नं. भी गलत रहता है।

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

साहेब, मागचे पैसे दिले.

**शरद पाटील :-**

का दिले. आम्हाला डायऱ्या मिळाल्या नाही. त्या डायऱ्या चुकीच्या होत्या म्हणून देणे बंद केल्या होत्या.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेबांनी देवू नका असे सांगितल होत.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेबांच रूलिंग होत. आम्ही त्याच्यावर ऑब्जेक्शन घेणारे कोण.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

सचिव कार्यालय मध्ये डायऱ्या दिल्या होत्या.

**शरद पाटील :-**

तुमच्या माहितीसाठी सांगतो. त्या डायरीमध्ये चूक होती म्हणून त्या डायऱ्या दिल्या नाही. नंतर देण्याच्या बंद केल्या.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

साहेब, नंतर वेगळ्याच छापल्या. दुरूस्ती केल्या.

**शरद पाटील :-**

आम्हाला नंतरच्या डायऱ्या आल्या नाही. त्यावेळेला मा. सभापती साहेबांच रूलिंग होत.

**अनिल सावंत :-**

प्रुफ आणा. स्थायी समिती समोर अप्रुव करू.

**मा. आयुक्त :-**

त्या चुका काढल्या होत्या. त्या चुका दुरूस्त झाल्यानंतर डायऱ्या वाटप केल्या.

**शरद पाटील :-**

आम्हाला डायऱ्या दिल्या नाही.

**मा. आयुक्त :-**

दाखवा. चूका होत्या म्हणून पेमेंन्ट करू नका. दुरूस्त झाल्यानंतर पेमेन्ट करा अस झाल होत.

**शरद पाटील :-**

साहेब पेमेन्ट करूच नका. त्यांनी डायऱ्या दिल्याच नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

दुरूस्तीला पेमेन्ट करूच नका.

**मा. आयुक्त :-**

दुरूस्त झाल्यानंतर पेमेन्ट करा.

**अनिल सावंत :-**

ह्याच्यामध्ये तुमच्या दिनदर्शिका आहेत का?

**मदन उदितनारायण सिंह :-**
उनलोग डायरी लेट करेंगे?
**अनिल सावंत :-**
गलत करनेसे अच्छा है लेट करने दो।
**मदन उदितनारायण सिंह :-**
आपल्या जवळ प्रुफ आला आहे का?
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
प्रुफ आला आहे.
**मदन उदितनारायण सिंह :-**
तुम्ही कधी दाखवणार ?
**अनिल सावंत :-**
पुढच्या स्थायी समितीच्या मिटिंगमध्ये घेवून या.
**शरद पाटील :-**
तुम्ही डायरीच ऑक्टोंबर महिन्यातच आणायला पाहिजे. नंतर जानेवारी पर्यंत आमच्याकडे यायला पाहिजे. मा. सभापती साहेब, मागच्या डायरीच पेमेन्ट दिल असेल तर ते योग्य नाही. ते पेमेन्ट दयायला नाही पाहिजे.
**मा. आयुक्त :-**
पेमेन्ट दयायला नाही पाहिजे हा स्टॅण्डींग कमिटी चा विषय होवू शकत नाही. ज्या वेळेला तुम्ही चूका काढल्या होत्या. काय झाल चूका काढल्या. चूका दुरूस्त झाली. तर पेमेन्ट करण अस कस होईल.
**शरद पाटील :-**
डायऱ्याच वाटल्या नाही. कसल्या चुका दुरूस्त झाल्या. डायऱ्याच दिलेल्या नाही.
**मा. आयुक्त :-**
डायऱ्या कोणाकोणाला दिल त्यांच्या सहिच कागद दाखवा.
**अनिल सावंत :-**
स्थायी समितीच्या सभापती साहेबांना डायऱ्या दिल्या नव्हत्या.
**मा. आयुक्त :-**
त्यांना सह्या दाखवा.
**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**
दाखवतो साहेब.
**मा. आयुक्त :-**
त्यांना द्यायच कस राहिल?
**शरद पाटील :-**
डायऱ्या द्यायच्या बंद केल्या. त्या चुकीच्या आहेत म्हणून बंद केल्या.
**अनिल सावंत :-**
सभापती साहेबांना डायरी मिळाली नव्हती.
**शरद पाटील :-**
स्टॅण्डींग कमिटी त्या काही सदस्यांना २५-२५ डायऱ्या गेल्या. नंतर डायऱ्या गेल्या नाही.
**मा. आयुक्त :-**
नंतर केलेली डायरी आणि चूकीची डायरी, हे दोन्ही कंम्पेरिजन करून त्यांना द्या.
**मा. सभापती :-**
प्रकरण क्र. १००. पुढच्या स्थायी समिती सभेमध्ये सदरचा विषय घेवून येण्यात यावा. भाईंदर पूर्वेच वन वे चा रस्ता जो पोलिस स्टेशन ने आपल्याकडे दिलेला आहे. त्याचा गोषवारा खांबित साहेबांनी ह्या ठिकाणी आणलेला आहे. तर सचिव साहेब तुम्ही गोषवारा वाचून दाखवा.
**अनिल सावंत :-**
साहेब ठिक आहे. गोषवारा आता दिला. पण त्याच्यावर आमचे भाईंदर ईस्टचे जे नगरसेवक आहे.
**मा. सभापती :-**
आम्ही फिरून संपूर्णपणे ती माहिती वैगेरे घेवून त्याच्या पध्दतीने केलेल आहे.
**मदन उदितनारायण सिंह :-**
हा विषय पूढच्या मिटिंग मध्ये घ्या.
**मा. सभापती :-**
ठिक आहे. विषय तहकुब करून पुढच्या मिटिंगमध्ये घेवू.

**मा. आयुक्त :-**

कोकण मराठी साहित्य संमेलन आहे. सगळ्या संस्थानी आता पर्यंत सगळ्यांना देणगी दिलेली आहे आपली राहिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही भाईंदर ईस्टचे नगरसेवक आहात. तर तुम्ही ह्याचा पूर्ण सर्व्हे केलेला आहे ना.

**मा. सभापती :-**

चांगल्या पैकी अभ्यास झालेला आहे. इन्सपेक्टर भेटलेले आहे. ह्याच्यामध्ये शिल्लक काही नाही. भरपूर नगरसेवकांना विश्वासात घेतलेल आहे. आणि त्याच पध्दतीने इन्सपेक्टर साहेबांनी आपल्याकडे ठराव पाठवलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

परत ह्या विषयामध्ये कोणाचा विरोध होता कामा नये.

**अनिल सावंत :-**

ठिक आहे. रितसर विषय घेवून याना.

**मा. सभापती :-**

हा विषय घ्यायला आता ते थोडस राबवतात. त्यांच काम चालू झालेल आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, कस आहे की, ह्याला कोणाचा विरोध नाही. पण, तुम्ही जरा अभ्यास करून बघितल तर बर आहे. आता मंजुरी दिली नंतर पुन्हा त्याच्यावर वादविवाद झाला तर .....

**दिपक खांबित :-**

हे पेपरला प्रसिध्द करणार.

**मा. आयुक्त :-**

पेपरला प्रसिध्द करून ऑब्जेक्शन सेशन म्हणून.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब, गोषवारा आणलेला आहे. तर ह्याच्यात आपली काही सूचना आहे का? जर आक्षेप असेल तर द्या.

**अनिल सावंत :-**

आपण पेणकर पाड्याच केल. आणि स्थानिक नगरसेवकांना माहितच नाही.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. हा विषय पूढच्या मिटींगमध्ये ठेवा.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, मागच्या स्थायी समितीच्या मिटींगला आपले जे सी.एफ.सी. डिपार्टमेंट आहे. कम्प्युटरच तर त्यांनी सांगितल होत की, मिरा गांवला कम्प्युटराईझड रिसिट फाडण चालू होईल. पूढच्या मिटींग पर्यंत तर ते चालू झाल का? मला कालचा रिपोर्ट असा आहे की, ते अजून मॅन्युयलच फाडतात. चार दिवस झाले रिसिट अजून मिळालेले नाही. चेक दिलेले आहेत. तुम्ही चुकिच प्रॉमिस स्थायी समितीला करू नका ना. ८ दिवस झाले. ८ दिवस झाले चेक दिलेला आहे. प्रॉपर्टी टॅक्सचा अजून रिसीट मिळाली नाही. त्यांना वेळच नाही.

**मा. आयुक्त :-**

टेंडर काढल पण केबल टाकायचा आहे.

**अनिल सावंत :-**

जरा फास्ट करून बघा. तिथे फार त्रास होतो.

**मा. आयुक्त :-**

टेंडर यायला ७ दिवस लागतात. टेंडर आल्यानंतर फोडायच आणि करून घ्यायचे. मागवलेले आहे सॅन्शन पण झालेल आहे.

**अनिल सावंत :-**

आपण पेणकर पाड्याच केल. आणि स्थानिक नगरसेवकांना माहितच नाही.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. हा विषय पुढच्या मिटिंगमध्ये ठेवा.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, मागच्या स्थायी समितीच्या मिटींगला आपल जे सी.एफ.सी. डिपार्टमेंट आहे. कम्प्युटरच तर त्यांनी सांगितल होत की, मिरा गांवला कम्प्युटराइझ रिसीट फाडण चालू होईल. पूढच्या मिटिंग पर्यंत तर ते चालू झाल का? मला कालचा रिपोर्ट असा आहे की, ते अजून मॅन्युयलीच फाडतात. चार दिवस झाले रिसीट अजून मिळालेली नाही. वेळ दिलेले आहेत. तुम्ही चुकीच प्रॉमिस स्थायी समितीला करू

नका ना. ८ दिवस झाले. ८ दिवस झाले चेक दिलेला आहे. प्रॉपर्टी टॅक्सचा अजून रिसीट मिळाली नाही. त्यांना वेळच नाही.

**मा. आयुक्त :-**

टेंडर काढल पण केबल टाकायचा आहे.

**अनिल सावंत :-**

जरा फास्ट करून घ्या. तिथे फार त्रास होतो.

**मा. आयुक्त :-**

टेंडर यायला ७ दिवस लागतात. टेंडर आल्यानंतर फोडायच आणि करून घ्यायचे. मागवलेले आहे. सॅन्शन पण झालेले आहे.

**अनिल सावंत :-**

तिथल्या स्टाफला ट्रेनिंग वैगेरे आहे का?

**मा. आयुक्त :-**

फक्त टाकायला ऑर्डर द्यायची आहे. ट्रेनिंग आहे.

**मा. सभापती :-**

मॅडम, आपण आश्वासन दिल ना. तर त्याची पूर्तता करा. मग, आपल्याला त्रास होणार नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

मा. सभापती साहेब, ह्या विषयाला धरूनच बोलते. राई ते उत्तन पर्यंत पण करण्यात यावा.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, दुसर अस आहे की, अतिक्रमणाचा जो आढावा आहे. मगाशी आपल्या डी.एम.सी. ने सांगितल की, वॉर्ड ऑफीसर प्रत्येक दिवसाचा तो रिपोर्ट आयुक्तांना देतात. तर, माझी अशी विनंती आहे की, गेल्या तीन महिन्याचा जो रिपोर्ट आहे तो पूढच्या स्थायी समिती समोर ठेवावा. कारण, शहरामध्ये अतिक्रमणा विरोधात जी मोहिम आहे ती पूर्णपणे थंडावलेली आहे. फेरिवाल्यांना जरी उचलायला सांगितल तरी आपले कर्मचारी आम्हाला सांगतात की, तुम्ही जरा पोलिस बंदोबस्त द्या. नगरसेवक पोलिस बंदोबस्त कुठून देणार. आणि त्या फेरिवाल्यांना उचलण्यापूर्वी त्या फेरिवाल्यांला माहित असत की, कोणी कंम्प्लेन्ट केली? त्यांना फेरिवाल्याला सांगतात तुम्ही जरा नंगरसेवकांना भेटा. हा प्रकार बरोबर नाही ना, जिथे आपण नो हॉकर झोंन ठेवलेल आहे. तिथे फेरिवाले उघड-उघड धंदा करतात. ठराव होवून त्यात इम्प्लीमेन्टेशन होत नाही.

**मा. सभापती :-**

राऊत साहेब, ३ महिन्याचा आढावा घेवून पूढच्या सभेमध्ये विषय ठेवा. गोषवारा सह ठेवा.

(सदर विषय मा. सभापतींच्या आदेशाने तहकुब करण्यात आला)

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. १०१, <u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची “ड” मधील प्रकरण दोन(एक)(के) अन्वये प्रस्ताव -</u>** तीसरे ठाणे जिल्हा कोकण मराठी साहित्य संमेलनास अनुदान देणेस मंजूरी मिळणेबाबत.

**अनिल सावंत :-**

कोकण मराठी साहित्य परिषदेचे तीसरे ठाणे जिल्हा कोकण मराठी साहित्य संमेलन दि. ०९ व १० जानेवारी २०१० रोजी होत आहे. या संमेलनास राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर साहित्यीक, नाटककार, कवी आदी उपस्थित राहणार आहेत. संमेलनातून आपले साहित्य जनेतसमोर ठेवण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद हे उततम व्यासपिठ आहे. त्या कोकण मराठी साहित्य परिषदेस अंदाजे रु. १० लाख खर्च अपेक्षित असून परिषदेस आर्थिक निकड असल्याकाराणाने अंबरनाथ नगरपरिषदेने २ लाख रु. देण्याचा ठराव पारित केलेला आहे. त्या अनुषंगाने कोकण मराठी साहित्य परिषद यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेजवळही मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यात होणाऱ्या तीसऱ्या ठाणे जिल्हा कोकण मराठी साहित्य संमेलनास मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून रु. २ लाख अनुदान अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सदर ठरावाल माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहब, अपने गोल्डन नेस्ट के गटर मे गिरके जो लडका मर गया था। उसको भी महानगरपालिका के तर्फे २ लाख रू दिया जाये।

**जुबेर इनामदार :-**

साहेब हा विषय त्यांनी काढलेला आहे. पैसे नंतर द्या. ज्या कारणाने झाले त्या विषया बद्दल आपण काय केले. तुम्ही भुमिका काय घेतली.

**मा. आयुक्त :-**

आरोग्य विभागाने, बांधकाम विभागांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्यांच मुळ उत्तरा मध्ये चाललेले आहे. ते चेम्बर्स बसवल्या बरोबर तिसऱ्या चौथ्या दिवशी चोरी करून काढून नेतात.

**शरद पाटील :-**

साहेब बरोबर आहे. पण, हे जे चेम्बर्स झाकण चोरी होत गेली. एवढ मजबूत झाकण असत ते कापून चोरी करून नेतात. त्यांच्यावर पण काहीतरी कारवाई झाली पाहिजे ना.

**मा. आयुक्त :-**

कारवाई करण्याचा आणि गुन्हा दाखल करण्याचा ज़वळ-जवळ आम्ही २५-३० पत्र दिलेले आहे.

**शरद पाटील :-**

बरोबर आहे. पण आपल्याला अजून एक ही गुन्हेगार मिळालेला नाही.

**मा. आयुक्त :-**

एवन आपण भंगारवाल्याचा मालासह त्यांना पकडून दिलेल आहे.

**शरद पाटील :-**

तरी सुध्दा त्यांच्यावर काही कारवाई झालेली नाही. मग का होत नाही. त्याचा पाठपुरावा कराना. यात बदनामी महापालिकेची होते. आणि महापालिकेची झाल्या नंतर नगरसेवक ह्याचा कारणीभूत असतात आणि नगरसेवक लोकांच्या शिव्या खातात. साहेब आमच्या इथे मजबुत झाकण होत ना. ते कापून नेल. रस्त्याच्या मधोमध होत.

**अनिल सावंत :-**

साहेब त्याच्यावर पर्याय काय?

**शरद पाटील :-**

साहेब, फायबरच बसवा किंवा कसल ही बसवा. फायबरच बसवल्यानंतर तुम्ही काय करणार.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

तुटत नाही.

**अनिल सावंत :-**

फायबरच बसवल. आणि त्याच्यावर गाडी गेली तर ते टिकेल का? बस गेली तर टिकेल का?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

हो. टिकेल.

**अनिल सावंत :-**

ह्याच्या पूर्वी का नाही केल? कधी पर्यंत ते बसवणार?

**शरद पाटील :-**

साहेब, ह्याच्यावर माझी सूचना आहे. फायबरच बनवल्यानंतर सुध्दा माझी सुचना आहे. एकतर त्या झाकणाला महापालिकेचा सिमबॉल पाहिजे. आणि त्या झाकणावर नंबर पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सिमबॉल आणि नंबर टाकायला लावलेले आहे. बनवायला सेप्रेट लावलेले आहे.

**शरद पाटील :-**

नंबर नसतील ना. साहेब तुम्ही सांगतात चोर नेतात तर ते चोर येत नाही. हे ठेकेदारच येथून काढून तिथे लावतात.

**मा. आयुक्त :-**

तुमच हे म्हणन पूर्ण खोट आहे. कारण दारू पिणारे, चरस गांजा ओढणारे संध्याकाळच्या टाईमाला घेवून जातात.

**शरद पाटील :-**

बरोबर आहे. पण आपल्याला एकदा पण कोण मिळाल नाही.

**मा. आयुक्त :-**

आमचा ठेकेदार काढून दुसरीकडे लावणार. तिथल काढून नेवून तिथे लावणार.

**शरद पाटील :-**

साहेब एकाच्यावर पण अजूनपर्यंत कारवाई झाली नाही. एवढी झाकणे चोरी होतात.

**मा. आयुक्त :-**

आरोग्य अधिकारी, आणि सॅनेटरी इन्सपेक्टर आणि मुक्काम त्या सगळ्यांनी भंगार वाल्यांची दुकान चेक करायची. तिथे आपला माल सापडला तर दुकानदारावर गुन्हा दाखल करा.

**चंद्रकांत मोदी :-**

छक्कन की तो ठिक बात है। खांबित साहब को भी मालुम है। इंजिनियर तांडेल साहब को भी मालूम है। सेक्टर ७ मे वॉर्ड मे पूरा स्लॅप १५ दिन के अंदर मे निकाल के लेके गया। उसका स्टिल रहता है वह।

**शरद पाटील :-**

साहब, जय अम्बे इन्डस्ट्रीज मधुन एका ठेकेदाराने टेम्पोच्या टेम्पो भरून झाकण काढून न्यायला लावली होती ती लावली होती. आणि तिथे दुसरी झाकण लावा. ती म्हणुन नविन झाकण काढून तो घेवून जातो. तेव्हा आम्ही त्याला तिथे पकडला.

**अनिल सावंत :-**

ठेकेदार कोण आहे?

**दिपक खांबित :-**

साहेब दिड वर्षा पूर्वीच आहे. पोलिस स्टेशनला आपण ती गाडी पकडून दिली होती. आझाद नगरच्या इकडची होती. त्यांना अरेस्ट केल होत. नंतर २-३ दिवसाने सोडून दिल.

**जुबेर इनामदार :-**

फिर्यादी कोण होत ?

**मा. आयुक्त :-**

पण, आपला अधिकारी पोलिस स्टेशनला जाऊन गुन्हा दाखल करायला पाहिजे ना.

**जुबेर इनामदार :-**

फिर्यादी कोणाची होती? महापालिकेची होती ना.

**अनिल सावंत :-**

ह्याच्यापुढे काळजी घ्या.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या स्थायी समिती मिटींगपूर्वी सॅनेटरी इन्सपेक्टर, मुकादम, आणि आरोग्य अधिकारी यांनी प्रत्येक भंगार वाल्यांच्या दुकानात तपासायला जायच आहे. आणि महापालिकेची साहित्य सापडल्या बरोबर गुन्हा दाखल करायचा आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब, त्या कॉन्ट्रॅक्टरच काम बघा. तो स्लॅप विरघळला. तोडून नेलेला नाही सन्मा. सदस्य मोदी साहेब जे सांगतात. ते ८ महिन्याच्या आत तो स्लॅप विरघळलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

निकृष्ट दर्जाच बांधकाम.

**मा. आयुक्त :-**

निकृष्ट दर्जाच बांधकाम असेल तर त्या कॉन्ट्रॅक्टर वर फौजदारी गुन्हा दाखल करा.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, मला पण बोलायच आहे. फायबरच आपण बोललोय. तर आपण सॅम्पल मागवा. सर्वांना दाखवा. त्यानंतर मंजुर करून कामाल लागु दे. विषय आणायचा आणि परत टाकायचा " ये रे माझ्या मागल्या" असे होता नये. तर लगेच निर्णय घ्या.

**मा. आयुक्त :-**

फायबरच बनवायला दिलेल आहे. मिरा भाईंदर महापालिकेच नाव त्यावर येणार. आणि नंबर पण येणार.

**बर्नड डिमेलो :-**

नंबर नाव हे झाल. पण त्याची कॉलेटी टिकाऊ आहे की नाही. जस टेंडरच निविदा मागवता तस सॅम्पल मागवा कोणाकोणाच आहे ते.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**जुबेर इनामदार :-**

खांबित साहेब, फायबरचे झाकण हे रिजेक्ट पी.व्ही.सी. मध्ये तयार केले जातात. त्याची मनिमय साईज स्लॅप व्हाईट असायला पाहिजे. थिकनेस दुसरी गोष्ट म्हणजे इंन्टरलॉक सिस्टम म्हणजे त्याच्या चाव्या आपल्याकडेच असतील. किंवा आतल्या डिपार्टमेन्ट कडे चाव्या असतील. अशा प्रकारे त्या रेडी होतात. आपण चावी टाकणार तरच ते उघडले नाही तर ते उघडणार नाही.

**दिपक खांबित :-**

पण हे आपल्याला कुठे करायला लागतील जिथे नविन काम करायची आहे. आणि जिथे झाकण गेलेली आहे तिथे भरावी लागणार.

**अनिल सावंत :-**

आपण त्याची स्टॅण्डर साईझ नाही ठेवू शकत.

**दिपक खांबित :-**

स्टॅण्डर साईझ ठेवू शकतो ना.

**जुबेर इनामदार :-**

सध्या आपल्याकडे जी काम चालू आहेत 2½ x 3 चे स्टॅण्डराईझड काम बहुतेक केलेली आहे. ऑलमोस्ट होत आलेली आहे. त्याची सध्या तात्पुर्ती ५०,१०० झाकण प्रत्येक प्रभाग कार्यालय मध्ये ठेवा. प्रॉब्लेम कसा होतो आम्ही ऑर्डर दिल्यानंतर किंवा आम्ही सांगितल्यानंतरच तुमचा बांधकाम विभाग, ऑर्डर प्लेस करतो नंतर ते झाकण येतात.

**दिपक खांबित :-**

साहेब, १००-१०० झाकण दिलेली आहेत.

**मा. सभापती :-**

मेने कमिशनर साहब को भी लेटर दिया है। जो पाणी के बारे मे अपने मिरा भाईंदर के पेपर मे बहोत न्युज आयी थी। दुसरा गटर के बारे मे की, गटर मे बच्चा गिरा उसके बारे मे कडक कारवाई अपने अधिकारी के उपर होनी चाहिए।

**मा. आयुक्त :-**

टॅकर का पाणी उन्होने लिया। टॅकर हमने उठाके लाया। पाईप उठाके लाया। कॉर्पोरेशन का पाणी पिया। और कुछ हो गया तो हम जिम्मेदार है।

**मा. सभापती :-**

साहेब टॅकरच पाणी या शहरामध्ये आल. पेपमध्ये जी न्युज येते. टॅकरच पाणी मागवल्यामुळे.

**मा. आयुक्त :-**

टॅकरच आणु नका. महापालिकेचे आणा.

**मा. सभापती :-**

पेपरमध्ये न्युज आली मिरा भाईंदरच्या दूषित पाण्यामुळे मृत्यु झाला. साहेब, बाहेर कोणाला माहीत तुम्ही त्या टॅकरवाल्यावर कारवाई करा. त्यानी पाणी कुठून आणल?

**मा. आयुक्त :-**

साहेब, ते सगळ विश्लेषण झाल. टॅकर जप्त झाले, पाईप लाईन जप्त झाली. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला.

**मा. सभापती :-**

यस. आम्हाला हे पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही मुलाखत दिलेली आहे. टॅकरच पाणी प्यायल्यामुळे गॅस्ट्रो निर्माण झाला.

**अनिल सावंत :-**

ते टॅकरच पाणी होत. म्युनिसिपाल्टीच पाणी नव्हत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

के अन्वये प्रस्तावाचे ठराव मांडला.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

ठराव आहे ठिक आहे. आपण मदत देतो. पण त्या कुटूंबानी तुमच्याजवळ मदत मागितली आहे का?

**मदन उदितनारायण सिंह :-**

हो. माझ्याकडे त्यांनी दिलेले पत्र आहे.

**अनिल सावंत :-**

ते पत्र कुठे आहे.

**मा. आयुक्त :-**

मदत सभासदांनी मागितलेली आहे. कुटूंबानी मागितलेली नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मी कुटुंबियांच पत्र आणल आहे.

**शरद पाटील :-**

आमदार साहेबांनी पण पत्र दिलेल आहे.

**अनिल सावंत :-**

डायरेक्ट अपघात झाला आहे आणि तुम्ही लगेच मदत देतात. मुंबईमध्ये तीन जण मेले. मुंबई महानगरपालिकेच बजट १२ हजार करोड रू. आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, आपण असे कितीतरी मदत दिलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, विषय मा. महासभेमध्ये चर्चेला घ्या.

**अनिल सावंत :-**

म्हणजे त्याचा पूर्ण उहापोह होईलन ना.

**मा. आयुक्त :-**

द्यायच नाही अस आमच म्हणन नाही.

**अनिल सावंत :-**

द्यायच नाही अस नाही. त्याला द्या. पण, पुढे त्या कुटूंबाच .....

**मा. आयुक्त :-**

त्या कुटूंबाच पत्र आहे का एवढ सांगा?

**मदन उदितनारायण सिंह :-**

पत्र आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही सभासदांना उत्तर दिलेल आहे. की, हा विषय पुढील मा. महासभेमध्ये ठेवू.

**अनिल सावंत :-**

कोकण संन्मेलन केवढा मोठा विषय आहे. असे अपघात किती होतात.

**मा. आयुक्त :-**

त्यांच म्हणन काय आहे की, १२ हजार कोटी रू. बजट असलेल्या आणि आपली २१० कोटीची याचा विचार करून करा.

**अनिल सावंत :-**

आम्हाला त्या कुटूंबाची सहानुभूती आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

त्यांनी ५ लाख रू. ची मागणी केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य मदन सिंग साहेब, कानपूर मध्ये मुलगा मेला. तोही नाल्यामध्ये पडुन मेला. मुंबई सारख्या महानगरपालिकेने अजुन पर्यंत अशा प्रकारचा निर्णय घेतलेला नाही. आपण त्यांच बरेच मागे आहोत. हा विषय मा. महासभे समोर चर्चेत जावू द्या.

**अनिल सावंत :-**

हा विषय पूढच्या मिटिंगमध्ये घेवू या.

**मा. सभापती :-**

बी.पी. रोडला शाळेची एक मुलगी वारली. आपल्या सुमोच्या गाडीच्या खाली. १५ दिवस झाले. तो विषय आम्ही दिला. मालक येवून भेटले होते त्यांना मदतीसाठी १३ वर्षाची मुलगी तो ही विषय मा. महासभेत घेतलेला आहे. हा विषय मा. महासभेतच ठेवा. ह्या बाबतीत धोरण ठरवायला लागतील.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, २ लाख रू. मागितले आणि २ लाख रू. द्यायचे अशातला भाग नाही ना.

**अनिल सावंत :-**

मा. महासभेमध्ये झालेल आहे. चर्चा वैगेरे झालेली आहे. आता तुम्ही घाई-घाईने निर्णय घेण्यापेक्षा पूढच्या स्थायी समितीच्या मिटींगमध्ये घ्या. आणि शहरामध्ये अशा घटना किती घडल्या ते बघा.

**मा. आयुक्त :-**

२ विषय आणा. एक तर महापालिकेच्या गाडी खाली शाळेची मुलगी मेली. आणि हा विषय बघा.

**शरद पाटील :-**

हा विषय मा. महासभेमध्येच घ्या.

**मा. आयुक्त :-**

अस नाही. स्टॅण्डींग कमिटीचे काउन्सीलर हे मा. महासभेचे सदस्य आहेत. आणि ही मेन फायनाशिअल समिती आहे. त्यामुळे इथे मंजूर केली तर तिथे विषय ठेवायची जरूरी नाही.

**मा. सभापती :-**

पाटील साहेब. ते दोन्ही विषय आपण पूढच्या स्थायी समितीमध्ये घेवू.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मैने एक लेटर दिया था। इस लेटर से वह बिल्डर आके मुझे पैसा देदे। मैने महापालिकाकी जमिन बचाने के लिए लेटर दिया था। तो उसने आपके अधिकारीयोने क्या उत्तर दिया है वह देखिए। ऐसे गैर जबाबदार अधिकारीयो पर कारवाई करणी चाहिए। मैने लिखा था की जेसल पार्क चौपाटी पे सेट बिल्डरद्वारा जो अतिक्रमण हो रहा है। एक तो पूरे मिरा भाईंदर मे एक ही जैसल पार्क चौपाटी है। और उस जैसल पार्क चौपाटीपर एक ही अतिक्रमण हो रहा है। तो अधिकारीने जबाब क्या दिया। एक उदा. है। मुझे लगता है की जितने ८४ नगरसेवक है उन सभी को इसी तरह के उत्तर आते होंगे तो आप पढीए। (पत्राचे वाचन केले.)

**मा. आयुक्त :-**

त्यांनी विनंती म्हटले ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

इसको फाडके फेकू मै।

**मा. आयुक्त :-**

वह बात नही। उन्होने क्या बोला की, इन्क्रोचमेन्ट हुआ है तो प्रभाग समिती मे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

नही नही, मतलब अपने नगररचना के अधिकारी को यह जरूरत ही नही की, हम महापालिका के हित की बात कर रहे है। और वह हमसे पुछ रहे है। सर्व्हे नं., गांव नं., मौजे नं., और बाप का खानदान सब निकालकर लाओ। और अधिकारी बैठे रहे। उनको पडी नही है क्या।

**मा. आयुक्त :-**

उनकी भी जिम्मेदारी है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो फिर ऐसे उत्तर देनेवाले अधिकारी पर क्या कारवाई करोगे। नही तो हमलोग छोड देंगे। आज के बाद स्टॅण्डींग मे आयेंगे ही नही। ऐसा उत्तर अधिकारी देते है। ऐसा उत्तर देने की हिम्मत कैसे करते है।

**उत्तरेश्र्वर लोंढे :-**

सदर इमारत ही ९० पासून आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

तिथे इमारत नाही.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

सी.व्ही. विभागाच्या इमारतीच्या मागे आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

नाही. सी.व्ही. इमारतीच्या मागे चौपाटीवरती.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

आपण माझ्या केबिनला आल्यानंतर संबंधित प्रभाग अधिकाऱ्यांना फोन केला होता. तेव्हा त्यांनी पण सांगितल की, त्या ठिकाणी ती कारवाई सुरू करत आहे. आणि गोखले साहेबांनी सांगितल की तिथे जे काही अतिक्रमणं आहे ते तोडून घेतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ते बरोबर आहे. पण असे उत्तर कसे देतात. की, गाव सर्व्हे, मौजे, खानदान लिहुन द्या. म्हणजे आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांची कर्मचाऱ्यांची जबाबदारी नाही का? त्यांना काही गरज पडलेली नाही का?

**मा. आयुक्त :-**

या पुढे असे पत्र आल्यानंतर अतिक्रमण आणि बिगर परवाना कारवाई परवानगीमध्ये बांधकाम असेल तर तुमच्या अधिकाऱ्यांना तोडायची ऑर्डर द्या. आणि टोटली इललिगली इंक्रोचमेट असेल तर पुढील कारवाईसाठी ह्यांच्याकडे मी पाठवले म्हणून कळवून टाका.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ती जागा महापालिकेची आहे.

**मा. आयुक्त :-**

अतिक्रमण काढण्यासाठी प्रभाग समितीकडे कारवाईसाठी पाठवलेली आहे असे कळवा ना.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

प्रभाग अधिकाऱ्यांना कळवलेल आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आमच्याकडून सर्व्हे, मौजे, गाव सर्व मागितल.

**मा. आयुक्त :-**

ह्यांच्याकडून सर्व्हे नंबर, मालक हे सर्व विचारू नका.

**मदन उदितनारायण सिंह :-**

हे आम्ही कुठेच तलाठी ऑफीसमध्ये सगळे जाऊन काढायच. तस विचारण्याची पध्दत.

**मा. आयुक्त :-**

तुमच म्हणन बरोबर आहे.

**चंद्रकांत मादी :-**

साहब, मेरा एक विनंती है। की, शहर के अंदर जो कचरा जलाया जाता है। मैने आपको भी बोला था। आपने मना किया था तो भी हमारे स्थानिक एस.आय है। मुकादम. तो आज भी धुवा निकलता है। आप सभीलोग देखनेके लिए जा सकते है। इतना ५ से ७ ट्रक का कचरा शहर के मेन रोड पे जल रहा हा। कब

आपत्कालीन को तकलीफ हो जायेगा। तो सेक्टर नं. २ के सामने ३ पूनम नगर मे अनेक वॉर्ड मे चर्चा किया। कांबले साहब को भी उनकेबारमे बोला। आज भी धुवा निकला है।

**जुबेर इनामदार :-**

साहेब, त्याला नागरिकच आग लावतात. पण त्याला पर्याय काय?

**मा. आयुक्त :-**

पालिकेची लोक काय आग लावत नाही.

**चंद्रकात मोदी :-**

साहब मेरे पास फोटो है।

**मा. आयुक्त :-**

अस असेल तर त्यांना सस्पेंन्ड करा.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, पण कचऱ्याच काय करतात.

**जुबेर इनामदार :-**

ठेकेदाराची लोक आहेत. सस्पेंन्ड काय करणार.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मोदी साहब, आपको कोण कर्मचारी मिले. जलानेवाले आपको कोई कर्मचारी मिले क्या?

**चंद्रकांत मोदी :-**

अजित मुकादम है उनको मालुम है । मैने खुद पकडा ।

**मा. आयुक्त :-**

कॉर्पोरेशन के स्टाफ जलाते है ।

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, ठेकेदारका आदमी। महानगरपालिकेका कर्मचारी नही।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मध्ये महाराष्ट्र टाईम्स पेपर मध्ये यांच पत्र आल होत की, लवकरात लवकर या पत्राच्या बाबतीत निर्णय घेतला जाईल. तर त्याचा काय निर्णय वैगेरे झाला आहे का?

**मा. आयुक्त :-**

महिन्याच्या अखेर पर्यंत निर्णय होईल.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, मागे मी स्थायी समिती सभापती साहेबांना पण पत्र दिल होत. आणि आपल्याला पण पत्र दिल होत. आता हे सन २००९-१० वर्ष संपले. १०-११ च्या बजट मिटींग चालू होतील. तर आजपर्यंन्तचे इनकम्स आहेत. जे आपण प्रोव्हीजन केलेले आहे. जमेची बाजू त्याच्या मध्ये प्रशासन कुठपर्यंत पोहचलेले आहे त्या रिकवरीमध्ये आणि जे अधिकारी त्या रिकवरीमध्ये त्या स्टेज पर्यंत पोहचू शकलेले नाही. त्यांच्यावर काय कारवाई केलेली आहे? त्याचा एक आढावा घेवून पुढच्या वर्षीच्या बजेट मिटींगच्या अगोदर किंवा अजुनही तुमच्याकडे तीन महिने आहे. आणि सेस बंद होवून ज्यावेळी ऑक्ट्रॉय सुरू झाला. त्यावेळी सेसची जी आऊट स्टॅण्डींग होती त्याची रिकवरी किती परसन्ट झालेली आहे? आणि ज्यांनी भरलेली नाही. त्यांच्यावर काय कारवाई केलेली आहे?

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब त्याच्यामध्ये तरतुद काय आहे? जमा आणि बाजूच प्रत्येक महिन्याच आहे की, प्रत्येक ३ महिन्याच आहे.

**नगरसचिव :-**

तीन महिन्याने आहे.

**जुबेर इनामदार :-**

तीन महिन्यामध्ये आहे ना. स्थायी समिती समोर सादर केल पाहिजे. आजपर्यंत केल नाही. पूर्ण वर्ष गेल.

**अनिल सावंत :-**

सेस च आऊट स्टॅण्डींग सांगा ना. किती आहे?

**नरेंद्र चव्हाण :-**

१२ कोटी ९१ लाख रू. वसुल झाली.

**मा. आयुक्त :-**

वसुली किती झाली ?

**नरेंद्र चव्हाण :-**

१२ कोटी ९१ लाख रू. एवढी वसुली झाली.

**अनिल सावंत :-**

२४ कोटी रू. आऊट स्टॅण्डींग होती.

**नरेंद्र चव्हाण :-**

२४ कोटी रू. पैकी १२ कोटी ९१ लाख रू. वसुली झाली.

**अनिल सावंत :-**

११ कोटी रू. च काय? किती महिने झाले जवळ-जवळ वर्ष होत आल.

**मा. आयुक्त :-**

या दोन महिन्यात ९१ लाख रू. वसुली झाली.

**अनिल सावंत :-**

मग, या मार्च पर्यन्त वसुली होणार. ११ कोटी रू.

**नरेंद्र चव्हाण :-**

३ कोटी रू. पर्यंत वसुली पाहिजे.

**अनिल सावंत :-**

३ कोटी रू. का? ११ कोटी रू. पूर्ण कराना. ऑक्ट्रॉय तर आपण ॲडव्हान्स मध्ये घेतो. सेसच प्रोव्हीजन.....

**जुबेर इनामदार :-**

जे वेळेवर पैसे भरत नाही त्यांना फाईन रेट किती आहे?

**नरेंद्र चव्हाण :-**

२ टक्के आहे.

**जुबेर इनामदार :-**

आणि घरपट्टी वर किती आहे?

**नरेंद्र चव्हाण :-**

घरपट्टी वर नाही.

**मा. आयुक्त :-**

घरपट्टीवर टक्के नाही. व्याज सुरू आहे.

**अनिल सावंत :-**

महाराष्ट्र राज्याने ज्यावेळी सेसच प्रोव्हीजन केल त्याच्यामध्ये एप्रिलचा सेस मे महिन्यामध्ये भरायचा तर तो किती दिवसाचा ग्रेस पिरेड होता. किती तारखेपर्यंत भरला पाहिजे.

**नरेंद्र चव्हाण :-**

१० मे ला भरला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

जर १० मे ला भरला नसेल किंवा रिटन फाईन केल नसेल तर त्या व्यापाऱ्या विरध्द काय कारवाईच प्रोव्हिजन आहे.

**नरेंद्र चव्हाण :-**

प्रोव्हिजन म्हणजे प्रॉपर्टी जप्त करणे.

**अनिल सावंत :-**

एक वर्ष झाल सेस भरलेला नाही. किती जणांविरूध्द तुम्ही गुन्हे दाखल केले? किती जणांच्या प्रॉपर्टी जप्त केलेल्या आहेत?

**नरेंद्र चव्हाण :-**

नाही.

**मा. आयुक्त :-**

का नाही केले?

**अनिल सावंत :-**

गुन्हे दाखल का नाही केले. मा. आयुक्त साहेब विचारतात. ते व्यापारी तुमचे कोणी नाते संबंधात आहेत का?

**नरेंद्र चव्हाण :-**

नाही.

**अनिल सावंत :-**

मग, गुन्हे दाखल का नाही केले? मग, तुमच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. जबाबदार अधिकारी तुम्ही आहात.

**मा. आयुक्त :-**

सगळ्यांना कारणे दाखवा नोटिस केलेले आहे की, तुम्हाला रिवाईन्ड का करू नये?

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ऑक्ट्रॉय चूकवल. आपण चेक नाका सोडला? तर ११ टक्का आपण ऑक्ट्रॉय वसुल करतो. तेच झाल की, नाही. वर्ष झाल सोडून. तर त्यांच्या विरोधात काय केल? आपल हे आर्थिक नुकसानच आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

सेसच्या संदर्भात जी कारवाई करायची आहे. त्याच्यामध्ये दोन भाग आहेत. पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी कम्पलसरी रजिस्ट्रेशन करून घेतले पाहिजे. आपल्याकडे अस झालेल आहे की, बऱ्यांचशा व्यापाऱ्यांनी किंवा जे सेसच्या संकल्पाने देत होते. ७५ हजार रू. पर्यंत टर्न ओव्हर होत अस बहुतांशी व्यापाऱ्यांनी रजिस्ट्रेशन करून घेतलेल नाही.

**अनिल सावंत :-**

मला एक सांगा की, हे जे ११ करोड रू. आऊट स्टॅण्डींग आहे. ते तुमचे रजिस्टर व्यापाऱ्यांचे आहेत की, अनरजिस्टर व्यापाऱ्यांचे आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

११ करोड रू. उत्पन्न हे आपण अंदाजित धरल होत. ह्याच्यामध्ये, सेसमध्ये जस आपण ऑक्ट्रॉयला सांगु शकतो की, माझ अमुक दिवसाला अमुक महिन्यामध्ये एवढ येणार आहे. अस आपल्याला काहीतरी ठोकताळा असतो. पुढचा मागचा त्याचा मागच्या वर्षाचा परंतु, तसा काही सेसमध्ये ठोकताळा नव्हता की, आपण अशा तऱ्हेनेच गेसवार करू शकतो. परत सेस भरण त्याच्यामध्ये काही मर्यादा ठेवलेल्या होत्या. अमुख एक टर्न ओव्हर असलेला व्यापारीच रजिस्ट्रेशन करायला पात्र आहे. तर हे दोन तऱ्हेच हे आहे. एकत्र रजिस्ट्रेशन केलेले नाही. त्यांनी रजिस्ट्रेशन का केल नाही. म्हणुन एक स्वातंत्र कारवाई करण अपेक्षित होत. आणि दुसरी त्यांच रजिस्ट्रेशन झालेल आहे. आणि आपण म्हणता त्याप्रमाणे एप्रिलचा मे मध्ये, मे चा जून मध्ये असा पध्दतीने ज्यांनी पेमेन्ट केलेल नाही. त्यांच्या विरूध्दची जी कारवाई करायची आहे. रजिस्टर व्यापाऱ्यांविरूध्द ही साधारणातः तरतुदी डायरेक्ट ट्रॅक्सप्रमाणे आहे. जेणे करून त्यांचे बुक व्हेरीफिकेशन करु शकता. त्यांच्या कार्यालयावर इन्स्पेक्शन करू शकता.

**अनिल सावंत :-**

ती प्रोव्हिजन सगळी माहीत आहे. कारवाई काय केली हा महत्वाचा प्रश्न आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आणि फक्त दोनच तऱ्हेचा सेस आहे तो आम्ही केला. एक किराणा व्यापारी आणि दुसरे जे ठोक व्यापारी असतात ते त्यांची मिटींग आम्ही मा. आयुक्त महोदयांच्या अध्यक्षते खाली काही दिवसांपूर्वी बोलवली होती. आपले माजी नगरसेवक त्यांच्या माध्यमातुन ते सर्व किराणा व्यापाऱ्यांचे असोसिएशन अध्यक्ष आहेत. तर त्यांना आपण एक लमसम ठरवून दिलेली आहे. अशा तऱ्हेचे आपल्याकडे सर्व साधारणपणे ८९० व्यापारी आहेत ज्यांनी सेस भरणे अपेक्षित आहे. किराणा व्यापारी. ठोक आहेत आणि किरकोळ आहेत.

**अनिल सावंत :-**

मग कंपनी वाल्यांनी सर्वांनी भरलेले आहे अस तुमच म्हणणे आहे का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

अस माझ म्हणण नाही. मी एक टिपीकल फक्त किराणा व्यापाऱ्यांच सांगतो.

**अनिल सावंत :-**

नो, यु आर प्रोसेसिंग इज किराणा व्यापारीज.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

बीकॉज ही वेअर कॉल्ड फॉर देअर मिटींग एन्ड ही हॅज.....

**जुबेर इनामदार :-**

ज्यांच्यामुळे जो वाद निर्माण झाला होता ते स्टील वाले आहेत.

**अनिल सावंत :-**

राउत साहेब, तुम्हाला कल्पना आहे का? स्टिल व्यापाऱ्यांनी एक महिना ना ऑक्ट्रॉय भरलेला आहे ना सेस भरलेला आहे. तत्कालिन जे आयुक्त होते. राजीव जाधव साहेब त्यांनी त्यांना बोलवून त्यांच्या जवळून रिकवरी महापालिका करेल असे स्थायी समितीमध्ये सांगितले होते. त्याच्यावर तुम्ही काय कारवाई केली? हे तर तुमच ऑफिशिअल झाल. ठोकतळ आपण बांधू शकत नाही. अस तुम्ही कस म्हणू शकता. एप्रिलमध्ये मी एका व्यापारी आहे या रिटर्न फाईल केल. तर त्याच अनुषंगाने प्लस मायनस १० टक्के असुन माझा मे चा सेस सुद्धा तेवढाच होणार आहे. इयरली बजेट साधारण तेच असत ना.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

*जी ॲडजेस्टमेंट करायची असते.*

**अनिल सावंत :-**

काय झालेल आहे की, प्रशासनाला या जमेच्या बाजुबद्दल काहीच पडलेल नाही. तुम्ही सेस ला एवढ लुझ सोडलेल आहे की, व्यापाऱ्यांना सुद्धा तुमची काही दहशत लागलेली नाही.

**जुबेर इनामदार :-**

बहुतेक व्यापाऱ्यांकडून ऑक्ट्रॉय जातो. मला एक सांगा. जेवढ्या लोकांनी आजपर्यंत सेसचे लायसन्स घेतल होत. तर एकाचही असेसमेन्ट केल होत का? त्यांनी भरले ते बरोबर भरलेले आहे की, नाही. नाही भरले असेल तर सोडून द्या.

**अनिल सावंत :-**

११ करोड रू. आउट स्टँडींग आहे. त्याचे पेनल्टी इन्ट्रेस्ट सर्व आउट स्टँडींग आहे. कोणाला काहीही पडलेल नाही.

**जुबेर इनामदार :-**

त्याला वाटल त्यांनी तसे भरले. त्याची जमा बाजू टाळेबंद खात्यामध्ये चेक केल का?

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, प्रॉपर्टी टॅक्स च्या बाबतीत जसे तुम्ही ८२ टक्के, ९० टक्के टार्गेट अचिव्ह केल होत. त्या बाबतीत ह्या सेसबद्दल सुद्धा तशाच हार्ड स्टेप्स घ्या.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, सेल्स टॅक्सची जी पद्धत आहे तीच राबवावी लागेल.

**अनिल सावंत :-**

आणि पुढच्या स्टँडींगमध्ये त्याचा आढावा घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अनिल सावंत यांनी हा जो विषय आता आणलेला आहे. तर मी आपल्या निदर्षनास थोड आणू इच्छितो काही व्यापारी हे सेस भरायला जातात. त्यांना अटीशर्तीचा अतोनात आपल्या अधिकाऱ्यांकडून त्रास होतो. माझ्याकडे याबाबतीमध्ये काही व्यापारी आलेले होते. ते लोक आपल्याकडे भरायला येतात. व्यापारी चांगले आहेत. हे स्वतःहून आपल्याला सांगतात. तर त्या बद्दल तुम्ही मिटींग घेउन इन्स्ट्रक्शन द्या मला वाटत नाही की, कोण पैसे भरत नाही.

**मा. आयुक्त :-**

किराणा व्यापारी संपवलेल आहे. आता तुम्ही जे स्टील व्यापाऱ्यांचे बोलता तर मी स्टील व्यापाऱ्यांना बोलवून घेतो.

**जुबेर इनामदार :-**

सर, त्यांच्यामुळेच हा सेस गेला. चोरीचा कारभार आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांच काय असत की, त्याच फक्त चिटोरे वर काय चाललेल असत. हिशोब ठेवत नाही. आपण जर रेकॉर्ड तपासायला गेलो तर त्यांच्याकडे रेकॉर्ड पण नसतो.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आमच्या काँग्रेस पक्षाची भुमिका होती की सेस काढू नका.

**मा. आयुक्त :-**

त्यांना बोलवून घेतो.

**जुबेर इनामदार :-**

हे चोऱ्या माऱ्या करणारे व्यापारी त्यांना पैसे भरायचेच नाहीत. त्यांना ह्या देशाचे नुकसान करायचं आहे. फक्त महापालिकेचेच नाही. सेस नाही भरायचा म्हणजे याचा अर्थ तोच झाला की, आपल्याला हिशोब द्यायचा नाही. हे बिल ठेवत नाही. बिल फाडत नाही. हे चोऱ्या करतात फक्त महापालिकेच नुकसान नाही तर पुर्ण देशात्र नुकसान करायचे त्यांना आधी बोलवा आणि त्यांना स्ट्रिक्टली रिकवरी करा.

**मा. आयुक्त :-**

करू. त्यांना बोलवून घेतो.

**ग्रिटा फॅरो :-**

मा. सभापती साहेब, माझ्या वतीने आणि बंधू स्टिवन आणि हेलन ह्यांच्या वतीने महापालिकेचे आयुक्त साहेब, सचिव साहेब, मा. सभापती साहेब, स्थायी समितीचे सदस्य पदाधिकारी व कर्मचारी वर्ग या सर्वांना आमचा नाताळचा सण सुखाचा, शांतीचा, समृद्धीचा व भरभराटीचा जावो. हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**अनिल सावंत :-**

धन्यवाद.

**प्रकरण क्र. १०१ :-**

**प्रकरण क्र. १०१, <u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन(एक)(के) अन्वये प्रस्ताव -</u>** तीसरे ठाणे जिल्हा कोकण मराठी साहित्य संमेलनास अनुदान देणेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ८९ :-**

कोकण मराठी साहित्य परिषदेचे तीसरे ठाणे जिल्हा कोकण मराठी साहित्य संमेलन दि. ०९ व १० जानेवारी २०१० रोजी होत आहे. या संमेलनास राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर साहित्यीक, नाटककार, कवी आदी उपस्थित राहणार आहेत. संमेलनातून आपले साहित्य जनेतसमोर ठेवण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद हे उततम व्यासपिठ आहे. त्या कोकण मराठी साहित्य परिषदेस अंदाजे रु. १० लाख खर्च अपेक्षित असून परिषदेस आर्थिक निकड असल्याकाराणाने अंबरनाथ नगरपरिषदेने २ लाख रु. देण्याचा ठराव पारित केलेला आहे. त्या अनुषंगाने कोकण मराठी साहित्य परिषद यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेजवळही मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यात होणाऱ्या तीसऱ्या ठाणे जिल्हा कोकण मराठी साहित्य संमेलनास मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून रु. २ लाख अनुदान अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**


**मा. सभापती :-**

मा. सर्व स्थायी समितीचे सन्मा. सदस्य मा. आयुक्त साहेब, मा. उपायुक्त साहेब, सचिव साहेब सर्व अधिकारी आज आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पाडली. त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो आणि सर्वांना मी धन्यवाद देतो. आताच सन्मा. सदस्या ग्रिटा फॅरो मॅडम यांनी आपल्या सर्वांना शुभेच्छा दिलेल्या आहेत. मी आपल्या सर्वांना, भाईंदर वासियांना सर्वांच्या वतीने ख्रिसमसच्या, नाताळच्या आणि मोहरमच्या देखिल शुभेच्छा देतो आणि आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दू. ०१.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २६/ ७ /२०१०

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.** ३६ :- जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्नरुत्थान अभियांनातर्गत BSUP प्रकल्प पॅकेज (J1,J2,J3) जनता नगर व काशीचर्च निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु शहरी पुनरुत्थान अभियानातर्गत "शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे" या कार्यक्रमातर्गत महानगरपालिका क्षेत्रातील जनता नगर व काशीचर्च या भागातील झोपडपट्टीयांमध्ये मुलभूत सुविधासह निवारा उपलब्ध करुन झोपडपट्टी निवारा योजनेचा प्रस्ताव तयार करुन म्हाडा मार्फत राज्य शासनास सादर करण्यात आला. राज्य शासनाने सदर प्रस्तावास मंजुरी देवून तद्नंतर प्रस्ताव मंजूरी साठी केंद्र शासनास सादर करण्यात आला. या प्रकल्पास केंद्र शासनाने दिनांक ११/११/२००९ रोजी मान्यता दिलेली असून प्रकल्पाची किंमत रु. २७९.५५ कोटी एवढी आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा दि. २०/११/२००९ ठराव क्र. ३६ अन्वये प्रकल्पाच्या रुपये ३०० कोटी एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहेत.

BSUP योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधिचा आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

| अ.क्र | तपशिल | केंद्रशासनाचा हिस्सा व निधी | राज्य शासनाचा हिस्सा व निधी | मनपाचा हिस्सा व निधी | झोपडपट्टी धारक हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | घराची किंमत | ५० % रु.६५२१.५५/- | ३०% रु.३९१२.९२ | रु. ११७३.९३ | रु. १४३४.७५ |
| २ | मुलभूत सुविधा | ५० % रु.४९०२.४० | २५ % रु.३९०८.४० | रु. ६०५९.८४ | |
| | एकूण. | रु.११४२९.९९ | रु.७८५६.९१ | रु.७२३३.७७ | रु.१४३४.७९ |

हया प्रकल्पात आस्तित्वात असलेल्या शासकीय जमिनीवर वसलेल्या झोपड्डपट्टीचे पूर्नवसन करणे अंर्तभूत आहे. सदर शासकीय जमिनीचे सर्व्हे नं मौजे काशिगाव ९०,९४,१०७/१/अ,१०८/१ व मौजे मिरेगाव सर्व्हे नं ७७, ७८ या जमिनीवर अस्तित्वात आहेत. सदर जमिन BSUP प्रकल्पासाठी मनपास हस्तातंर करण्यासाठी प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई, यांच्या मार्फत महसुल मा.अप्पर सचिव, व वने विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.०८/०३/२०१० रोजी सादर केलेला आहे. हस्तांतराची अंतिम कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.

निविदा प्रक्रियेसाठी महापालिकेमार्फत तांत्रिक समितीची नेमणूक करण्यात आली असून सदर तांत्रिक समितीमध्ये खालील सदस्य नेमण्यात आले आहेत.

१) प्रो.डॉ. व्ही. ज्योती प्रकाश. ( IIT मुंबई )

२) प्रो.डॉ. आर. एस. जांगीड. ( IIT मुंबई )

BSUP प्रकल्पासाठी प्रकल्याचा निविदा e-tendering माध्यातून दिनांक २८/२/२०१० रोजी दैनिक DNA व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आला. तसेच कामाच्या निविदा पूर्व बैठक दिनांक १७/०३/२०१० रोजी घेण्यात आली. कामाची सविस्तर माहितीचे Presentation देण्यात आले. Pre-bid बैठकीमध्ये निविदाकारनी उपस्थित केलेल्या मुद्दांचे स्पष्टीकरण निविदा पूर्व बैठकीचा इतीवृत्तांत करण्यात आले. तसेच निविदेतील अटींशतीमध्ये शिथीलता करण्यात आल्या व त्याची सुचनासाठी Corrigendum काढून दिनांक २१/०३/२०१० रोजी दैनिक DNA व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आल्या. निविदा फॉर्म फी स्विकृतीची तारीख ३१/०३/२०१० रोजी होती. निविदा फॉर्म व इसारा रक्कम स्विकृती डी.डी. स्वरुपात दि.०६/०४/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत होती. निविदाकारांचा फॉर्म फी व एकूण इसारा रक्कम भरल्याचे विवरण तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वर्णन | पॅकेज J1 | पॅकेज J2 | पॅकेज J3 | काशी चर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा फॉर्म | रु. ५०,०००/- | रु. ५०,०००/- | रु. ५०,०००/- | रु. २५,०००/- |
| २ | इसारा रक्कम | रु. ४१.७९ लक्ष | रु. ३५.५७ लक्ष | रु. ३७.७८ लक्ष | रु. १४.०५ लक्ष |
| ३ | फॉर्म फी भरणारे एकूण निविदाकार | १२ | १२ | १० | ११ |
| ४ | इसारा रक्कम भरणारे निविदाकार | ०३ | ०४ | ०३ | ०५ |

निविदा e-tendering द्वारे भरण्याची तारीख ७/४/२०१० रोजी ३.०० वाजेपर्यंत होती. Technical Bid उघडण्याची तारीख ७/४/२०१० ठिक ४.०० वाजता होती. सदर दिवशी Technical Bid उघडण्यात आली. खालील प्रमाणे निविदाकारांनी निविदा e-tendering द्वारे भरलेल्या आहेत.

| | निविदा प्राप्त | निविदाकाराचे नांव |
|---|---|---|
| पॅकेज J1 | ०३ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>2) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,<br>3) Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd. |
| पॅकेज J2 | ०३ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>2) Jekin Enterprises & Kavya Buildcon Pvt Ltd.<br>3) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, |
| पॅकेज J3 | ०३ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>2) Sumer Corporation & S.V.Jiwani<br>3) Stresscreete India Ltd, |
| काशीचर्च | ०२ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>2) D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, |

निविदेतील Technical Bid चे evaluation करण्यात आली असून वरील सर्व निविदा धारक Pre-qualify होत आहेत. निविदेतील अटीशर्ती नुसार प्रत्येक पॅकेजसाठी आवश्यक असलेल्या Pre-qualification बाबतचे निविदाकारांचे विवरणपत्रे सोबत जोडली आहेत. वरील सर्व निविदाधारक Pre-qualify होत आहेत. त्यांचे दिनांक २०/४/२०१० रोजी Financial Bid उघडण्यात आले. त्यातील निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | निविदाकाराचे नांव | निविदेतील दर | शेरा |
|---|---|---|---|
| पॅकेज J1 | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १३१७३६०१९८.०० | L3 |
| | 2) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | १३०४९९३१४३.०८ | L2 |
| | 3) Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd. | १२७२७८५८९६.०० | L1 |

| | | | |
|---|---|---|---|
| पॅकेज J2 | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १०७४६८६०६७.०० | L2 |
| | 2) Jekin Enterprises & Kavya Buildcon Pvt Ltd. | १०८१५४५७६५.३० | L3 |
| | Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | १०५७३५३८९५.९६ | L1 |
| पॅकेज J3 | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १०८४१५९३३१.०० | L1 |
| | 2) Sumer Corporation & S.V.Jiwani | १०९१२५५४७६.०० | L2 |
| | 3) Stresscreete India Ltd, | ११७४८५८४००.०० | L3 |
| काशीचर्च | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | ४९६४६९५९८.७० | L2 |
| | 2) D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | ४७५४६७५८१.१० | L1 |

सर्वात कमी दर असलेल्या निविदाकारास दर कमी करणेबाबत पत्राद्ववारे कळविण्यांत आलेले होते. मा. आयुक्त यांच्या दालनात दि.२६/०५/२०१० रोजी दर कमी करण्यासाठी बैठक झाली. ठेकेदाराना दर कमी करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. तद्नंतर लघुत्तम निविदाकारास वाटाघाटीने दर कमी करण्यासाठी मा.आयुक्त सो. यांच्याकडे दि. ०७/०७/२०१० रोजी परत बोलाविण्यात आलेले होते. दर कमी करुन दराची दरपृथःकरण सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते त्यानुसार ठेकेदारांनी दर कमी करण्याचे पत्र दिले आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल रु. २७९.५५ कोटी असून हा सन २००८-०९ च्या दरसुचीवर आधारीत होता. सन २००९-१० ची नवीन दरसुची माहे नोव्हेबर २००९ पासून अंमलात आली. सविस्तर प्रकल्प अहवालाची तुलना सन २००९-१० च्या दरसुचीनुसार केली असता किंमत रु. ३३०.३३ कोटी एवढी येत आहे.

सल्लागारामार्फत प्राप्त लघुत्तम निविदांचे दर सन २००९-१० चे दरसुचीनुसार तपासले असता लघुत्तम दर हे सरासरी १० % जास्त आहेत. व मंजुर प्रकल्पाच्या किमंतीच्या सरासरी ३०.१६ % जास्त आहेत (दरसुची २००८-०९ नुसार). वित्तीय आकृतीबंधानुसार केंद्र व राज्यशासनाचे प्रकल्पाकरिता अर्थसहयाची रक्कम मंजुरीप्रमाणे प्राप्त होणार आहे. परिणामी जास्त दरांच्या निविदेचा वाढीव आर्थिक बोजा महानगरपालिकेस सोसावा लागणार आहे.

| | लघुत्तम निविदाकाराचे नांव | निविदेतील दर | | वाटाघाटीनंतर कमी केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेची किंमत | Per Sq. mtr | निविदेची किंमत | Per Sq. mtr |
| पॅकेज J1 | Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd. | १२७२७८५८९६.०० | २३६७१.०२ | १०६७३३०५३०.०० | १९८५०.०० |
| पॅकेज J2 | Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | १०५७३५३८९५.९६ | २३१२१.०० | ९३३०५६१६२.७७ | २०४०३.०० |
| पॅकेज J3 | Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १०८४१५९३३१.०० | २३०७०.०० | ९३२८३७५६९.६० | १९८५०.०० |
| काशी चर्च | D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | ४७५४६७५८१.१० | २२९८०.५४ | ३७२४२००९०.०० | १८०००.०० |

ठेकेदाराने व सल्लागाराने जास्त निविदेचे दर असण्याची कारणे मुख्यतव्ये खालीलप्रमाणे नमुद केलेली आहेत.

१) सिमेंट, स्टील, पेट्रोल, डिझेल यांची झालेली दरवाढ.

२) निविदेअंतर्गत Transit Camp बांधावा लागणार आहे. त्याची किंमत सुमारे रु. १,५०,०००/- लक्ष प्रती घर एवढी आहे. तथापी प्रकल्पामध्ये Transit Rent रु. ७२,०००/- प्रति घर आहे.

३) निविदेमध्ये Land Development अंतर्गत Hill Cutting फार मोठयाप्रमाणात आहे. प्रकल्प अहवालातील तरतुदीपेक्षा सदर प्रमाण दुप्पटीपेक्षा जास्त आहे.

४) निविदेअंतर्गत सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिकेकडे तीन वर्षाकरिता र्निव्याज राहणार आहे. तसेच ही रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर तीन वर्षाने परत करणार आहे.

५) निविदेअंतर्गत Architecture fee, Permission इ. खर्चाचा समावेश नाही. तसेच मिरा भाईंदर क्षेत्रात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. परिणामी बांधकामाकरिता लागणारे पाणी दुरुन टॅकरद्वारे आणावे लागणार असल्याने खर्चात वाढ होते.

६) निविदेअंतर्गत Soil Testing, Soil Investigation, Survey, Shifting of Tenement, Quality Control Lab Maintain इ. हया सर्व कामांचा प्रकल्प अहवालात समावेश होत नाही.

नविन दरसुचीनुसार निविदेची Evaluation सल्लागार (PMC) मे. टेक्नो कंन्सल्टंट यांनी करुन सविस्तर दरपृथ:करण मनपास दि.२०/७/२०१० रोजी सादर केले आहे.

**BSUP PROJECT UNDER JNNURM AT JANATANAGAR AND KASHI CHURCH IN MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION**

**TENDER EVALUATION STATEMENT**

| 1 | PROJECT AREA | COMPONENT | KASHI CHURCH. | JANATANAGAR-J1 | JANATANAGAR-J2 | JANATANAGAR-J3 | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | PROJECT COST AS PER DSR 2008-09 | BUILDING | 261087990.25 | 593357764.59 | 510754717.70 | 519488409.89 | 1884688882.43 |
| | | INFRA | 19950427.75 | 242395384.10 | 200641524.19 | 236113576.78 | 699100912.82 |
| | | TOTAL | 281038418.00 | 835753148.69 | 711396241.89 | 755601986.67 | 2583789795.26 |
| 3 | PROPOSED TENAMENTS. | NOS | 471 | 1336 | 1156 | 1173 | 4136.00 |
| 4 | BUILT UP AREA OF PROJECT IN SQM | SQ MTRS | 20690.005 | 53769.804 | 45731.322 | 46994.336 | 167185.47 |
| 5 | FINAL LOWEST BIDDING COST Rs. | Rs | 372420090.00 | 1067330530.00 | 933056162.77 | 932837569.60 | 3305644352.37 |
| 6 | LOWEST BIDDING COST PER SQ MTRS | Rs | 18000.00 | 19850.00 | 20403.00 | 19850.00 | 19772.32 |
| 7 | LOWEST BIDDING COST PER SQ FEET | Rs | 1672.86 | 1844.80 | 1896.19 | 1844.80 | 1814.66 |
| 8 | ESTIMATED COST PER SQ MTRS(2008-09) | BUILDING | 12619.04 | 11035.15 | 11168.60 | 11054.28 | 11273.04 |
| | | INFRA | 964.25 | 4508.02 | 4387.40 | 5024.30 | 4181.59 |
| | | TOTAL | 13583.29 | 15543.17 | 15556.00 | 16078.58 | 15190.26 |
| 10 | ESTIMATED COST (2009-10) | BUILDING | 245768927.66 | 638192287.21 | 548641202.09 | 558612096.22 | 1991214513.18 |
| | | INFRA | 21264192.40 | 53191627.07 | 62693313.47 | 50357741.11 | 187506874.05 |
| | | SPECIAL INFRA | 71528807.95 | 278922030.63 | 236877742.39 | 239428371.36 | 826756952.33 |
| | | TOTAL | 338561928.02 | 970305944.91 | 848212257.95 | 848398208.68 | 3005478339.56 |
| 11 | ESTIMATED COST PER SQ METER(2009-10) | BUILDING | 11878.63 | 11868.97 | 11997.06 | 11886.80 | 11910.21 |
| | | INFRA | 1027.75 | 989.25 | 1370.91 | 1071.57 | 1121.55 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | SPECIAL INFRA | 3457.17 | 5187.34 | 5179.77 | 5094.83 | 4945.15 |
| | | TOTAL | 16363.55 | 18045.55 | 18547.73 | 18053.20 | 17976.91 |
| 12 | ESTIMATED COST PER SQ FEET(2009-10) | BUILDING | 1103.96 | 1103.06 | 1114.97 | 1104.72 | 1106.90 |
| | | INFRA | 95.52 | 91.94 | 127.41 | 99.59 | 104.23 |
| | | SPECIAL INFRA | 321.30 | 482.09 | 481.39 | 473.50 | 459.59 |
| | | TOTAL | 1520.78 | 1677.10 | 1723.77 | 1677.81 | 1670.72 |
| 13 | % ABOVE OVER TENDER | | 32.52 | 30.10 | 33.62 | 25.77 | 30.16 |
| 14 | % ABOVE OVER DSR 2009-10 | | 10.00 | 10.00 | 10.00 | 9.95 | 9.99 |

योजनेचा प्रकल्प अहवाल मे. पुनित आर्किटेट यांनी तयार केला होता. प्रकल्प अहवाल मध्ये सन २००८-०९ च्या दरानुसार होता. सन २००९-१० च्या दरामध्ये झालेली वाढ, झोपडपट्टी धारकांना तात्पुत्या निवारासाठी Transit Camp बांधावा लागणार आहे. प्रकल्प अहवालामध्ये Transit Rent घेतलेला आहे. Transit Camp मुळे योजनेच्या किंमतीमध्ये वाढ होत आहे. प्रकल्पामध्ये Land Development (Hill Cutting) एकूण काँटीटीच्या ५० टक्केचा समावेश घराची किंमत कमी येण्यासाठी केलेला होता असे मे. पुनित आर्किटेट यांनी कळविलेले आहे.

वरील सर्व निविदासाठी BSUP प्रकल्पासाठी लागणारा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | Total cost of Sanction Project ( as per sanction ) DSR 08-09 | 279.55 Cr |
| 2 | Gross Cost DPR ( As per DSR 09-10 ) | 330.33 Cr |
| 3 | Tender invited for project cost | 258.37 Cr |
| 4 | i) Cost of DPR Component ( As per DSR 09-10) | 271.99 Cr |
| | ii) Different of cost Transit Rent and Transit Camp for ( 50% basis) | 14.11 Cr |
| | iii) Excess and development cost Hill casting not consider in DPR | 14.44 Cr |
| | **Total Net Cost** | **300.54 Cr** |

| | | |
|---|---|---|
| 5 | Tender price offer received cost Rs | 330.56 Cr |
| 6 | Center Govt, State Govt & Ben fishery Share | 207.20 Cr |
| 7 | Municipal Corporation Share | 123.36 Cr |

BSUP प्रकल्पाच्या एकूण जागेच्या २५ % जागा व्यापारी प्रयोजनासाठी वापर करुन मनपा हिस्स्यातील काही खर्च भागविण्यासाठी म्हाडाकडे मनपामार्फत प्रस्ताव सादर केलेला आहे. वरील तुलनात्मक तक्त्यामधील ठेकेदारानी दिलेले Revised price offer (तुलनात्मक तक्ता अ.क्र ६) सन २००९-१० च्या दरापैक्षा १० % जास्त असले तरी दर स्पर्धात्मक असून दर मंजुरीची शिफारस सल्लागार मे. टेक्नो कंन्सल्टंट केली आहे. तरी सदर निविदा मंजुर करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मा.स्थायी समितीस मंजुरीस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २६ /०७/२०१०

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक ( ३७ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरिता दोन लहान टाटा ४०७/३१०० चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत.

---

सर्वात कमी दराच्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत.

**दिनांक** २०/०६/२०१० रोजी दिलेल्या **"पुढारी"** व **"दि फ्री प्रेस जर्नल"** या वृत्तपत्रातील जाहिर फेर निविदा (पाचवी ) सुचनेनुसार ई-टेंडरिगद्वारे प्राप्त निविदा **दिनांक ०२/०७/२०१०** रोजी संगणक विभागामार्फत उघडण्यात आल्या.

**"मे. देवी फायर सर्व्हिसेस"**, व **"मे. हायटेक सर्विसेस "** या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या सदर निविदा उघडण्यात आल्या असता त्यांनी अग्निशमन दलाच्या दोन नग मिनी वॉटर टेंडर बॉडी बांधणीसह पुरविण्यात येणा-या अतिरिक्त साहित्याकरिता पुढीलप्रमाणे दर सादर केले आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मे. देवी फायर सर्व्हिसेस | मे. हायटेक सर्विसेस |
|---|---|---|---|
| १ | बॉडी बांधणे (२नग) | ३७,८०,०००/- | ३०,६१,८००/- |
| २ | अतिरिक्त साहित्य (२ वाहनासाठी) | २२,५०,०००/- | २१,१७,०००/- |
| | एकूण | ६०,३०,०००/- | ५१,७८,८००/- |

उपरोक्त दरांपैकी सर्वात कमी दराच्या **मे. हायटेक सर्विसेस** यांच्या निविदेस मा. स्थायी समिती सभेची मंजूरी मिळणेस शिफारस असे.

मा. आयुक्त सो. हयांच्या मान्यतेने

उप-आयुक्त
अग्निशमन व आणीबाणी सेवा
मिरा-भाईंदर महानगरपालिका

दि० १९।७।१० रोजी
दुपारी ४-२० वाजता प्राप्त

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.२९/०७/२०१०

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ३८ ) :-** निविदांना मान्यता देणे बाबत.

| अ.क्र. | कामाचे नांव /ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च/ ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) खारीगांव शाळेकरीता वाढीव पहिला, दुसरा व तिसरा मजल्याचे उर्वरीत बांधकाम करणे. भाग – २ | रु. ४९,९९,८००/- |
| | १) मे. ललित इंटरप्रायजेस | ७४.०० % जास्त दराने |
| | दर कमी करून<br>(सन २००९ – १० च्या जिल्हादरसुचीतील दरानुसार) | ७०.०० % जास्त दराने<br>(१६.३९ % जास्त दराने) |

| अ.क्र. | कामाचे नांव /ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च/ ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| २ | भाईंदर (प) येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीवर शेड बांधणे. | रु. १८,४३,७००/- |
| | १) मे. साळवी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. कल्पतरू इंटरप्रायजेस | ८.०० % कमी दराने<br>०.०१ % कमी दराने |

वरीलपैकी अ.क्र. २ च्या कामी मे. साळवी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ८% कमी दराची निविदा मान्य होण्यास शिफारस आहे.

अ.क्र. १ च्या कामाचे अंदाजपत्रकातील दर हे सन २००५ – ०६ या वर्षाच्या दरसुचीतील असून त्यानुसार एकूण रू. ४९,९९,७७७/- रकमेचे अंदाजपत्रक होत आहे.

तथापी सद्यस्थितीत सन २००९ – १० या वर्षाचे जिल्हा दरसुचीतील दर उपलब्ध असून त्यानुसार सदर अंदाजपत्रक रू. ७३,०२,५०९/- रकमेचे असल्याबाबत तांत्रिक सल्लागार मे. आर्चिझम यांनी कळविलेले आहे. प्रत्यक्षात ठेकेदाराने सन २००५ – ०६ या वर्षाच्या जिल्हादरसुचीतील दरानुसार

दरवाटाघाटीनंतर ७०.०० % जास्त दर सादर केले आहेत. सदर दराची तुलना सन २००९ – १० या वर्षाच्या जिल्हा दरसुचीतील दराशी करता ठेकेदारानी भरलेले दर १६.३९ % जास्त दराची आहे.

सदर निविदा मान्यतेची शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

दि. १३/७/१० रोजी प्राप्त.
वेळ - १२. वाजता

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २६/०७/२०१०.

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ३९ : वातानुकूलीत शीतपेटीमध्ये खाजगी कारणास्तव मृतदेह ठेवणेसाठी दर आकारणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वैद्यकीय विभागाने मिरारोड रूग्णालय व टेंबा रूग्णालय येथे अनुक्रमे १६ व २१ शितपेटया मृतदेह ठेवणेकरिता उपलब्ध केल्या आहेत. सदर शितपेटयांमध्ये मेडीको लिगल केसेस मधील पोलीसांकडून आलेले मृत देह शवविच्छेदनानंतर ठेवण्याची सोय केलेली आहे. तसेच शितपेटयांमध्ये मृतदेह शवविच्छेदनानंतर नातेवाईकांना त्यांच्या खासगी कारणासाठी मृतदेह काही कालावधीसाठी शितपेटीमध्ये ठेवण्याची सोय आहे. तसेच शवविच्छेदन न केलेले मृतदेह ही शितपेटी गृहात ठेवण्यात येईल.

वरीलप्रमाणे वातानुकूलीत शीतपेटीमध्ये खाजगी कारणास्तव मृतदेह ठेवण्यासाठी प्रति दिन फी आकारणे आवश्यक आहे.

तरी खाजगी कारणास्तव मृतदेह शवपेटीमध्ये ठेवणेसाठी प्रति दिन (२४ तासांकरिता) दर ठरविणेसाठी मा. स्थायी समिती सभेच्या निर्णयास्तव सादर.

मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने.

उप-आयुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Aarogya Vibhag\Dinesh Sir\Sadar\Sadar A C dadebody dar aakarnebabt doc

प्राप्त दि. ९३/७/१०

[illegible]

७३/७/१०

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि २६/०७/२०१०.

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ४०

**विषय :- मिरारोड येथील रक्तपेढीसाठी मागविण्यात आलेल्या फेरनिविदांचे दर मंजूर करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड येथील प्रस्तावित रूग्णालयात रक्तपेढी सुरू करणेकरिता दि. २९.०५.२०१० रोजीच्या "दै. लोकनायक" व "दै. मुंबई संध्या" या वृत्तपत्रात जाहिर फेरनिविदा प्रसिध्द करून दि. ०९.०६.२०१० रोजी "इ टेंडरद्वारे" निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदरच्या निविदा दि. १५.०६.२०१० रोजी ४.३० वाजता उघडण्यात आल्या असता फक्त दोनच निविदाकारांनी निविदा सादर केल्या होत्या. सदरच्या दोन्ही निविदा उघडण्याकरिता मा. आयुक्त सो. यांनी दि. २३.०६.२०१० रोजी मंजूरी दिली होती. या अनुषंगाने निविदा उघडल्या असता खालीलप्रमाणे निविदाकारांनी दर सादर केलेले आहेत.

| Sr. No. | Name of Blood Components | If Machinery Supply by Mira Bhayander Municipal Corporation | | | | If Machinery Purchased by Non-Government Organization | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Nandakishor Education Society | | Navjeevan Medical Relief & Research Foundation | | Nandakishor Education Society | | Navjeevan Medical Relief & Research Foundation | |
| | | Rate for admitted Patient | Rate for Other | Rate for admitted Patient | Rate for Other | Rate for Admitted Patient | Rate for Other | Rate for Admitted Patient | Rate for Other |
| 1. | WHOLE HUMAN BLOOD – IP | 325 | **550** | **190** | **550** | 400 | **750** | **290** | 790 |
| 2. | CONCENTRATE HUMAN RED BLOOD CORPUSCLES – I. P. | 325 | **550** | **190** | **550** | 400 | **750** | **290** | 790 |
| 3. | SALINE WASHED HUMAN RED BLOOD CELLS – I. P. | 350 | 575 | **240** | **550** | 450 | 800 | **290** | **790** |
| 4. | PLATELET CONCENTRATE – I. P.(RANDOM) | 300 | **450** | **240** | **450** | 400 | 600 | **290** | **590** |
| 5. | FRESH FROZEN PLASMA – B. P. | 300 | 450 | **190** | **400** | 400 | 550 | **290** | **500** |
| 6. | CRYOPRECIPITATED ANTIHAEMOPHILIC FACTOR I. P. | 300 | 450 | **190** | **400** | 400 | 550 | **290** | **500** |
| 7. | SINGLE DONOR PLATELET BY APHERESIS METHOD | **5800** | **6300** | 6500 | 6900 | 7000 | **7500** | **6500** | 8500 |

वरीलप्रमाणे तक्त्याचे अवलोकनकरता महापालिकेने उपकरणे पुरवठा केल्यास आकारण्यात येणारे दर व अशासकीय संस्थेने पुरवठा केल्यास आकारण्यात येणारे दर याबाबतच्या दोन्ही दरात जास्त तफावत आढळत नाही, त्यामुळे उपकरणे अशासकीय संस्थेने पुरवठा करणे महापालिकेच्या हिताचे राहील व पैशांची बचतही होईल.

वरीलप्रमाणे तक्त्यानुसार सरासरी काढली असता मे. नवजीवन मेडिकल रिलीफ ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन यांचे दर कमी आहेत. तसेच त्यांनी महापालिकेच्या हिताच्या प्रस्तावात थॅलेसेमिया रूग्णांना मोफत रक्त देण्याचे व महापालिकेची जागा वापरांबद्दलचे दर महा रू. २५,०००/- महापालिका फंडात जमा करणार असल्याचे कळविले आहे,

तरी मे. नवजीवन मेडिकल रिलीफ ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन यांनी सादर केलेले दर मंजूरीसाठी मा. स्थायी समिती सभेच्या निर्णयासाठी शिफारस असे.

उपायुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा, दि. २६/०७/१०**

## // गोषवारा//

४९

प्रकरण :- भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पुर्व), मिरारोड ते चेणा, मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार बोली पध्दतीने स्विकारणे बाबत (१२ महिन्याकरिता)

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पश्चिम) आणि भाईंदर (पुर्व) या विभागाकरिता १२ महिन्याच्या कालावधीसाठी बाजार फी वसुलीकरिता अभिकर्ता (एजंट) नेमणेकरिता किमान देकाराची रक्कम खालीलप्रमाणे ठरविण्यांत आलेली आहे.

| अ. क्र. | विभाग | सन २००९-१० च्या देकाराची रक्कम | नैसर्गिक वाढ १०% |
|---|---|---|---|
| १) | भाईंदर (पश्चिम) | रु.१,०९,२५,०००/- | रु. १,२०,१७,५००/- |
| २) | भाईंदर (पुर्व) | रु.१,१४,०५,०००/- | रु. १,२५,४५,५००/- |

त्याप्रमाणे १) दि.२८/१/२०१० "दै. लोकसत्ता", "हिदुस्थान टाईम्स" व "समाधी प्रकाश" २) दि.१९/२/२०१० "लोकसत्ता" व "हिदुस्थान टाईम्स" ३) दि.६/४/२०१० महानगर, दै. फ्री प्रेस जनरल ४) ७/४/२०१० महाराष्ट्र टाईम्स (शुध्दीपत्र) दि.१०/४/२०१० या वृत्तपत्रात E-Auction व्दारे जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द केल्यानंतर मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या **www.mbmc.abcprocure.com** या संकेतस्थळावर वरील दिलेल्या देकार रक्कमेची रक्कम भरुन लिलावात भाग घेणे आवश्यक होते परंतु कोणत्याही ठेकेदाराने संकेतस्थळावर देकार रक्कम न भरल्याने सदर बाजार लिलाव हा जाहीर बोली पध्दतीने द्यावयाचे ठरले व याकरिता दि.२८/०५/२०१० "दै. वार्ताहर" व "दै. फ्री प्रेस जनरल" या वृत्तपत्रात जाहीरात देऊन दि.७/६/२०१० रोजी मा.आयुक्त सो. यांच्या दालनात दुपारी २.०० वाजता बोली पध्दतीने बाजार लिलाव भाईंदर (पुर्व) व भाईंदर (पश्चिम) या विभागाकरिता ठेवण्यांत आला होता.

भाईंदर (पुर्व) करिता महानगरपालिकेने निश्चित केलेली बोली रक्कम रु.१,२५,४५,५००/- व भाईंदर (पश्चिम) करिता बोली रक्कम रु.१,२०,१७,५००/- इतकी निश्चित करण्यांत आली होती.

भाईंदर (पुर्व) करिता १) मे. ललित इंटरप्रायझेस, २) श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा, ३) मे. गौरव कंस्ट्रक्शन, ४) श्री. विजयकुमार सोमानी व ५) श्री. देविदास जयदेव किणी हे इच्छुक उपस्थित होते. सदर इच्छुकांनी पुकारलेली बोली रक्कम खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | बोली धारकांचे नांव | पुकारलेली बोली रक्कम |
|---|---|---|
| १) | मे. ललित इंटरप्रायझेस | ६६,००, ०००/-, ७०,००,०००/-, ७१,५०,०००/-, ७३,००,०००/-, ७६,००,०००/- |
| २) | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा | ६०,००,०००/-, ६७,००,०००/-, ७२,००,०००/-, ७५,००,०००/-, ७५,००,०००/- |
| ३) | मे. गौरव कंस्ट्रक्शन | ८०,००,०००/-, ८२,००,०००/-, ८४,००,०००/- |
| ४) | श्री. विजयकुमार सोमानी | ६५,००,०००/-, ६८,००,०००/-, ७१,००,०००/-, ७४,००,०००/-, ७७,००,०००/-, ८१,००,०००/-, ८३,००,०००/-, ८५,००,०००/- |
| ५) | श्री. देविदास जयदेव किणी | ५०,००,०००/-, ६५,००,०००/- |

वरीलप्रमाणे बोली रक्कमेपैकी सर्वात जास्त बोलीची रक्कम **श्री. विजयकुमार सोमानी** यांची असून ती रक्कम रु.८५,००,०००/- इतकी होती व ती रक्कम महानगरपालिकेने निश्चित केलेल्या रक्कम रु.१,२५,४५,५००/- पेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो., यांनी ती रक्कम अमान्य केली.

भाईदर (पश्चिम) करिता १) श्री. देविदास जयदेव किणी, २) श्री. विजयकुमार सोमानी, ३) श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा, ४) मे. ललित इंटरप्रायझेस हे इच्छुक उपस्थित होते. सदर इच्छुकांनी पुकारलेली बोली रक्कम खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | बोली धारकांचे नांव | पुकारलेली बोली रक्कम |
|---|---|---|
| १) | श्री. देविदास जयदेव किणी | ५०,००,०००/-, ६६,००,०००/-, ७०,१०,०००/-, ७५,१०,०००/- |
| २) | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा | ६०,००,०००/-, ७०,००,०००/-, ७५,००,०००/-, ७६,००,०००/- |
| ३) | मे. ललित इंटरप्रायझेस | ६५,००,०००/- |
| ४) | श्री. विजयकुमार सोमानी | ---- |

उक्त बोली रक्कमेपैकी सर्वात जास्त बोलीची रक्कम **श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा** यांची असून ती रक्कम रु.७६,००,०००/- इतकी होती व ती रक्कम महानगरपालिकेने निश्चित केलेल्या रक्कम रु.१,२०,१७,५००/- पेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो., यांनी ती रक्कम अमान्य केली.

भाईदर (पुर्व) व भाईदर (पश्चिम) प्रभागातील बाजार शुल्क वसुल करण्याच्या लिलावाच्या प्राप्त झालेल्या बोलीची रक्कम महानगरपालिकेने निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो., यांनी त्या रक्कमा अमान्य केल्या. सबब या कामी **फेर निविदा** मागविण्यांस शिफारस केली, त्याप्रमाणे दि.१५/६/२०१० रोजी "दै. फ्री प्रेस जनरल" व दि.१६/६/२०१० "महाराष्ट्र टाईम्स" मध्ये जाहीरात देऊन दि.१८/६/२०१० रोजी मा.आयुक्त सो., याच्या दालनात बोली पध्दतीने लिलाव ठेवण्याची तारीख निश्चित केलेली होती. परंतु. कार्यालयीन महत्वाच्या कामामुळे हा बाजार लिलाव पुढील तारखेस २२/६/२०१० रोजी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात संध्या.४.०० वाजता ठेवण्यांत आला होता.

**भाईदर (पश्चिम)** करिता अनुक्रमे १ ते ७ या ठेकेदारांनी भाग घेतला असून सदर इच्छुकांनी पुढीलप्रमाणे बोली पुकारलेली आहे.

| अ. क्र. | लिलावात भाग घेणा-याचे नांव व पत्ता भाईदर (पश्चिम) | लिलावात भाग घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जाची दिनांक | पुकारलेल्या बोलीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे. विराज कन्स्ट्रक्शन (प्रो. श्री. विराज पाटील)<br>जी/२, गोदावरी अपार्टमेंट, नवघर, भाईदर (पुर्व) | १८/६/२०१० | **रु. ६६/- लाख** |
| २ | मे.एस.एस. एंटरप्राईज<br>२०८, मोठया क्रॉस जवळ, उत्तन गांव, भाईदर (पश्चिम) | १८/६/२०१० | रु. ७८.५०/- लाख |
| ३ | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा<br>जी/१, श्री गजानन प्रसन्न अपार्टमेंट, आईस फक्टरी जवळ, भाईदर (पश्चिम) | १८/६/२०१० | रु. ७७/-लाख<br>रु. ८०/-लाख<br>रु. ८४/-लाख |
| ४ | मे. ललित एंटरप्रायजेस<br>गंधर्वराज अपार्टमेंट, खारीगांव, भाईदर (पुर्व) | १८/६/२०१० | रु. ७६.५०/- लाख<br>रु. ७९/- लाख |
| ५ | श्री. देविदास जयदेव किणी<br>१०२ एकविरा अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईदर (पश्चिम) | १८/६/२०१० | **रु. ७०/- लाख**<br>रु. ८२/- लाख<br>**रु. ८५/- लाख** |
| ६ | मे. गौरव कन्स्ट्रक्शन<br>२०३, आशिष अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईदर (पश्चिम) | १८/६/२०१० | रु. ७७.५०/- लाख |
| ७ | श्री. विजयकुमार गजाधर सोमानी<br>सी/११, गौतम नगर क्र.१, अंबे माता मंदिर रोड, मोती नगर, भाईदर (पश्चिम) | १८/६/२०१० | रु. ७८/-लाख<br>रु. ८३/-लाख |

भाईंदर (पुर्व) करिता अनुक्रमे १ ते ५ या ठेकेदारांनी भाग घेतला असून सदर इच्छुकांनी पुढीलप्रमाणे बोली पुकारलेली आहे.

| अ. क्र. | लिलावात भाग घेणा-याचे नांव व पत्ता भाईंदर (पुर्व) | लिलावात भाग घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जाची दिनांक | पुकारलेल्या बोलीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे. विराज कन्स्ट्रक्शन (प्रो. श्री. विराज पाटील)<br>जी/२, गोदावरी अपार्टमेंट, नवघर, भाईंदर (पुर्व) | १८/६/२०१० | रु. ७५/- लाख<br>रु.८८/- लाख |
| २ | मे.एस.एस. एंटरप्राईज<br>२०८, मोठया क्रॉस जवळ, उत्तन गांव,भाईंदर (पश्चिम) | १८/६/२०१० | रु. ७९/- लाख<br>रु.९२.५० लाख |
| ३ | श्री. देविदास जयदेव किणी<br>१०२ एकविरा अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईंदर (पश्चिम) | १८/६/२०१० | रु. ८०/- लाख<br>रु.८६.५० लाख<br>रु.९४.५० लाख |
| ४ | मे. गौरव कन्स्ट्रक्शन<br>२०३, आशिष अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईंदर (पश्चिम) | १८/६/२०१० | रु. ८२/- लाख<br>रु.९०/- लाख |
| ५ | श्री. विजयकुमार गजाधर सोमानी<br>सी/११, गौतम नगर क्र.१, अंबे माता मंदिर रोड, मोती नगर, भाईंदर (पश्चिम) | १८/६/२०१० | रु. ८५/- लाख<br>रु.८६/- लाख<br>रु.९२/- लाख<br>रु.९४/- लाख<br>**रु.९५/- लाख** |

तसेच महानगरपालिका क्षेत्रातील **मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन चौक** या विभागाकरिता बाजार लिलावाची मुदत दि. ३०/६/२०१० रोजी संपत असल्याने सदर बाजार लिलाव घेण्याचे निश्चित करण्यांत आले व या दोन्ही विभागाची सन २०१०-११ या वर्षाकरिता बाजार देकाराची रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभाग | सन २००९-१० च्या देकाराची रक्कम | नैसर्गिक वाढ १०% |
|---|---|---|---|
| १) | **मिरारोड ते चेणा** | रु.१,३८,००,०००/- | रु. १,५१,८०,०००/- |
| २) | **मुर्धा ते उत्तन** | रु. ४,३०,०००/- | रु. ४,७३,०००/- |

सदर बाजार लिलाव बोली पध्दतीने घेण्याकरिता दि. ९/६/२०१० रोजी "दै. फ्री प्रेस जनरल" व "लोकमत" या वृत्तपत्रात जाहीरात देऊन दि.१९/६/२०१० रोजी मा.आयुक्त सो. यांच्या दालनात बोली पध्दतीने बाजार लिलाव घेण्याचे ठरले होते. परंतु. कार्यालयीन महत्वाच्या कामामुळे हा बाजार लिलाव पुढील तारखेस २२/६/२०१० रोजी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात संध्या.४.०० वाजता ठेवण्यांत आला होता. या लिलावामध्ये खालीलप्रमाणे देकार बोली पध्दतीने पुकारण्यांत आले.

**मिरारोड ते चेणा** करिता अनुक्रमे १ ते ५ या ठेकेदारांनी भाग घेतला असून सदर इच्छुकांनी पुढीलप्रमाणे बोली पुकारलेली आहे.

| अ. क्र. | लिलावात भाग घेणा-याचे नांव व पत्ता मिरारोड ते चेणा | लिलावात भाग घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जाची दिनांक | पुकारलेल्या बोलीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री. विजयकुमार गजाधर सोमानी<br>सी/११, गौतम नगर क्र.१, अंबे माता मंदिर रोड, मोती नगर, भाईंदर (पश्चिम) | २१/६/२०१० | रु. ८८/- लाख<br>रु.९५/- लाख |
| २ | मे. विराज कन्स्ट्रक्शन (प्रो. श्री. विराज पाटील)<br>जी/२, गोदावरी अपार्टमेंट, नवघर, भाईंदर (पुर्व) | २१/६/२०१० | रु. ९५.५०/- लाख |
| ३ | मे.एस.एस. एंटरप्राईज<br>२०८, मोठया क्रॉस जवळ, उत्तन गांव,भाईंदर (पश्चिम) | २१/६/२०१० | रु. ८०/- लाख<br>रु.९९.५० लाख |
| ४ | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा<br>जी/१, श्री गजानन प्रसन्न अपार्टमेंट, आईस फक्टरी जवळ, भाईंदर (पश्चिम) | २१/६/२०१० | रु.८७/- लाख<br>**रु.१ कोटी ५/-लाख** |
| ५ | मे. गौरव कन्स्ट्रक्शन<br>२०३, आशिष अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईंदर (पश्चिम) | २१/६/२०१० | रु.९०/- लाख |

**मुर्धा ते उत्तन** करिता अनुक्रमे १ ते २ या ठेकेदारांनी भाग घेतला असून सदर इच्छुकांनी पुढीलप्रमाणे बोली पुकारलेली आहे.

| अ. क्र. | लिलावात भाग घेणा-याचे नांव व पत्ता मुर्धा ते उत्तन | लिलावात भाग घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जाची दिनांक | पुकारलेल्या बोलीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे. विराज कन्स्ट्रक्शन (प्रो. श्री. विराज पाटील)<br>जी/२, गोदावरी अपार्टमेंट, नवघर, भाईंदर (पुर्व) | २१/६/२०१० | रु.३/- लाख<br>रु.४/- लाख |
| २ | मे. राठोड असोसिएट<br>(प्रो. श्री. वसंतभाई ए. राठोड) | २१/६/२०१० | **रु.४/- लाख१० हजार** |

बाजार लिलावात भाग घेणा-या चारही ठेकेदारांनी खालीलप्रमाणे अंतिम बोली पुकारलेली आहे.

१) भाईंदर (पुर्व) रु.९५ लाख
२) भाईंदर (पश्चिम) रु.७६ लाख
३) मिरारोड ते चेणा रु. १ कोटी ५ लाख
४) मुर्धा ते उत्तन ४ लाख १० हजार

ठेकेदारानी पुकारलेली बोली महानगरपालिकेने ठरविलेल्या देकार रक्कमेपेक्षा कमी आहे. या पुकारलेल्या रक्कमेबाबत ठेकेदाराना विचारणा केली असता बाजार लिलावाची रक्कम किमान देकारापर्यत पुकारण्यांत यावी असे प्रशासनाकडून सांगितले, तसेच उपस्थित असलेले मा. स्थायी समिती सदस्य व मा. सभापती सो. यांनी ठेकेदाराने पुकारलेली रक्कम फारच कमी असल्याची चर्चा झाली.

बाजार लिलावाची देकार रक्कम व महानगरपालिका व पोलिस प्रशासनकडून फेरीवाल्यावर सातत्याने होणारी कारवाई व त्यात होणारे ठेकेदाराचे आर्थिक नुकसान या बाबत ठेकेदाराने आपले निवेदन उपस्थितापुढे मांडले.

बाजार ठेकेदारानी मा. आयुक्त सो., मा. सभापती स्थायी समिती व उपस्थित स्थायी समिती सदस्य यांचे पुढे निवेदन व्यक्त केल्यानंतर मा. आयुक्त सो., यांनी बाजार लिलावात भाग घेणा-यांना बाजार ठेकेदारांना सूचित केले सन २००९-१० च्या बाजार रक्कमेवर १०% वाढ घेऊन बाजार लिलाव घेणे बाबत ठेकेदारांना सूचना केल्या. या सूचनेवर लिलावात भाग घेणा-या ठेकेदारानी आम्ही केलेली बोली ही बरोबर

आहे ती मान्य करावी अशी विनंती केली. या सूचनेवर मा. आयुक्त सो., यांनी बाजार लिलाव हा ठरलेल्या देकार रक्कमेप्रमाणे घ्यावा लागेल असे सांगितले. या सूचनेवर उपस्थित असलेले मा. सभापती सो., मा. स्थायी समिती सदस्य व बाजार ठेकेदार यांच्याबरोबर लिलावाच्या बोलीच्या रक्कमेबाबत चर्चा व वाटाघाटी होऊन बाजार लिलाव धारकांनी सन २००९-१० या वर्षातील रक्कमेवर ५% वाढ देऊन बाजार लिलाव घेण्यास तयारी दर्शविली ती पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभाग | बाजार ठेकेदार | सन २००९-१० च्या देकाराची रक्कम | ५% वाढ | ५% वाढ सुचवून सन २०१०-११ च्या रक्कमा |
|---|---|---|---|---|---|
| १) | भाईंदर (पुर्व) | विजयकुमार गजाधर सोमानी | रु.१,१४,०५,०००/- | रु.५,७०,२५०/- | रु. १,१९,७५,२५०/- |
| २) | भाईंदर (पश्चिम) | देविदास जयदेव किणी | रु.१,०९,२५,०००/- | रु.५,४६,२५०/- | रु. १,१४,७१,२५०/- |
| ३) | मिरारोड ते चेणा | सायमन बस्त्याव अल्मेडा | रु.१,३८,००,०००/- | रु.६,९०,०००/- | रु. १,४४,९०,०००/- |
| ४) | मुर्धा ते उत्तन | मे. राठोड असोसिएटस | रु. ४,३०,०००/- | रु. २१,५००/- | रु. ४,५१,५००/- |

वरीलप्रमाणे आलेली विभागवार बाजाराच्या बोलीची रक्कम अंतिम निर्णयाकरिता मा. स्थायी समितीकडे ठेवण्याचे ठरले.

भाईंदर (पुर्व), भाईंदर (पश्चिम) दि.१५/२/२०१० रोजी व मिरारोड ते चेणा, मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार लिलावाची मुदत दि.३०/६/२०१० रोजी संपत होती. याकरिता लिलावाच्या निविदा सूचना प्रसिध्द करणे, देकार मागविणे व इतर कार्यालयीन कामकाज करणेकामी कालावधी लागला असल्याने चारही बाजार ठेकेदारांना सन २००९-१० च्या रक्कमेवर १०% वाढ करुन मुदतवाढ देण्यांत आलेली आहे.

सबब भाईंदर (पुर्व) व भाईंदर (पश्चिम) मिरारोड ते चेणा, मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार फी वसुलीच्या बोली पध्दतीने आलेल्या ठेक्याबाबत योग्य निर्णय घेणेस व या विभागातील मुदत संपल्यानंतर दिलेल्या मुदतीवाढीच्या मंजुरीकरिता सविनय सादर...

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

**कर निर्धारक व संकलक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

दि. १२/७/१० रोजी प्राप्त
वेळ. ११-५०

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि.२८/०७/२०१०

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ४२ :- महापालिकेच्या वाहनांच्या लिलावाद्वारे विक्री केल्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेची १० वर्षापेक्षा जास्त कालावधीची एकुण १५ वाहनांचा लिलावाद्वारे विक्री करणे करिता दि. २९/०६/२०१० रोजीच्या मा. महासभेत याबाबत चर्चा करुन सर्वानुमते ठराव क्र. १५ दि. २९/६/२०१० अन्वये एकुण १५ वाहने विक्री करणेबाबत आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मा. महासभेने दिलेली आहे.

त्यानुसार दि. १३/७/२०१० रोजी मा. आयुक्त सो., यांच्या दालनात बोली पध्दतीने जाहिर लिलाव ठेवण्यात आला होता. सदरच्या लिलावात २७ जणानी निविदा फार्म घेतले व एकुण २२ जणानी बोली लिलावात भाग घेतला.

सदर लिलावात मा. आयुक्त सो., यांच्या दालनात मा. आयुक्त सो., समवेत मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, मा. सभापती स्थायी समिती, मा. सदस्य स्थायी समिती, मा. सर्व गटनेते यांना बोलविण्यांत आले होते.

एकुण १५ वाहनांची देकार रु. ५, २०, ०००/- पासुन सुरुवात झाली. सर्वात जास्त बोली मे. सिमरन इंटरप्रायजेस यांनी रु. १७,००,०००/- बोली करण्यात आली तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये केलेल्या लिलावाच्या प्राप्त रक्कम रु. १७,००,०००/- मान्यता मिळणेस शिफारस असे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २८/०७/१०

### ।। गोषवारा ।। प्रकरण क्र. ४३

**विषय :- मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) या माध्यमातून मार्गस्थ करणे.**

मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची स्थापना मा. महासभा दि. २०/०१/२००५ रोजी ठराव क्र. ६२ अन्वये करणेत आलेली होती. तद्नंतर मा. महासभा दि. १८/०२/२००५ ठराव क्र. ७२ अन्वये परिवहन समितीची स्थापना करण्यात आली.

परिवहन समिती सभा दि. ०४/०६/२००५ ठराव क्र. ०५ अन्वये परिवहन उपक्रम खाजगी तत्वावर चालविण्याची मंजुरी देण्यात आली. परिवहन उपक्रमाने निविदा प्रक्रिया करुन प्रती कि.मी. दर मागविले, त्यामध्ये एकूण तीन निविदा धारकांनी प्रत्यक्ष भाग घेतला. सर्वात कमी दर मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा. प्रा. लि. यांचे प्रती कि.मी. दर रु. १९/- प्रमाणे निश्चित करण्यात आले व दि. १५/०९/२००५ पासून मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची बस सेवा सुरु झाली.

सन २००५ ते आजपर्यंत परिवहन उपक्रम चालविण्यासाठी महानगरपालिकेकडून मिळालेले अनुदान खालीलप्रमाणे आहे.

**आकडे लाखात**

| २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (माहे जून पर्यंत) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ५५.५४ | १२०.०० | १७०.०० | १०५.०० | २२५.०० | ६०.०० | ७३५.५४ |

मागील पाच वर्षामध्ये मिळालेले अनुदान पाहता ७.३५ कोटी एवढे अनुदान मिरा भाईदर महानरपालिकेकडून परिवहन सेवा चालविण्यासाठी परिवहन उपक्रमाला दिलेले आहे. वरील बाबींचा विचार करता परिवहन उपक्रमास होणारा तोटा हा वाढत चाललेला आहे असे दिसून येते.

सन २००९ या वर्षात केंद्र शासनाची JNNURM योजने अंतर्गत शहर परिवहनसाठी बसेस उपलब्ध करुन घेणेसाठी मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०५/२००९, ठराव क्र. ०१ अन्वये मे. अर्बन मास ट्रांन्झिट कंपनी यांचे कडून २५० बसेस करीता डी.पी.आर. (Detail Project Report) बनवून केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. सदर डी.पी.आर. ला अनुसरुन केद्रशासनाकडून मिरा भाईदर

महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी पहिल्या टप्प्यात ५० बसेससाठी ११ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत.

केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत ५० टक्के रक्कम महानगरपालिका, ३५ टक्के रक्कम केंद्र शासन व १५ टक्के रक्कम राज्य शासन या प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे. ५० बसेस खरेदी करण्यासाठी प्रकल्प अहवालानुसार किंमत रु. ९,८८,७८,८००/- (अक्षरी नऊ कोटी अठ्याऐंशी लाख अठ्याहत्तर हजार आठशे मात्र) एवढा खर्च येणार आहे. JNNURM च्या नियमावलीनुसार ५० टक्के रक्कम म्हणजेच रु. ४,९४,३९,४००/- (अक्षरी चार कोटी चौऱ्यान्नव लाख एकोणचाळीस हजार चारशे मात्र) एवढी रक्कम महानगरपालिकेला स्वतः गुंतवणूक करणे आवश्यक आहे व उर्वरीत रक्कम रु. ४,९४,३९,४००/- शासनाकडून अनुदान स्वरुपात प्राप्त होणार आहे.

सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम चालविण्यासाठी महानगरपालिका अनुदान उपलब्ध करुन देत आहे व एकदा एवढी मोठी रक्कम परिवहन उपक्रमासाठी गुंतवणूक करणे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता शक्य नाही. यासाठी महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत येणाऱ्या बसेस मार्गस्थ करण्याच्या बाबत मा. महासभा दि. ११/०२/२०१०, ठराव क्र. ५१ नुसार पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) या तत्वावर चालविण्यासाठी मंजुरी देण्यात आली.

मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने पी.पी.पी. च्या माध्यमातून बसेस मार्गस्थ करणे या करीता दै. महाराष्ट्र टाईम्स व हिंदुस्थान टाईम्स या दोन वृत्तपत्रामधून दि. ०४/०६/२०१० रोजी निविदा प्रसिद्ध केली होती. हा निविदा कालावधी दि. ०५/०६/२०१० ते २२/०६/२०१० पर्यंत दु. १.०० वाजेपर्यंत होता व निविदा भरणेपूर्वीची बैठक दि. २२/०६/२०१० रोजी संध्या. ४.३० वाजता होती.

निविदा घेण्याच्या मुदतीत खालील नमूद केलेल्या ठेकेदारांनी E-Tendering द्वारे निविदा फॉर्मची रक्कम भरुन निविदा उपलब्ध करुन घेतल्या.

१) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर

२) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर

३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर

दि. २२/०६/२०१० रोजी संध्या ६.३० वाजता निविदा धारकाची बैठक मा. आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेसाठी आयुक्त कार्यालयात झाली. त्यामध्ये निविदाकारांनी लेखी व तोंडी स्वरुपात निविदेतील

अटी-शर्ती व अन्य अडचणी बाबत चर्चा केली. याबाबत सविस्तर चर्चा करुन मा. आयुक्त साो., यांनी अंतिम निर्णय दिले. निविदा भरणेपूर्वीची बैठकीतील मुद्दे हा निविदेचा भाग असल्यामुळे याबाबत सर्व निविदा धारकास E-mail द्वारे व लेखी स्वरुपात पत्राने मा. आयुक्त – मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय कळविण्यात आला. या निविदा पूर्व बैठकीसाठी खालील ठेकेदार उपस्थित होते.

१) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर

२) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर

३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर

दि. २९/०६/२०१० रोजी निविदा स्विकारणेची अंतिम तारीख होती, परंतु या निविदा धारकांना बँकेकडून EMD भरतांना अडचणी निर्माण झाल्यामुळे यापैकी एक निविदाकार मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांनी निविदा स्विकारण्याची मुदत एक दिवसाने वाढवावी अशी लेखी विनंती केली, त्याप्रमाणे मुदत एक दिवस वाढवून दि. ३०/०६/२०१०, संध्या. ३.०० वा. पर्यंत वाढविण्यात आली.

दि. ३०/०६/२०१०, संध्या. ५.३० वा. सर्व निविदा धारक व मा. उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक, मुख्यलेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व सहा. आयुक्त (परिवहन) यांचे समक्ष E-Tendering द्वारे प्राप्त निविदा उघडण्यात आल्या. तांत्रीक बाबी संबधी सर्व मुद्यांची छाननी मा. उपायुक्त साो., मुख्य लेखाधिकारी साो., मा. मुख्य लेखापरिक्षक व सहा. आयुक्त यांनी करुन घेतली असता तीनही निविदा धारक १) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर २) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर ३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांची सर्व कागदपत्रे योग्य असल्याचे दिसून आले. मा. छाननी समितीची सर्वांच्या शिफारशीनुसार दुसऱ्या देकार बाबतचे लिफाफा उघडण्यात आला असता त्यामध्ये खालीलप्रमाणे देकार आला.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | रॉयल्टी प्रती कि.मी. |
|---|---|---|
| १. | मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर | ०.९०<br>(अक्षरी नव्वद पैसे मात्र) |
| **२.** | **मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर** | **१.००<br>(अक्षरी एक रुपये मात्र)** |
| ३. | मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर | ०.६५<br>(अक्षरी पासष्ट पैसे मात्र) |

निविदा धारकांपैकी मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर यांचा देकार हा सर्वात जास्त म्हणजे रु. १.०० प्रती कि.मी. इतका आला. मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांचे दर, रॉयल्टी प्रती कि.मी. वाढवून घेण्यासाठी दि. ०३/०७/२०१० च्या पत्रांन्वये पुनश्च वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले,

परंतु मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांनी प्रती कि.मी. १ रुपये एवढी रॉयल्टीपेक्षा जास्त देकार देता येणार नाही असे लेखी कळविले.

परिवहन उपक्रमाद्वारे पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) बसेस मार्गस्थ प्रस्ताव तपासणी, वाटाघाटी व अंतिमीकरण करुन देणे यासाठी केंद्र शासनाच्या C.I.R.T. (Central Institute of Road Transport), पुणे यांच्याकडे संपूर्ण कागदपत्रासह पाठविण्यात आला. या संस्थेचा संपूर्ण प्रस्तावावर अभिप्राय दि. १२/०७/२०१० रोजी महानगरपालिका उपक्रमास प्राप्त झाला. C.I.R.T. यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सर्वात जास्त देकार देणाऱ्या ठेकेदाराची निविदा स्विकारण्यास हरकत नाही असे नमूद केलेले आहे.

C.I.R.T. यांचे अभिप्रायानुसार मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर यांचा सर्वात जास्त रॉयल्टी प्रती कि.मी. एक रुपया एवढा मान्य करण्यास हरकत नाही. प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर.

आयुक्त
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

दि. २०।७।१० रोजी प्राप्त
दुपारी. ४ वाजता

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक:-** २६/७/२०१०

## // गोषवारा //

## (सुधारीत)

८३

**विषय :- मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) या माध्यमातून दहा वर्षाच्या कालावधी करीता मार्गस्थ करणे.**

मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची स्थापना मा. महासभा दि. २०/०१/२००५ रोजी ठराव क्र. ६२ अन्वये करणेत आलेली होती. तद्नंतर मा. महासभा दि. १८/०२/२००५ ठराव क्र. ७२ अन्वये परिवहन समितीची स्थापना करण्यात आली.

परिवहन समिती सभा दि. ०४/०६/२००५ ठराव क्र. ०५ अन्वये परिवहन उपक्रम खाजगी तत्वावरं चालविण्याची मंजुरी देण्यात आली. परिवहन उपक्रमाने निविदा प्रक्रिया करुन प्रती कि.मी. दर मागविले, त्यामध्ये एकूण तीन निविदा धारकांनी प्रत्यक्ष भाग घेतला. सर्वात कमी दर मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा. प्रा. लि. यांचे प्रती कि.मी. दर रु. १९/- प्रमाणे निश्चित करण्यात आले व दि. १५/०९/२००५ पासून मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची बस सेवा सुरु झाली.

सन २००५ ते आजपर्यंत परिवहन उपक्रम चालविण्यासाठी महानगरपालिकेकडून मिळालेले अनुदान खालीलप्रमाणे आहे.

**आकडे लाखात**

| २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (माहे जून पर्यंत) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ५५.५४ | १२०.०० | १७०.०० | १०५.०० | २२५.०० | ६०.०० | ७३५.५४ |

मागील पाच वर्षामध्ये मिळालेले अनुदान पाहता ७.३५ कोटी एवढे अनुदान मिरा भाईदर महानरपालिकेकडून परिवहन सेवा चालविण्यासाठी परिवहन उपक्रमाला दिलेले आहे. वरील बाबींचा विचार करता परिवहन उपक्रमास होणारा तोटा हा वाढत चाललेला आहे असे दिसून येते.

सन २००९ या वर्षात केंद्र शासनाची JNNURM योजने अंतर्गत शहर परिवहनसाठी बसेस उपलब्ध करुन घेणेसाठी मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०५/२००९, ठराव क्र. ०१ अन्वये मे. अर्बन मास ट्रांन्झिट कंपनी यांचे कडून २५० बसेस करीता डी.पी.आर. (Detail Project Report) बनवून केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. सदर डी.पी.आर. ला अनुसरुन केद्रशासनाकडून मिरा भाईदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी पहिल्या टप्प्यात ५० बसेससाठी ११ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सद्य स्थितीमध्ये मे. महालक्ष्मी कृपा इंन्फ्रा. प्रा. लि. यांचे मार्फत भाडे तत्वावर चालू असणाऱ्या सर्व बसेस शासकीय नियमानूसार घसारा मूल्य वजा करून संबधित ठेकेदाराने हस्तातरण करून घ्यावयाच्या आहेत हयाची सर्व रक्कम (१००%) ठेकेदाराने अदा करावयाची आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत ५० टक्के रक्कम महानगरपालिका, ३५ टक्के रक्कम केंद्र शासन व १५ टक्के रक्कम राज्य शासन या प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे. ५० बसेस खरेदी करण्यासाठी प्रकल्प अहवालानुसार (LED, Multiplex Wiring, GPS वगळून) किंमत रु. ९,८८,७८,८००/- (अक्षरी नऊ कोटी अठ्ठयाऐंशी लाख अठ्ठयाहत्तर हजार आठशे मात्र) एवढा खर्च येणार आहे. JNNURM च्या नियमावलीनुसार ५० टक्के रक्कम म्हणजेच रु. ४,९४,३९,४००/- (अक्षरी चार कोटी चौऱ्यान्नव लाख एकोणचाळीस हजार चारशे मात्र) एवढी रक्कम महानगरपालिकेला स्वतः गुंतवणूक करणे आवश्यक आहे व उर्वरीत रक्कम रु. ४,९४,३९,४००/- शासनाकडून अनुदान स्वरुपात प्राप्त होणार आहे.

M.B.M.T. ने केंद्र शासनाला सादर केलेल्या D.P.R. नुसार उर्वरित १५० बसेस मंजूर झाल्यानंतर या साठी केंद्र शासनाकडून अनुदान (५०%) उपलब्ध करून दिले नाही तर संपूर्ण १००% खर्च हा ठेकेदारास करावा लागणार आहे, जर केंद्र शासनाने अनुदान उपलब्ध करून दिले तर त्या प्रमाणात रॉयल्टी सुद्दा ठेकेदाराने वाढवून देणे क्रमप्राप्त आहे.

| अ. क्र. | तपशिल | शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान | ठेकेदाराकडून P.P.P. माध्यमातून उपलब्ध होणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सद्य. स्थितीत M.B.M.T. च्या चालू असणाऱ्या बसेस हस्तातरण करणे. | | १००% |
| २ | JNNURM अंतर्गत ५० बसेस | ५०% | ५०% |
| ३ | भविष्यात D.P.R. नूसार उर्वरित १५० बसेस खरेदी बाबत. | | १००% |

सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम चालविण्यासाठी महानगरपालिका अनुदान उपलब्ध करुन देत आहे व एकदा एवढी मोठी रक्कम परिवहन उपक्रमासाठी गुंतवणूक करणे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता शक्य नाही. यासाठी महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत येणाऱ्या बसेस मार्गस्थ करण्याच्या बाबत मा. महासभा दि. ११/०२/२०१०, ठराव क्र. ५१ नुसार पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) या तत्वावर चालविण्यासाठी मंजुरी देण्यात आली.

मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने पी.पी.पी. च्या माध्यमातून बसेस मार्गस्थ करणे या करीता दै. महाराष्ट्र टाईम्स व हिंदुस्थान टाईम्स या दोन वृत्तपत्रामधून दि. ०४/०६/२०१० रोजी निविदा प्रसिध्द केली होती. हा निविदा कालावधी दि. ०५/०६/२०१० ते २२/०६/२०१० पर्यंत दु. १.०० वाजेपर्यंत होता व निविदा भरणेपूर्वीची बैठक दि. २२/०६/२०१० रोजी संध्या. ४.३० वाजता होती.

निविदा घेण्याच्या मुदतीत खालील नमूद केलेल्या ठेकेदारांनी E-Tendering द्वारे निविदा फॉर्मची रक्कम भरुन निविदा उपलब्ध करुन घेतल्या.

१) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर

२) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर

३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर

दि. २२/०६/२०१० रोजी संध्या ६.३० वाजता निविदा धारकाची बैठक मा. आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेसाठी आयुक्त कार्यालयात झाली. त्यामध्ये निविदाकारांनी लेखी व तोंडी स्वरुपात निविदेतील अटी-शर्ती व अन्य अडचणी बाबत चर्चा केली. याबाबत सविस्तर चर्चा करुन मा. आयुक्त सो., यांनी अंतिम निर्णय दिले. निविदा भरणेपूर्वीची बैठकीतील मुद्दे हा निविदेचा भाग असल्यामुळे याबाबत सर्व निविदा धारकास E-mail द्वारे व लेखी स्वरुपात पत्राने मा. आयुक्त – मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय कळविण्यात आला. या निविदा पूर्व बैठकीसाठी खालील ठेकेदार उपस्थित होते.

१) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर

२) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर

३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर

दि. २९/०६/२०१० रोजी निविदा स्विकारणेची अंतिम तारीख होती, परंतु या निविदा धारकांना बँकेकडून EMD भरतांना अडचणी निर्माण झाल्यामुळे यापैकी एक निविदाकार मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांनी निविदा स्विकारण्याची मुदत एक दिवसाने वाढवावी अशी लेखी विनंती केली, त्याप्रमाणे मुदत एक दिवस वाढवून दि. ३०/०६/२०१०, संध्या. ३.०० वा. पर्यंत वाढविण्यात आली.

दि. ३०/०६/२०१०, संध्या. ५.३० वा. सर्व निविदा धारक व मा. उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक, मुख्यलेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व सहा. आयुक्त (परिवहन) यांचे समक्ष E-Tendering द्वारे प्राप्त निविदा उघडण्यात आल्या. तांत्रीक बाबी संबधी सर्व मुद्यांची छाननी मा. उपायुक्त सो., मुख्य लेखाधिकारी सो., मा. मुख्य लेखापरिक्षक व सहा. आयुक्त यांनी करुन घेतली असता तीनही निविदा धारक १) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर २) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर ३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांची सर्व कागदपत्रे योग्य असल्याचे

दिसून आले. मा. छाननी समितीची सर्वांच्या शिफारशीनुसार दुसऱ्या देकार बाबतचे लिफाफा उघडण्यात आला असता त्यामध्ये खालीलप्रमाणे देकार आला.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | रॉयल्टी प्रती कि.मी. |
|---|---|---|
| १. | मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर | ०.९० (अक्षरी नव्वद पैसे मात्र) |
| २. | **मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर** | १.०० **(अक्षरी एक रुपये मात्र)** |
| ३. | मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर | ०.६५ (अक्षरी पासष्ट पैसे मात्र) |

निविदा धारकांपैकी मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर यांचा देकार हा सर्वात जास्त म्हणजे रु. १.०० प्रती कि.मी. इतका आला. मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांचे दर, रॉयल्टी प्रती कि.मी. वाढवून घेण्यासाठी दि. ०३/०७/२०१० च्या पत्रांन्वये पुनश्च वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले, परंतु मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांनी प्रती कि.मी. १ रुपये एवढी रॉयल्टीपेक्षा जास्त देकार देता येणार नाही असे लेखी कळविले.

परिवहन उपक्रमाद्वारे पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) बसेस मार्गस्थ प्रस्ताव तपासणी, वाटाघाटी व अंतिमीकरण करुन देणे यासाठी केंद्र शासनाच्या C.I.R.T. (Central Institute of Road Transport), पुणे यांच्याकडे संपूर्ण कागदपत्रासह पाठविण्यात आला. या संस्थेचा संपूर्ण प्रस्तावावर अभिप्राय दि. १२/०७/२०१० रोजी महानगरपालिका उपक्रमास प्राप्त झाला. C.I.R.T. यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सर्वात जास्त देकार देणाऱ्या ठेकेदाराची निविदा स्विकारण्यास हरकत नाही असे नमूद केलेले आहे.

C.I.R.T. यांचे अभिप्रायानुसार मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर यांचा सर्वात जास्त रॉयल्टी प्रती कि.मी. एक रुपया हा सद्य. स्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा. प्रा. लि. याचे मार्फत भाडेतत्त्वावर चालू असलेल्या ५० बसेस, JNNURM योजने अंतर्गत ५० बसेस व भविष्यातील M.B.M.T. च्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या उर्वरित १५० बसेस असे एकूण २५० बसेस P.P.P. वर चालविणेसाठी देणेस हरकत नाही मान्यतेसाठी मा. स्थायी समिती समोर सादर.

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका